पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952

मंगळवार, दि. १९ मे २०२६ | वर्ष : १४ | अंक : ०२५ | पाने ८ | किंमत २ रुपये | www.janpravaslive.in | E-mail : dainikjanpravas@gmail.com

आतील पानात...

३ गुंजाळवाडी येथे एसटी बस उलटून दोन जणांचा मृत्यू;

४ कोतवाली परिसरात तरुणावर लाकडी दांडक्याने हल्ला;

५ श्रीगोंदा विद्यार्थी-पालक कृती समिती आक्रमक



पान ८ वर..

# 'नीट' पेपरफुटी प्रकरण : शिवराज मोटेगावकर अटकेत; सीबीआय न्यायालयाकडून ९ दिवस कोठडी

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : देशभरात गाजत असलेल्या नीट' पेपरफुटी प्रकरणात लातूरमधील आरसीसी क्लासेस' या शिकवणी वर्गाचे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर याला केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडून (सीबीआय) सोमवारी अटक करण्यात आली. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या प्रा. मोटेगावकर याला नऊ दिवस सीबीआय' कोठडीत ठेवण्याचे आदेश विशेष न्यायालयाने दिले.

पेपरफुटी प्रकरणात प्रा. मोटेगावकर याची रविवारी दिवसभर चौकशी करण्यात आली. पेपरफुटी प्रकरणात यापूर्वी अटक करण्यात आलेला मुख्य सूत्रधार आरोपी पी. व्ही. कुलकर्णी हा परीक्षाप्रक्रियेशी संबंधित होता. प्रा. मोटेगावकर याचे लातूरमधील कार्यालय, तसेच निवासस्थानी सीबीआयच्या पथकाने छापे टाकले. तेव्हा रसायनशास्त्र विषयाशी संबंधित प्रश्नसंच सापडले. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न ३ मे रोजी पार पडलेल्या नीट'च्या प्रश्नपत्रिकेत होते. पेपरफुटी प्रकरणात प्रा. मोटेगावकर सामील असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर अटक करण्यात आली, अशी माहिती सीबीआय'कडून देण्यात आली.

प्रा. मोटेगावकर याची रविवारी पुण्यातील सीबीआय' कार्यालयात



चौकशी करण्यात आली. नीट' पेपरफुटी प्रकरणाच्या अनुषंगाने सीबीआय'च्या पथकाने लातूरमध्ये आरसीसी क्लासेस'चे कार्यालय आणि मोटेगावकर यांच्या निवासस्थानी छापे टाकले. तेथे शोधमोहीम राबविली. प्रा. मोटेगावकर याचे कार्यालय, निवासस्थानातून कागदपत्रे, लॅपटॉप, मोबाइल संच जप्त करण्यात आले, असे सीबीआय'च्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

प्रा. मोटेगावकर याला अटक करण्यात आल्यानंतर पुण्यातील विशेष न्यायालयात हजर करण्यात आले. प्रा. मोटेगावकर याचे कार्यालय आणि निवासस्थानातून कागदपत्रे, लॅपटॉप, मोबाइल संच जप्त करण्यात आले आहे आहेत. इलेक्ट्रॉनिक उपकरणाची तांत्रिक तपासणी करायची आहे. या प्रकरणाचा सखोल तपास करायचा आहे. तपासासाठी मोटेगावकर याला सीबीआय' कोठडी देण्यात यावी, अशी विनंती सीबीआय'च्या अधिकाऱ्यांनी न्यायालयात केली. या प्रकरणात अटक करण्यत आलेल्या मोटेगावकर याची प्रवासी कोठडी (ट्रान्झिट रिमांड) मिळवण्यात आली असून, पुढील तपासासाठी मोटेगावकर याला तपासासाठी दिल्लीतील सीबीआय कार्यालयात नेण्यात येणार आहे.

राज्यभरात आरसीसीच्या शाखा पुणे, नाशिक, औरंगाबाद, नांदेड, सोलापूर, कोल्हापूर आणि अकोला यांसह अनेक शहरांत विस्तारल्या आहेत. मोटेगावकरचे पी. व्ही. कुलकर्णीसोबत घनिष्ठ संबंध होते. मोटेगावकरने परीक्षेपूर्वीच प्रश्न मिळवून उत्तरांसह मुलांपर्यंत पोहोचवले आहेत. त्याच्या मोबाईलमध्ये पेपरफुटीचे अनेक पुरावे समोर आले आहेत.

## छातीत चाकूने वार

## दारू पिऊन त्रास देत असल्याने मुलीने केला बापाचा खून

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : दारू पिऊन त्रास देत असल्याच्या रागातून ४० वर्षीय मुलीने त्याच्या ७० वर्षीय बापाच्या छातीत चाकूने वार करुन त्यांचा खून केला. जैनुद्दीन दस्तगीर फुलारी (वय ७०, रा. काशिवाडी) असे खून झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी खडक पोलिसांनी दिलशाद जैनुद्दीन फुलारी (वय ४०, रा. पोलिस चौकीसमोर, काशिवाडी) हीला अटक केली आहे. हा प्रकार त्यांच्या राहत्या घरात रविवारी रात्री अकराच्या सुमारास घडला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जैनुद्दीन, त्यांची पत्नी आणि मुलगी दिलशाद फुलारी हे एकत्र राहतात. त्यांची मुले वेगळी राहतात. जैनुद्दीन फुलारी हे दारु पिऊन घरी आले. ते दिलशाद हिला शिवीगाळ करु लागले. त्यातून त्यांच्यात वादावादी झाली. तेव्हा रागाच्या भरात घरातील किचनच्या ओट्यावर ठेवलेला कांदा कापण्याचा धारदार चाकू घेऊन दिलशाद हिने वडिलांच्या छातीवर वार केला. त्यात ते जागीच कोसळले. त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. तोपर्यंत अधिक रक्तस्राव झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करुन दिलशाद फुलारी हिला अटक केली आहे. याप्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलिस उपनिरीक्षक कुलदीप व्हटकर करत आहेत.

## संक्षिप्त

### विधान परिषदेच्या १६ जागांसाठी १८ जूनरोजी मतदान

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघात निवडणूक घेण्यासाठी किमान ७५ टक्के स्थानिक संस्था कार्यरत असणे आणि ७५ टक्के मतदार पदावर असणे अनिवार्य असते. या अटींची पूर्तता न झाल्यामुळे २०२२, २०२४ आणि २०२५ मध्ये रिक्त झालेल्या जागांवर वेळेत निवडणूक घेता आली नव्हती. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कोट्यातील विधानपरिषदेच्या १६ जागांसाठी अखेर निवडणूक आयोगाने बिगुल वाजवला आहे. या १६ जागांवर द्विवार्षिक निवडणूक घेण्याची घोषणा निवडणूक आयोगाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे. यासाठी येत्या १८ जून २०२६ रोजी मतदान पार पडणार आहे.निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या अधिकृत वेळापत्रकानुसार, या निवडणुकीची प्रक्रिया २५ मे २०२६ रोजी अधिकृत अधिसूचना जारी करून सुरू होईल. त्यानंतर इच्छुकांना उमेदवारी अर्ज भरण्यासाठी १ जून २०२६ पर्यंतचा वेळ देण्यात आला असून हीच नाव नोंदणीची शेवटची तारीख असेल. दाखल झालेल्या सर्व अर्जांची छाननी ०२ जून २०२६ रोजी केली जाईल, तर उमेदवारांना आपले अर्ज मागे घेण्यासाठी ०४ जून २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

### कल्याणच्या रेल्वे यार्डात चौदावर्षीय मुलीवर अत्याचार

जनप्रवास । प्रतिनिधी


डोंबिवली: कल्याण रेल्वे जंक्शनवर मामाला भेटण्यासाठी अहिल्यानगरहून आलेल्या १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला ब्लॅकमेल करत रेल्वे यार्डात नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची अत्यंत संतापजनक घटना घडली. या मुलीने नराधमाच्या तावडीतून निसटून लोहमार्ग पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी तत्परता दाखवत पसार झालेल्या बलात्काऱ्याला अवघ्या काही तासांतच बेड्या ठोकून गजाआड केले. सौरभ संतोष सोनवणे (वय २३) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. कल्याण पूर्वेकडील सिद्धार्थ नगरमध्ये राहणाऱ्या सौरभला कल्याणच्या लोहमार्ग न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला अधिक चौकशीसाठी पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. या संदर्भात पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही १४ वर्षीय मुलगी अहिल्यानगरहून मामाला भेटण्यासाठी निघाली होती. कल्याणहून तिला खोपोलीला जायचे होते. खोपोलीला जाण्यासाठी ती कल्याण रेल्वे स्थानकात ट्रेनच्या प्रतिक्षेत होती. तिच्यावर सौरभची वाईट नजर पडली. त्याने तिच्याशी जवळीक साधून बोलायला सुरुवात केली त्यानंतर अर्ध्या वाटेत आल्यानंतर पोलीस ठाण्यात नेण्याऐवजी हा बदमाश तिला रेल्वे यार्डात घेऊन गेला. निर्जनस्थळ असलेल्या रेल्वे यार्डात नेऊन त्याने या मुलीवर लैंगिक अत्याचार केला.

## 'घरी सोडतो' म्हणत वकील महिलेवर कारमध्ये अत्याचार, कोरेगाव पार्क परिसरातील घटना

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : धावत्या मोटारीत एका महिलेवर अत्याचार करण्यात आल्याची घटना कोरेगाव पार्क-मुंढवा रस्त्यावर मध्यरात्री घडली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पसार आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. याबाबत एका महिलेने कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पीडित महिला वकील आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ती एका पबमध्ये रात्री गेली होती. पबमध्ये आरोपी आला होता. पबमध्ये तिची आरोपीशी ओळख झाली. त्यानंतर तिला घरी सोडतो, असे आरोपीने तिला सांगितले. आरोपीने तिला विश्वासात घेतले. त्यानंतर महिलेला घेऊन तो मोटारीतून मुंढवा-कोरेगाव पार्क रस्त्याने निघाला. रस्त्याच्या कडेला मोटार थांबवून त्याने अत्यचाार केला,



असे महिलेने फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. संबंधित महिलेचा जबाब नोंदवून घेतला असून, तिने दिलेल्या वर्णनानुसार पोलिसांनी अरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली आहे. पोलिसांनी कोरेगाव पार्क-मुंढवा रस्त्यावरील पब, तसेच परिसरातील चित्रीकरण तपासले आहे.

## अनैतिक संबंधातून तरुणाचा खून

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : अनैतिक संबंधातून तरुणावर तीक्ष्ण शस्त्राने वार करुन खून करण्यात आल्याची घटना सिंहगड रस्ता भागात घडली. या प्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

रूपेश सुरेश भांदिर्गे (वय ४१, रा. स्पंदन बिल्डिंग, नऱ्हे) असे खून झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी युवराज गेजगे (रा. रेणुकानगरी, वडगाव बुद्रुक) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रुपेश याचा भाऊ नीलेश यांनी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीच्या नात्यातील एका महिलेशी रुपेश याचे अनैतिक संबंध असल्याचा संशय आरोपीला होता.

## औषध विक्रेत्यांचा २० मे रोजी बंद: घाबरू नका, औषधांचा साठा करा; प्रशासनाचे नागरिकांना आवाहन

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटनेने आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी २० मे २०२६ रोजी दुकाने बंद ठेवण्याचे आवाहन केले आहे. या पार्श्वभूमीवर, पुणे विभागातील नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता संयम राखावा आणि आवश्यक औषधांचा आगाऊ साठा करून ठेवावा, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागातर्फे करण्यात आले आहे.

पुणे विभागाचे सह आयुक्त (औषधे) गि. दि. हुकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या बंदमुळे शहर आणि जिल्ह्यातील बहुतेक औषध दुकाने बंद राहण्याची



शक्यता आहे. मात्र, रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने विशेष उपाययोजना केल्या आहेत.

शासकीय रुग्णालये, आपत्कालीन वैद्यकीय सेवा आणि काही निवडक औषध दुकाने या काळात सुरू राहतील. यामध्ये प्रामुख्याने मेडप्लस, अपोलो फार्मसी, वेलनेस फॉरएव्हर यांसारख्या साखळी फार्मसी, रुग्णालयांना संलग्न असलेली औषध दुकाने तसेच जेनेरिक औषध दुकाने नियमितपणे सुरू राहणार आहेत.

औषध विक्रेत्यांना 'औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४०' अंतर्गत परवाने देण्यात आले असून, रुग्णांना वेळेवर औषधे उपलब्ध करून देणे हे त्यांचे कर्तव्य असल्याचे हुकरे यांनी सांगितले. औषधांचा कृत्रिम तुटवडा निर्माण होऊ नये, यासाठी केमिस्ट बांधवांनी बंदमध्ये सहभागी होऊ नये, असे आवाहनही त्यांनी केले. नागरिकांनी घाबरून न जाता आवश्यक खबरदारी घ्यावी, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## जुन्या वादातून रिक्षाचालकावर धारदार शस्त्राने हल्ला; आरोपींचा शोध सुरु

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : कात्रज ते नवले ब्रिज दरम्यान असलेल्या राजमाता भुयारी मार्गाजवळ सोमवारी सकाळी एका रिक्षाचालकावर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

आंबेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत दत्तनगर चौक येथे सोमवारी सकाळी सुमारे १०.१५ वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला. सुरज माणिक काळे (वय ३०, रा. जैन मंदिराजवळ, कात्रज, पुणे) असे जखमी रिक्षाचालकाचे नाव आहे. ते व्यवसायाने रिक्षाचालक आहेत.

प्राथमिक माहितीनुसार, दोन ते तीन वर्षांपूर्वी प्रवासी भरण्याच्या कारणावरून झालेल्या जुन्या वादातून आरोपी बापू भोसले, गणेश गोरे आणि गणेश धरपाळे या तिघांनी सुरज काळे यांच्यावर धारदार हत्याराने हल्ला करून मारहाण केली. या हल्ल्यात ते जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. फिर्यादीची प्रकृती स्थिर असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

घटनेची माहिती मिळताच आंबेगाव पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत.

## आखाती युध्दाचा परिणाम; महाराष्ट्रात एसटी भाड्यात वाढ होण्याची शक्यता

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : मागील काही महिन्यांपासून इराण आणि अमेरिकेमध्ये युद्ध सुरू आहे. या युद्धाचा परिणाम जगभरात इंधनावर झाला आहे. देशात दूध, सोनं-चांदी यामधील दरात वाढ झाली आहे. पेट्रोल - डिझेलच्या दरातही वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर आता एसटीच्या तिकीट दरातही वाढ होणार असल्याचे संकेत दिले आहेत. यावर मंत्री प्रताप सरनाईक यांनी माहिती दिली आहे.

मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, एसटीला १० लाख ८७ हजार लिटर डिझेल लागते. एसटीला इंडियन ऑईलकडून डिझेल पुरवठा होत आहे. मागील आठवड्यात ३ रुपये दर वाढवला आहे. दरवाढीमुळे ३३ लाख ७० हजार आम्हाला जास्त मोजावे लागत आहेत. यामुळे महामंडळाचा वर्षाला १२४ कोटींचा तोटा होतो आहे. जागतिक पातळीवर युद्धाचा भडका उडाल्यास आणखी परिणाम होईल, अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही याबाबत आवाहन केले आहे. भविष्यात काय होईल



हे आता सांगता येत नाही. विशेष सवलत देण्याचा निर्णय झाल्यास आम्ही दरवाढ करणार नाही. मे पर्यंत आम्ही थांबणार आहोत. पुढील १० ते १२ दिवस केंद्र आणि राज्य सरकारनं पुर्तता केली तर दरवाढ करणार नाही, मात्र पुर्तता न झाल्यास दरवाढ करावी लागेल, ऑईल कंपनीने पूर्व किंमतीत दिले तर दरवाढ करणार नाही. इंधनवाढ झाली तर आम्हाला दरवाढ करावी लागेल, असे संकेत मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. बाईट टॅक्सीबाबत मी सायबर पोलिसांना पत्र देऊन अनधिकृत रित्या चालू आहेत. काही अनधिकृत रित्या पेट्रोल बाईक सुरू होत्या. काही ठिकाणी महिलांबरोबर गैरप्रकार घडले होते. अनेक नियम पायदळी तुडवल्या जात होत्या.

## दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट'ला 'अ' वर्ग पर्यटन क्षेत्राचा दर्जा

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : देशभरातील लाखो गणेशभक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट'ला राज्य सरकारतर्फे अ' वर्ग पर्यटन क्षेत्राचा दर्जा जाहीर करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक्स' या समाजमाध्यमावरून ही महत्त्वपूर्ण घोषणा केली.

**राज्य सरकारचा मोठा निर्णय**

या निर्णयामुळे धार्मिक पर्यटन, पायाभूत सुविधा आणि परिसर विकासाला मोठी चालना मिळणार आहे. १८९३ मध्ये स्थापन झालेल्या या ट्रस्टला तब्बल १३५ वर्षांची वैभवशाली परंपरा लाभली आहे. हे मंदिर केवळ भक्तीचे स्थान नसून, समाजसेवा आणि सांस्कृतिक संवर्धनातही याचे मोठे योगदान आहे. दररोज देश-विदेशातून हजारो भाविक येथे दर्शनासाठी येतात.

यापूर्वी मंदिराला जिल्हा नियोजन समितीकडून क' वर्ग दर्जा प्राप्त होता. संस्थेचे सामाजिक कार्य आणि भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन, आमदार हेमंत रासने यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र लिहून या मंदिरास अ' वर्ग दर्जा देण्याची मागणी केली होती.

# जि.प.शाळांमध्ये आता अंगणवाडीचे वर्ग


## येत्या शैक्षणिक वर्षापासून नवा निर्णय लागू

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये आता अंगणवाडीचे वर्ग सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुढील शैक्षणिक वर्षापासून ही योजना टप्प्याटप्प्याने लागू केली जाणार आहे. शाळांमधील रिकाम्या वर्ग खोल्यांचा वापर अंगणवाड्यांसाठी केला जाणार आहे. प्राथमिक शिक्षण विभागाने यासंदर्भात सर्व जिल्हा परिषदांना सूचना दिल्या आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार तीन ते आठ वर्षे वयोगटातील मुलांच्या शिक्षणावर विशेष भर देण्यात आला आहे. त्यानुसार बालवाडी, अंगणवाडी आणि प्राथमिक शिक्षण एकत्रित पद्धतीने देण्याचा प्रयत्न सरकारकडून सुरू आहे. राज्यात सध्या सुमारे १ लाख १० हजारांहून अधिक अंगणवाड्या आहेत. त्यातील अनेक अंगणवाड्या इमारतीत भाडे तत्वावर, अपुऱ्या सुविधांमध्ये सुरू आहेत.

त्यामुळे आता ज्या जिल्हा परिषद शाळांमध्ये अतिरिक्त वर्गखोल्या उपलब्ध आहेत, त्या ठिकाणी अंगणवाडीचे वर्ग भरवले जाणार आहेत. गावागावांमध्ये शाळा आणि अंगणवाडी वेगवेगळया ठिकाणी असल्याने मुलांना आणि पालकांना





अडचणी येत होत्या. नवीन निर्णयामुळे लहान मुलांना शाळेच्या वातावरणाची सवय लवकर लागणार असून प्राथमिक शिक्षणात जाण्याचा संक्रमण काळही सोपा होणार आहे.

**काय आहेत अडचणी?**

काही जिल्हा परिषद शाळांमध्ये अतिरिक्त वर्गखोल्या उपलब्ध नाहीत. काही ठिकाणी अंगणवाड्या आणि शाळा एकमेकांपासून दूर आहेत. त्यामुळे सर्वच ठिकाणी हा निर्णय लगेच लागू करणे शक्य होणार नाही. अंगणवाडीसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, खेळण्यांची जागा आणि लहान मुलांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्याचे आव्हान प्रशासनासमोर असणार आहे. राज्यातील सुमारे ४२ हजार अंगणवाड्या शाळांच्या परिसरात आहेत. पूर्वप्राथमिक आणि इयत्ता पहिलीचा वर्ग एकाच ठिकाणी असणे योग्य असल्याचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार ज्या जिल्हा परिषद शाळांमध्ये अतिरिक्त वर्गखोल्या उपलब्ध आहेत, तेथे अंगणवाडीचे वर्ग सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असे प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी सांगितले. ज्या शाळांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत, त्या ठिकाणीच अंगणवाडी वर्ग स्थलांतरित केले जातील. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसह शैक्षणिक वातावरणावर भर दिला जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# अग्रलेख : राष्ट्रवादी पुन्हा फुटीच्या उंबरठ्यावर!

राष्ट्रवादीमध्ये अजितदादा यांच्या पश्चात पक्षाचे कर्तेधर्ते बनलेल्या प्रफुल्ल पटेल व व सुनील तटकरे यांना कथित राष्ट्रीय कार्यकारिणीतून डच्चू दिल्याच्या चर्चांना ऊत आले आहे. यातून राष्ट्रवादीत पुन्हा फुटीची बिजे अशी चर्चाही सुरू आहे. त्यात अजितदादांचे चिरंजीव खा. पार्थ व जय पवार यांनी राष्ट्रवादीची सूत्रे हाती घेतल्याने पक्षामध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली आहे. याचा फायदा त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांनी घेतला असल्यास काही नवल नाही. ठाण्यातील माजी खासदार आनंद परांजपे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. आता राष्ट्रवादीच्या २२ आमदारांना घेऊन पटेल, तटकरे हे भाजपमध्ये जाणार असा दावा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे रोहित पवार यांनी केला आहे, एकूणच ही फुटीची राष्ट्रवादी बिजे म्हणावी लागतील.

अजितदादांच्या हयातीतच सुरू झालेल्या दोन्ही राष्ट्रवादींच्या कथित विलीनीकरणाच्या चर्चेचे नाट्य आणि त्यांच्या अपघाती निधनानंतर तीन महिने चालले. त्यावर पटेल, तटकरे, भुजबळ, धनंजय मुंडे यांनी एका रात्रीत सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्री करून मात केली. शरद पवार राष्ट्रवादीचा विलिनीकरणाचा डाव उधळून लावला. परंतु त्यानंतर पार्थ-जय पवार यांचे जे राजकारण सुरू झाले त्यामुळे अस्वस्थता वाढली आहे. मुख्यतः या दोन्ही भावांना राष्ट्रवादी आपल्या ताब्यात घ्यायची आहे. वंशपरंपरेने पक्ष व सत्ता ही पवार घराण्याकडेच राहिली पाहिजे, ही भूमिका असावी. प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे पाहिजेत कशाला, या भावनेतून त्यांना बाहेर काढण्याचे उद्योग या दोन्ही बंधूंनी चालविले असावेत, अशी चर्चा आहे. त्यामुळे एक निश्चित की, राष्ट्रवादी अजितदादा पवार गटाचे अस्तित्व धोक्यात येणार आहे हे निर्विवाद सत्य आहे. हे सगळे सुरू असताना सुनेत्रा पवार मात्र मूग गिळून बसल्या आहेत. त्यामुळे संशय अधिक वाढत आहे.

पतंतु अजितदादांच्या नावाचे वलय आहे तोपर्यंत ठीक आहे, ज्यावेळी हे वलय संपेल तेव्हा परिस्थिती मुंडे कुटुंबासारखी होईल. गोपीनाथ मुंडे यांचे अपघाती निधन झाले. त्यावेळी अशीच परिस्थिती होती. पंतप्रधान-गृहमंत्री यांनी येऊन जाहीर सभा घेतल्या तरी शेवटच्या त्यावेळी पंकजा मुंडे यांना हार पत्करावी लागली. मुंडेंचे पार्थिव परळीत आले त्यावेळी चाहत्यांची बरीच गर्दी होती. अजितदादांवरील अंत्यसंस्काराच्या वेळी देखील गर्दी होती. परंतु वडिलांचे वलय संपल्यानंतर मुंडे कन्या पराभूत झाल्या. त्यामुळे वडिलांचे वलय संपल्यानंतर आपले काय होईल याचा विचार पार्थ व जय यांनी करणे आवश्यक आहे. उद्या अशीच परिस्थिती राहिल्यास राष्ट्रवादीमधील मोठा गट भाजपकडे जाऊ शकतो. शेवटी सत्ता ही महत्त्वाची आहे. सत्तेशिवाय सध्याचे राजकारणी जगू शकत नाहीत.

पाच राज्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकांच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर पार्थ-जय पवार हे पक्षातील असंतोषाकडे व अस्वस्थतेकडे लक्ष देणार नसतील तर राष्ट्रवादीचा अस्त होण्यास उशीर लागणार नाही हे कटू सत्य आहे. मुख्यमंत्र्यांकडे अर्थ खाते गेल्याने राष्ट्रवादी आमदारांमध्ये निधीवरून चलबिचल सुरू झाली आहे. सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून ही व्यथा अलीकडेच कळवली आहे. निधीचे समान वाटप होणे आवश्यक आहे, असे सुनेत्रा पवार यांनी म्हटले आहे. सुनील तटकरे व प्रफुल्ल पटेल यांनी सिल्व्हर ओकवर जाऊन शरद पवारांची अलीकडेच भेट घेतली. त्या भेटींबाबत उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. त्यानंतर राष्ट्रवादीच्या प्रमुख नेत्यांची एक बैठकही झाली. या बैठकीत पार्थ व जय पवार यांच्यामुळे निर्माण झालेल्या स्थितीवर चर्चा झाली. आता ही चर्चा प्रसिद्धी माध्यमांसमोर सुरू झाली. या सर्व बाबींमध्ये सुनेत्रा पवारांची भूमिका ही महत्त्वाची असून त्याही पुत्रप्रेमामुळे याकडे कानाडोळा करत असतील तर पक्षाची स्थिती आणखी वाईट होईल.

सध्या राजकीय पातळीवर सर्व पार्श्वभूमी पाहता आता परिस्थिती बदलली आहे. अजितदादांनी राष्ट्रवादी सत्तेत सामील आहे. पण स्थानिक पातळीवर भाजपने मतविभागणीसाठी केलेल्या खेळीमुळे जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्या, परंतु त्याचा फारसा उपयोग पुणे वगळता अन्य कुठेही झाला नाही. त्यातच दोन्ही राष्ट्रवादीत नाराज प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे समर्थकही आता भरपूर आहेत. दुसरीकडे त्यांना नाही म्हटले तरी भाजपचे छुपे पाठबळ आहेच. अशा परिस्थितीत अजितदादा पवार राष्ट्रवादीत अंतर्गत धुसफूस सुरू आहेच. यामुळेच सुनील तटकरे शरद पवार यांना भेटून आले आहेत. अर्थात यामागे दबावतंत्राची खेळी असणार, हे उघड आहे. त्याबाबत रोहित पवार यांनीही तोंडसुख घेत पटेल-तटकरे भाजपच्या वळचणीला असल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. आता त्या दोघांची नाराजी आणि समज-गैरसमज सुनेत्राताई दूर करणार आहेत म्हणे. ते काही असो, पण दोन्ही राष्ट्रवादीचे विलीनीकरण करूनही जर सत्तेच्या जवळ जाता येणार नसेल तर दोन्ही राष्ट्रवादीतील बहुतांश सुभेदार विलीनीकरणापेक्षा भाजप-शिंदेसेनेमध्ये जाण्याचा पर्याय स्वीकारतील. आता परांजपे त्याची सुरुवात केली. अशावेळी पक्षांतराकरिता सर्वात आकर्षक पर्याय भाजप असेल. सध्या काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार पक्ष व उद्धव सेना यांच्याकडे असलेला विधानसभा, लोकसभा मतदारसंघ महायुतीत कुठल्या पक्षाकडे जाईल हे हेरून पक्षांतराचे निर्णय होतील. अर्थात सुनेत्रा वहिनींचे मौन, पार्थ-जय पवारची महत्त्वाकांक्षा आणि पटेल-तटकरे यांच्यासह अनेक नेत्यांच्या मनातील अस्वस्थता यामुळे राष्ट्रवादी फुटीच्या उंबरठ्यावर आहे हे नक्की!

## अंतरंग



### भाजपात आयारामांची चांदी

भारतीय जनता पक्षाने अवघ्या एका महिन्याच्या अवधीत बिहार व पश्चिम बंगाल या दोन मोठ्या राज्यांना असे दोन नवीन मुख्यमंत्री दिले की ते पक्षातले आयाराम तर आहेतच पण त्यांचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ किंवा भाजपाच्या विचार प्रणालिशी काहीही संबंध नाही. बिहारमधे नितीश कुमार यांना हटवून भाजपाने सम्राट चौधरी यांच्यावर राजमुगूट चढवला तर पश्चिम बंगालमधे ममता बॅनर्जींना दोन वेळा परभूत करणाऱ्या सुवेंधू अधिकारी यांचा राज्याभिषेक केला. ते भाजपात आले व त्यांचे नशीब फळफळले असेच म्हणावे लागेल. सुवेंधू अधिकारी ( पश्चिम बंगाल )- मुख्यमंत्री सुवेंधू अधिकारी हे २०२१ मधे भाजपात आले त्यापूर्वी ते तृणमल काँग्रेसमधे ममता बॅनर्जी यांचे निकटर्तीय म्हणून ओळखले जायचे. सुवेंदु हे अगोदर काँग्रेसमधे होते. त्यांचे वडिल शिशिर अधिकारी हे तर डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारमधे केंद्रीयमंत्री होते. १९९८ मधे ममता बॅनर्जी काँग्रेस सोडून तृणमूल काँग्रेस हा स्वत: पक्ष स्थापन केला, तेव्हा सुवेंधू व त्यांचा परिवार तृणमूल काँग्रेसमधे सामील झाला. २००६ मधे कांथी दक्षिण मतदारसंघातून तृणमूल काँग्रेसचे आमदार म्हणून विधानसभेत निवडून गेले होते. २०२० च्या सुमारास ममता यांनी त्यांचा भाचा अभिषेक बॅनर्जी यांना पक्षाचा चेहरा म्हणून प्रकाशात आणायला सुरूवात केली, तेव्हापासून सुवेंधूंचे बिनसले. त्यानंतर सुवेंधू यांनी डिसेंबर २०२० मधे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत भाजपामधे प्रवेश केला. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत सुवेंधू यांनी नंदिग्रामधे ममता यांचा पराभव केल्याने भाजपामधे त्याचे महत्व वाढले.

सम्राट चौधरी ( बिहार ) - भाजपात असले तरी त्यांचा प्रवास भरपूर इकडून तिकडून फिरून झाला आहे. सम्राट यांचे वडिल शकुनी चौधरी हे तर वेगवेगळ्या पक्षातून आमदार, खासदार व मंत्री झाले. शकुनी चौधरी हे समता पार्टीचे एक संस्थापक सदस्य होते. सम्राट चौधरी यांनी १९९० च्या दशकात समता पार्टीपासून राजकारणात प्रवेश केला. मे १९९९ मधे राबडी देवींच्या नेतृत्वाखालील राजद सरकारमधे ते कृषी मंत्री होते. नंतर सम्राट यांनी लालू प्रसाद यांच्या राजदच्या तिकीटावर निवडणुका लढल्या. २०१४ मधे त्यांनी नितीश कुमार यांच्या जनता दल युनायटेडमधे प्रवेश केला. जेव्हा जतिराम मांझी यांनी नितीश कुमार यांच्याविरोधात बंड केले, तेव्हा सम्राट यांनी मांझी यांच्या हम या पक्षाचे समर्थन केले. २०२४ मधे नितीश कुमार एनडीएमधे परतले व त्यांच्या सरकारमधे सम्राट उपमुख्यमंत्री झाले. २०२५ ची विधानसभा निवडणूक जनता दल यू व भाजपाने युती करून लढवली. निकालानंतर नितीश कुमार हे मुख्यमंत्री झाले व सम्राट चौधरी पुन्हा उपमुख्यमंत्री बनले. अवघ्या वर्षाच्या आतच नितीश कुमार यांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देऊन राज्यसभेत जावे लागले व त्यांच्या जागेवर सम्राट चौधरी भाजपाचे पहिले मुख्यमंत्री झाले.

हिमंता बिस्व सरमा (आसाम) - २००१, २००६ आणि २०११ असे तीन वेळा काँग्रेसच्या तिकीटावर जालुकबारी मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले. २००२ ते २०१४ या काळात तरूण गोगोई यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस सरकारमधे ते मंत्री होते. ऑगस्ट २०१५ मधे ते भाजपामधे सामील झाले. २०१६ मधे सर्वानंद सोनोवाल यांच्या नेतृत्वाखालील भाजपाच्या पहिल्या सरकारमधे मंत्री झाले. २०२१ मधे विधानसभा निवडणूक निकालानंतर सोनोवाल केंद्रात मंत्री म्हणून गेले व सरमा मुख्यमंत्री झाले. २०२६ च्या निवडणुकीनंतर सरमा दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. अर्जुन मुंडा (झारखंड) - राजकीय जीवनाला १९८० च्या सुमारास झारखंड मुक्ती मोर्चापासून सुरुवात केली. १९९५ मधे झारखंड मुक्ती मोर्चाचे आमदार म्हणून ते बिहार विधानसभेवर निवडून गेले. नंतर ते भाजपामधे सामील झाले. सन २०००च्या निवडणुकीत ते भाजपाचे आमदार म्हणून बिहार विधानसभेवर निवडून गेले. वयाच्या ३५ व्या वर्षी ते २००३ मधे ते झारखंडचे मुख्यमंत्री झाले. त्यानंतरही त्यांना मुख्यमंत्रीपदाची संधी मिळाली. सर्वानंद सोनोवाल ( आसाम ) - २००१ मधे आसाम गण परिषेदेच्या तिकीटावर मोरानमधून आमदार व २००४ मधे दिब्रुगडमधून खासदार म्हणून निवडून आले होते. फेब्रुवारी २०११ भाजपाचे तत्कालीन राष्ट्रीय अध्यक्ष नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत त्यांनी भाजपामधे प्रवेश केला. २०१४ मधे मोदींच्या सरकारमधे ते केंद्रात मंत्री झाले. २०१६ मधे आसामचे मुख्यमंत्री झाले. एन. बिरेन सिंह ( मणिपूर ) -राज्यात काँग्रेसच्या तिकीटावर तीन वेळा आमदार झाले. गेगॉन्ग अपांग ( अरूणाचल प्रदेश ) - १९७२ पासून काँग्रेसमधे होते. १९८० मधे वयाच्या ३४ व्या वर्षी ते अरूणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री झाले.

पेमा खंडू ( अरूणाचल प्रदेश ) माजी मुख्यमंत्री दोरजी खंडू यांचे पुत्र. २०१६ मधे काँग्रेसचे मुख्यमंत्री होते. काही महिन्यांतच पेमा खंडूसह ४३ आमदारांनी बंड केले व भाजपाच्या सहयोगी पक्षात सामील झाले. २०१९ व २०२४ च्या निवडणुकीत भाजपाला बहुमत मिळाले व पेमा खंडू पुन्हा मुख्यमंत्री झाले.माणिक साहा ( त्रिपुरा ) - २०१६ पर्यंत काँग्रेसचे सदस्य होते. त्याच वर्षी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष बनले. तत्कालीन मुख्यमंत्री बिप्लब कुमार देब यांनी अचानक राजीनामा दिल्यानंतर मार्च २०२२ मधे त्रिपुराचे ११ वे मुख्यमंत्री झाले. बसवराज बोम्मई (कर्नाटक )- माजी मुख्यमंत्री एस आर बोम्मई यांचे पुत्र. जनता दलात होते. रामकृष्ण हेगडे व देवेगौडा यांच्याबरोबर काम केले. धारवाडमधून विधान परिषदेवर आमदार होते. २००८ मधे भाजपामधे सामील झाले. भाजपाचे येडियुरप्पा यांच्या सरकारमधे ते मंत्री होते. यु के सिंह ( मणिपूर )- २०१२ मधे तृणूल काँग्रेसच्या तिकीटावर लढले. २०१३ मधे भाजपामधे सामील झाले. २०१७ मधे भाजपाचे आमदार झाले. २०२२ मधे बिरेन सिंह सरकारमधे मंत्री झाले. फेब्रुवारी २०२६ मधे मुख्यमंत्री झाले.

**- डॉ. सुकृत खांडेकर**

## राजकारण




# उत्तरप्रदेशात भाजपच्या पराभवाची व्यूहरचना

### काँग्रेसने आखली गुप्त रणनीती

आगामी उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी भाजपाला धक्का देण्यासाठी काँग्रेसने ६ महिने आधीच 'मिशन युपी' अंतर्गत गुप्त रणनीती आखली आहे.

बिहारपाठोपाठ पश्चिम बंगाल व आसाम विधानसभा निवडणुकीत सपाटून मार बसल्यानंतर काँग्रेसने आता आपले लक्ष्य उत्तर प्रदेशाकडे वळवले आहे. केंद्रातील सत्तेसाठी महत्वाचे केंद्र मानल्या जाणाऱ्या या राज्यात पुढील वर्षी विधानसभा निवडणूक होणार आहे. या निवडणुकीत सत्ताधारी भाजपाला पराभवाचा धक्का देण्यासाठी काँग्रेसने आतापासूनच जोरदार तयारी केली आहे. त्यासाठी पक्षाच्या दिल्लीतील नेतृत्वाने अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या सचिवांना संभाव्य उमेदवारांची यादी जाहीर करण्याचे निर्देश दिले आहेत. अखिलेश यादव यांच्या समाजवादी पार्टीबरोबर जागावाटपाचा तिढा निर्माण होऊ नये म्हणून हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जाते.

सन २०२५ मध्ये झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत आलेल्या अनुभवामुळे काँग्रेस नेतृत्व विशेष सावध झाले आहे. जागावाटपाच्या चर्चेत झालेला विलंब आणि इंडिया आघाडीतील मित्र पक्षांमधील मैत्रीपूर्ण लढतींमुळे बिहारच्या निवडणुकीत पक्षाला मोठा फटका बसल्याचे काँग्रेसच्या अनेक नेत्यांचे मत आहे. त्यामुळे



बिहारमध्ये चुका उत्तर प्रदेशात टाळण्या-साठी पक्षाने आतापासूनच खबरदारी घेण्यास सुरुवात केली आहे. काँग्रेसमधील सूत्रांनी सांगितले की, पक्षाचे उत्तर प्रदेशचे प्रभारी तथा अखिल भारतीय काँग्रेस समितीचे सरचिटणीस अविनाश पांडे यांनी राज्यातील सहा पक्ष सचिवांना दोन स्वतंत्र याद्या तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. पहिल्या यादीत राज्यातील सर्व ४०३ विधानसभा मतदारसंघांसाठी संभाव्य उमेदवारांची नावे असतील, तर दुसऱ्या यादीत विजयाची अधिक शक्यता असलेल्या सुमारे १०० ते १२० मतदारसंघांचा समावेश असेल.

काँग्रेसने अंतर्गत स्तरावर उत्तर प्रदेशातील ४०३ विधानसभा मतदारसंघांचे तीन गटांमध्ये वर्गीकरण केले आहे. त्यामध्ये विजयाची दाट शक्यता असलेल्या जागा, कमी फरकाने विजय-पराजय होऊ शकणाऱ्या जागा व पक्षाचा जनाधार सर्वात कमकुवत असलेल्या जागांचा समावेश आहे. आतापर्यंत आम्ही विजयाची दाट शक्यता असलेल्या १०० हून अधिक जागा, विजय-पराजय होऊ शकणाऱ्या सुमारे २०० जागा आणि पक्षाचा जनाधार सर्वात कमकुवत असलेल्या जवळपास १२० जागा निश्चित केल्या आहेत, असे काँग्रेसच्या एका वरिष्ठ नेत्याने सांगितले. सध्या स्थानिक पातळीवरील पक्ष संघटना व इच्छुक उमेदवारांकडून थेट अभिप्राय गोळा केला जात आहे. आम्ही प्रत्येक मतदारसंघाचा आढावा घेऊन निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्या नेत्यांशी चर्चा करत आहोत. पुढील काही दिवसांत बहुतेक सचिव आपले अहवाल प्रभारी नेत्यांकडे सादर करतील, असे या प्रक्रियेत सहभागी एका अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या सचिवाने स्पष्ट केले.

**काँग्रेसची किती जागा लढवण्याची तयारी?**

पक्षांतर्गत सूत्रांच्या माहितीनुसार, समाजवादी पार्टीबरोबर आघाडी करून काँग्रेस सुमारे ८० जागा लढण्याची तयारी करत आहे. आम्ही अशा सुमारे १०० ते १२० जागांची ओळख पटवत आहोत, जिथे आम्हाला विजयाची संधी दिसते. त्यानंतर अंतिम चर्चेत सुमारे ८० जागांवर तडजोड केली जाईल. सामाजिक समीकरणे आमच्या बाजूने नसलेल्या जागा आम्हाला नको आहेत. आमचा संपूर्ण भर केवळ 'जिंकू शकणाऱ्या' जागांवरच आहे, असे पक्षाच्या सूत्राने सांगितले. जागावाटप या प्रक्रियेत राज्य पातळीवरील नेत्यांचा किंवा पदाधिकाऱ्यांचा अतिरेकी प्रभाव पडू नये, याबाबत काँग्रेसचे केंद्रीय नेतृत्व कमालीचे सावध आहे.

### गेल्या निवडणुकीत काँग्रेसला मोठा फटका

सन २०२२ च्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने सर्व ४०३ जागांवर निवडणूक लढवली होती, परंतु पक्षाला केवळ दोनच जागांवर विजय मिळवता आला होता. त्याशिवाय काँग्रेसची मते ऐतिहासिक नीचांकी पातळीवर (अवघ्या २.३३ टक्क्यांवर) घसरली होती. उत्तर प्रदेशचे काँग्रेस प्रभारी अविनाश पांडे यांनी सांगितले की, पक्षाने आगामी निवडणुकीची तयारी सहा महिन्यांआधीच सुरू केली होती. आमचे पहिले उद्दिष्ट हे राज्यातील पक्ष संघटना मजबूत करण्याचे होते आणि आता ती प्रक्रिया पूर्ण झाली आहे. राज्यातील ४०३ जागांसाठी आम्ही तब्बल २,२०० संभाव्य उमेदवारांची निवड केली आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## पंचांग

मंगळवार विक्रम संवत्- २०८२
अधिक ज्येष्ठ शके संवत्- १९४८ संवत्सर - पराभवनाम अयन- उत्तरायणारंभ मास- अधिक ज्येष्ठ ऋतु- सौर ग्रीष्म शुक्ल पक्ष तिथि : तृतीया १४:१८:४० नक्षत्र : मृगशिर्षा ०८:४१:१९ योग : धृति १७:४८:०६ करण : गर १४:१८:४० करण : वणिज २४:३९:२३+ सूयवृषभ चन्द्र : मिथुन हिजरी सन् - १४४६ मुस्लिम मास - जिल्हेज तारीख - २ विशेष - विनायक चतुर्थी (अंगरक योग)

## राशी भविष्य...

**मेष** — शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : दक्षिण. साहसामुळे आपल्याला यश मिळेल. चोरी किंवा नुकसानीचे योग आहेत. राज्य आणि व्यवसाय क्षेत्रात लाभ होण्याची शक्यता आहे.

**वृषभ** — शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : पूर्व. प्रसन्नता आणि आशाजनक वातावरणामुळे प्रयत्न यशस्वी होतील. व्यवहारात स्पष्टता ठेवायला हवी. मित्र- कुटूंबाचे कामात सहकार्य लाभेल.

**मिथून** — शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : पूर्व. कौटूंबिक जीवन सुखमय राहील. एखाद्या प्रतिष्ठित व्यक्तीची भेट होईल. व्यापारिक संबंधात योग्य निर्णय घेऊ शकाल.

**कर्क** — शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : पूर्व. व्यापारात स्वतःच्या निर्णयाने कामे करा. स्थायी संपत्ती वाढविण्यात घाई करु नका. कर्ज घ्यावे लागू शकते. परिवाराकडून धीर मिळेल.

**सिंह** — शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : दक्षिण. साहस, पराक्रमात वाढ होईल. नोकरीत बढतीचे योग आहेत. प्रकृती उत्तम राहील. कायद्याच्या प्रकरणात दुर्लक्ष करु नका. विरोधकांची हार होईल.

**कन्या** — शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : पश्चिम. सामाजिक उत्तरदायित्व पूर्ण कराल. कामात मनासारखा लाभ होईल. अर्धवट कामे वेळेच्या आधी पूर्ण होण्याची शक्यता आहे.

**तूळ** — शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : पूर्व. आपल्या कामात भावाचे सहकार्य मिळेल. बुध्दि आणि मनोबलाने मिळकतीत वाढ होऊ शकते. काही नवीन योजना आखाल.

**वृश्चिक** — शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : पश्चिम. कष्टाने कामे साध्य होतील. विचार करुन कामे करणे फायद्याचे ठरेल. व्यावसायिक किंवा आजीविका संबंधीत समस्येचे समाधान होईल.

**धनू** — शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : दक्षिण. प्रयत्न आणि दुरदर्शीपणामुळे सहकार्य आणि समर्थन मिळेल. सहचरिणीची उन्नती सामाजिक सन्मानात भर टाकेल.वाहन सुख मिळेल.

**मकर** — शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पश्चिम. कष्टाच्या तुलनेत यश कमी मिळेल. व्यापारिक अडथळे येतील. चिंता, व्याकुळता आणि धावपळ होईल. मिळकती पेक्षा खर्च जास्त होईल.

**कुंभ** — शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : पूर्व. थोडया प्रयत्नांनी लाभ मार्ग सुकर होईल. सामाजिक यश व सन्मान मिळेल. कौटूंबिक सुख आणि पत्नीच्या सहकार्याने मन प्रसन्न राहिल.

**मीन** — शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : पूर्व. व्यवहार कौशल्याने अधिकाऱ्यांच्या सन्मानास पात्र होऊ शकाल. आर्थिक कार्य पूर्ण झाल्याने आनंद होईल. कामात आळस आणि निष्काळजीपणा नको.

## पारावरचा फड



अधिक मास म्हणजे हिंदु धर्मातील रितीरिवाजानुसार जावयांना वाण देण्याचा महिना. साहजिकच यामुळे जावयाच्यादृष्टीने आनंदाची बातमी. जावयाला सोन्या-चांदीच्या वस्तू देण्याची प्रथा पाळण्यावर भर दिला जातो. परंतु अलिकडे महागाईच्या काळात हे पाळतो कोण? तरीही काहीजण त्यासाठी आग्रही आणि त्यातून रुसवे-फुगवे असतात. आता तर अगोदरच सोने-चांदीचे दर आस्मानाला भिडल्याने जावयाचे लाड करायचे आवाक्याबाहेर आहे. त्यातच युध्दजन्य परिस्थिती आणि त्यातून होणाऱ्या परकीय चलनातील अपव्ययामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोने-चांदी खरेदी करु नका, अशा सूचना केल्या आहेत. अशा परिस्थितीत जावयाला वाण देण्याच्या नावाने अगोदर उल्हास त्यात फाल्गुन मान असं म्हणण्याची वेळ आलीय. यासंदर्भात पारावरची चर्चा!

**बाबूराव :** आरं धोंड्याचा म्हैना हाय, मग काय समदीकडं जावयाचं कौतिक करायच्या हालचाली सुरु हायती म्हन.

**पांडूनाना :** आरं, नव्यानं लगीन झाल्याल्यांची तर चंगळच हाय म्हन.

**बाबूराव :** कसलं काय घिऊन बसलायास? आरं आगुदरच सोन-चांदीचे दर आवाक्याभाईर गेल्याती. लगनातच कसंबसं पार पाडलं जातंया. आता सोन्या-चांदीची हौस कमी झालीया. त्यात पोरीच मिळत न्हायती, मग कशापाई हाट्टून बसायचं म्हंत्यात समदी.

**पांडूनाना :** आक्शी बराबर हाय, पर एकदा लगीन झाल्यावं नगं का धोंड्याचा म्हैना पाळाया? जावायाचा मान कराय हावाच की.

**बाबूराव :** आता मोदीसायबानं लगनातच सोनं खरेदी करु नगा म्हटल्यावं धोंड्याला कोन देतोया सोनं?

**पांडूनाना :** आरं हावशेला मोल नसतंया. त्यातल्या त्यात लाकड्या कन्येचा हाट्ट आसतुयाच की. मग काय, जावईबापू पोरीकडनं निरोप धाडतुयाच की धोंड्याचा.

**बाबूराव :** ते बी खराय म्हन, खेड्या-पाड्यात तर ऋन काढून सन करायला मागं म्होरं बगत न्हायती.

**पांडूनाना :** त्यात एका सांगलीकर व्यापाऱ्यानं म्हनं चांदीच्या कोलापुरी व्हाना केल्याती म्हन.

**बाबूराव :** व्हय, त्ये लई चरचेत आलंया. जावई युरोपात हाय म्हनं त्येचा.

**पांडूनाना :** आसल्या परंपरा आन् लुटीचा धंदा हावा का?

**बाबूराव :** आक्शी बराबर हाय, पर ह्येला ईरोद करायचा म्हटलं तर धारमीकतेचा टेंबावालं उटत्याती.


**पांडूनाना :** आरं तितं काय घिऊन बसलायस, परवा त्या दुबईत जावयाला कोटीच्या कोटी पैकं दिल्यालं बी दाकवत हुतं की. समद्याच धरमात हे द्याचं हाय म्हन.

**बाबूराव :** आता पोरींनीच इरोद कराय हाव्या.

**पांडूनाना :** व्हय, पोरींना व्हान द्या म्हनावं.

**बाबूराव :** हुवू द्या धोंडा जोरात! **– अमृत चौगुले**

## उपदेश कथा




**श्रध्देचे फळ**

सुप्रसिध्द निर्माता-दिग्दर्शक मेहबूब खान 'मदर इंडिया'ची निर्मिती करीत होते तेव्हा त्यांच्यावर बऱ्याच संकटाचा वर्षाव झाला. त्यांची स्वत:ची तब्येत बिघडली. चित्रपटाचं बजेटही वाढलं. वितरकांशी पूर्वी त्यांनी कधी लेखी करार केले नव्हते. केवळ विश्वासावर व्यवहार केले होते. चित्रपटाची किंमत वाढवली नव्हती पण खर्चाचं पारडं जड झालेलं होतं. मेहबूब खाननं पैशाच्या पूर्ततेसाठी आपली सर्व मालमत्ता गहाण टाकली. स्टुडिओ तारण ठेवून पैसे उभे केले आणि निष्ठापूर्वक चित्रपटाचं काम पूर्ण केलं. मेहबूब खान यांची कामावर आणि परमेश्वरावर पूर्ण श्रध्दा होती. ठरल्याप्रमाणे मेहबूब खान चित्रपटाच्या निगेटिव्हज घेऊन पवित्र मक्केच्या यात्रेला गेले व तेथून लंडनला जाऊन चित्रपटावरच्या रासायनिक प्रक्रिया पूर्ण केल्या. ढासळणाऱ्या तब्येतीकडे आणि गुंतवलेल्या पैशाकडे दुर्लक्ष करून श्रद्धेने काम पूर्ण केलं. १९५८ मध्ये 'मदर इंडिया' प्रदर्शित झाला आणि एकट्या महाराष्ट्राला पंचवीस लाख मनोरंजन करपरतीमुळं मिळाले. महाराष्ट्र सरकारनं करमणूक कर माफ केला होता आणि उत्पन्नाचे विक्रम मोडले गेले होते.

**कथा उपदेश : प्रत्यक्ष कामावर निष्ठा आणि परमेश्वरावर श्रद्धा असेल तर यश नक्की मिळते.**

## दिनविशेष...



१५३६ - इंग्लंडचा राजा हेन्री आठव्याची दुसरी बायको ऍन बोलेनचा व्यभिचाराबद्दल शिरच्छेद. १५६८ - मेरी स्टुअर्टला अटक. १६०४ - कॅनडात मॉन्ट्रिआल शहराची स्थापना. १७४९ - इंग्लंडचा राजा जॉर्ज दुसऱ्याने ओहायो कंपनीला अमेरिकेतील ओहायो प्रदेशातील जागा दिली. १८४८ - मेक्सिकन-अमेरिकन युध्द-ग्वादालुपे हिदाल्गोचा तह - मेक्सिकोने पराभव मान्य केला व कॅलिफोर्निया, नेव्हाडा, युटाह ही राज्ये व ऍरिझोना, कॉलोराडो, वायोमिंग व न्यू मेक्सिको राज्यांचा काही भाग अमेरिकेला १८,२५,००० अमेरिकन डॉलरला विकला. १९२१ - अमेरिकन काँग्रेसने नागरिकत्त्व याचणाऱ्या व्यक्तिंवर देशानुसार आरक्षण सुरू केले. १९७१ - सोवियेत संघाने मार्स २ या अंतराळयानाचे प्रक्षेपण केले. २००६ - चीनच्या पूर्व आणि दक्षिण किनाऱ्यावर आलेल्या 'चंचू' वादळाच्या तडाख्याने २१ जणांचा मृत्यू झाला. २००७ - व्हेनेझुएलात दोन बसेसच्या धडकेत २९ जण ठार झाले. २००८ - भारतीय वंशाच्या लेखिका इंद्रा सिन्हा यांच्या ॲनिमल्स पीपल या पुस्तकाला राष्ट्रकूल लेखक मंडळांचा सर्वोकृष्ट पुस्तकाचा पुरस्कार मिळाला.

### शहरे जलसमृध्द कशी होणार..?

जलसंवर्धनातून ग्रामसमृद्धी साधण्यासाठी स्थापन झालेली 'पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्था', अभिनेते नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे यांचे 'नाम फाउंडेशन', आमिर खान यांचे 'पाणी फाउंडेशन' अशा अनेक संस्था जलसंवर्धनातून ग्रामविकास करण्यासाठी हिरिरीने कार्यमग्न आहेत ही कौतुकास्पद बाब आहे. समृद्धी महामार्गावर इंटरचेंजच्या जवळपासच्या मोकळ्या जागांवर अमृत सरोवरांची निर्मिती आणि इतर उपाययोजनांचे तपशील वाचून महामार्ग मंत्री म्हणून ख्याती पावलेल्या नितीनजी गडकरींकडे केंद्रीय नदीजोड, जलसंधारण, जलसंपदा विभागांची धुरासुद्धा द्यायला हवी होती असे वाटले.कारण पाण्याची तितकीच गरज आज शहरांनाही आहे. लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे, त्यामुळे जलसंवर्धनातून लहानमोठ्या शहरांची समृद्धी साधणेसुद्धा अत्यावश्यक आहे. मोठ्या शहरांच्या पाण्याच्या गरजा अक्राळविक्राळ रूप घेत आहेत. शहरांना पाणीपुरवठा करणारे तलाव शहरांपासून शंभरएक किलोमीटर अंतरावर आहेत. त्यामुळे मुंबईसारख्या शहरातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान क्षेत्रातील कान्हेरीच्या डोंगरावरून उगम पावणाऱ्या नद्यांचे पाणी अडवण्याच्या योजना मार्गी लागल्या पाहिजेत. समुद्राचे खारे पाणी गोडे करण्यासाठी प्रक्रियाप्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित होणेसुध्दा गरजेचे आहे.

**वंदना माने, सांगली**

## जन की बात...



### सुट्टीत मुलांनी जास्त वेळ खेळाचा आनंद लुटावा

पूर्वी शाळांना सुट्ट्या लागल्या की गावागावातील मैदाने मुलांनी भरून गेलेली असायची पण आज ती मैदाने विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात ओस पडली असल्याचे चित्र



पाहायला मिळते. क्रिकेट वगळता एकही मैदानी खेळ खेळताना मुले दिसत नाहीत. देशी खेळ तर आजच्या मुलांना माहीतच नाहीत. गोट्या, भोवरे, विटीदांडू खेळताना कोणी दिसत नाही. आट्यापाट्या आणि सुरपारंब्या या खेळाचे नियम तर सोडाच पण नावही आजच्या मुलांना माहीत नाही. मोठे रिंगण घेऊन त्यात गोट्यांचा डाव लावल्याचे चित्र आज पाहायला मिळत नाही. गलगुट करून खेळणे व त्यावर राज्य द्यावे लागल्याचे हल्लीच्या मुलांमध्ये ऐकिवातही नाही. भोवऱ्याच्या रिंगणाचीही तीच अवस्था. दगडावर आरी घासून भोवऱ्याला टोक करीत बसलेला मुलगा शोधूनही सापडेनासा झाला आहे. जुन्या कपड्यांचा चेंडू तयार करून खेळला जाणारा रप्पाधप्पीचा खेळ हल्लीच्या मुलांना माहीतही नाही. लपंडाव, विटीदांडू,, लगोरी, कुरघोडी, चंपूल, उडाणटप्पू हे खेळ आता दुर्मिळ झाले आहेत. लंगडी हा खेळ आता फक्त शाळेतील पिटीच्या तासापूरता उरला आहे. या खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम व्हायचा शिवाय संघभावना, एकी, आपुलकी, नेतृत्व हे गुण या खेळांमुळे मुलांमध्ये विकसित व्हायचे. या खेळाची जागा आता टीव्ही, संगणक, मोबाईल, व्हिडीओ गेम यांनी घेतली आहे. टीव्ही, संगणक, मोबाईल व्हिडीओ गेममुळे मुलांना विविध खेळांची माहिती उपलब्ध होऊन त्यातून मुलांचा बौध्दिक विकास होतो असे वाटत असले तरी त्यांचा शारीरिक विकास खुंटत चालला आहे याचा समाजातील सर्व घटकांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मुलांना पुन्हा मैदानाकडे आणण्याची जबाबदारी पालक, शिक्षक व समाजातील सर्वच घटकांची आहे.

**-श्याम ठाणेदार, पुणे**

### इंधन बचत उपायांचे पालन करा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन इचाईच्या पार्श्वभूमीवर काटकसरीचे काही उपाय सुचविले आहेत सरकारी पातळीवर याची अंमलबजावणी होणे अतिशय जरुरी वाटते . आज प्रत्येक मंत्री मंत्रिमंडळाच्या बैठकीला स्वतंत्रपणे जात असतात . तीन चार जणांनी एकत्र गेल्यास इंधन वाचू शकते . सरकारी कार्यालयातील ऑफिसेस मध्ये जेव्हा कर्मचाऱ्यांना बाहेर जावयाचे असते तेव्हा लाईट व पंखे बंद करावेत कर्मचाऱ्यांनी ऑफिस चे अंतर कमी असल्यास सायकलीचा वापर करणे योग्य आहे. मेट्रोचाही वापर करावा . पेट्रोल व डिझेलची वाहने वापरण्या ऐवजी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करावा. वाहनांचा ताफा कमी असावा. शपथ विधी किंवा स्वागत समारंभाला जाताना एका मंत्र्याने उपस्थित राहावे यात उपस्थिती महत्वाची आहे. काही बैठका ऑनलाईन पद्धतीने आयोजित करणे शक्य आहे. मंत्र्यांच्या बंगल्याची दुरुस्ती किंवा रिनोव्हेशन अगदी आवश्यक असेल तेथेच करावे. सरकारी पातळीवर इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवावा. इंधन टंचाई असेतोपर्यंत स्वइच्छेने मंत्री व आमदार यांनी पगाराचा काही भाग सरकारी पातळीवर जमा करावा मंत्र्यांनी आपल्या खात्याच्या बैठका ऑनलाईन पद्धतीने घ्याव्यात .सरकारी कार्यालयातील खर्च कमी करावा . दिल्लीला जावयाचे असल्यास शक्यतो फोनवर संपर्क साधावा अगदीच अशक्य असेल तरच दिल्लीला जावे पंतप्रधानांनी सूचना दिलेल्या आहे.

**-सौरभ पाटील, सांगली**

# गुंजाळवाडी येथे एसटी बस उलटून दोन जणांचा मृत्यू; २६ प्रवासी जखमी

## नगर-कल्याण महामार्गावर भीषण अपघात

■ जनप्रवास प्रतिनिधी

**ओतूर :** एसटी चालकाचे एसटी वरील नियंत्रण सुटून समोरून आलेल्या वाहनाला वाचवण्याच्या प्रयत्नात एसटी बस उलटली. या अपघातात दोन जण ठार, तर २६ जण जखमी झाले.सदरचा अपघात अहिल्यानगर-कल्याण महामार्गावर गुंजाळवाडी ( ता.जुन्नर ) येथे झाला.

भिवंडी आगाराची शेगाव-कल्याण बस कल्याणला जात होती. रविवारी दि.१७ रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास गुंजाळवाडी गावच्या हद्दीत ही बस आली. त्या वेळी समोरून आलेल्या अज्ञात वाहनाला वाचविण्याच्या प्रयत्नात बसचालकाचे नियंत्रण सुटले. त्यामुळे बस उलटून रस्त्याच्या कडेला असलेल्या ओढ्यात जाऊन पडली.

या अपघातात दोन जण ठार झाले.

या अपघातात चालक मोहम्मद सलीम (वय ४०, रा. अमरावती) आणि प्रशांत साईनाथ होनशेटे (वय २७, रा. नांदेड) या दोघांचा मृत्यू झाला आहे.

भिवंडी आगाराची शेगाव-कल्याण एसटी क्र. एम एच १४ बीटी ४०२३ अहिल्यानगरहून भिवंडीकडे निघालेली एसटी बस गुंजाळवाडी गावच्या हद्दीत आली असता हा अपघात घडला होता.

या अपघातात कोंडीभाऊ कारभारी वाकचौरे (वय ७०), कमल कोंडीभाऊ वाकचौरे (वय ६७, दोघे रा. बेल्हे), शंकर शिवाजी शेजाळ (वय ५०), वैशाली शंकर शेजाळ (वय २३, दोघे रा. देवडे पंढरपूर), मगन सुखदेव पाटोळे (वय ४८), शोभा मगन पाटोळे (वय ३०, दोघे रा. बुलढाणा), शारदा बन्सी मेंगळे (वय ५९, रा. आणे), अश्विनी गणेश बहिरट (वय ४८, रा. आणे), अलका नामदेव गायकवाड (वय ५८, रा. संगमनेर), अरुण शंकर गुंजाळ (वय ५१, रा. बेल्हे), दीपाली बबन डोंगरे (वय ३३, रा. डोंगरवाडी), उल्हास तांबे (वय ७०, रा. ओतूर), यमुना यादव पावसे (वय ६०, रा. हिवरगाव पावसा संगमनेर), दिव्या संजय पवार (वय २१, रा. मानवडी, सिन्नर), सिद्धेश नितीन काळे (वय १०), आशा नितीन काळे (वय ३५), नितीन सिद्धार्थ काळे (वय ३८, सर्व रा. पाथर्डी) हे जखमी झाले.

अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन, सर्व जखमींना आळेफाटा येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. या अपघातात बसचे मोठे नुकसान झाले. जखमींना बाहेर काढण्यासाठी बस सरळ करण्यासाठी क्रेन आणावी लागली. आळेफाटा पोलिस पुढील तपास करीत आहेत

भिवंडी आगाराची शेगाव-कल्याण ही एसटी बस रविवारी सायंकाळी रस्त्याच्या कडेला उलटून झालेल्या अपघातात दोन जण ठार तर २६ प्रवासी जखमी झाले. समोरून येणाऱ्या एका वाहनाला वाचविण्याच्या नादात चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला.

शेगाव-कल्याण ही भिवंडी आगाराची बस रविवारी सायंकाळी पाचच्या अहिल्यानगर-कल्याण सुमारास मार्गावरील जुन्नर तालुक्यातील गुंजाळवाडी या गावाच्या हद्दीत आली असता समोरून येणाऱ्या एका अज्ञात वाहनाला चुकविण्याचा चालकाने प्रयत्न केला. मात्र, या प्रयत्नात त्याचे बसवरील नियंत्रण सुटल्याने बस रस्त्याच्या बाजूला असलेल्या ओढ्यात जाऊन पडली. यावेळी बस प्रवाशांनी भरलेली होती. या अपघातात दोघे जण ठार झाले. मात्र, त्यांची नावे समजू शकलेली नाहीत.



अपघाताचे वृत्त समजताच स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्याला सुरुवात केली. दोन-तीनदा पलटल्याने बसचे मोठे नुकसान झाले. पूर्ण उलटी झालेली बस सरळ करून जखमींना बाहेर काढण्यासाठी क्रेनचा वापर करावा लागला. गुंजाळवाडी ग्रामस्थांच्या मदतीने जखमींना आळेफाटा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघाताचा पुढील तपास आळेफाटा पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक चंद्रशेखर डुंबरे करत आहेत.

# उजनी धरणग्रस्त शेतकऱ्यांचा जनआक्रोश मोर्चा; JW Global Group सोबतचा करार रद्द करण्याची मागणी

## महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाकडून तहसीलदारांना निवेदन, तरटगाव-हिंगणगावच्या शेतकऱ्यांना न्याय द्या

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

**इंदापूर :** उजनी प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनी मूळ प्रकल्पग्रस्तांना विचारात न घेता JW Global Groupला देण्याचा निर्णय शासनाने घेतल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या वतीने सोमवार दि. १८/०५/२०२६ रोजी इंदापूर तहसील कार्यालयावर भव्य जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. यावेळी पक्षाचे संस्थापक अध्यक्ष संजय (भैय्या) सोनवणे यांनी तहसीलदार यांना निवेदन देऊन उजनी धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या शासन दरबारी सादर केल्या.

**४१ अंश तापमानातही धरणग्रस्तांचे आंदोलन; निवेदनासाठी अर्धा तास उन्हात ताटकळले**

इंदापूर शहरात ४१ अंश सेल्सिअस तापमान असतानाही उजनी धरणग्रस्त शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयासमोर ठिय्या मांडला. लहान मुले, महिला व पुरुष उन्हात बसून होते. आंदोलन संपल्यानंतरही प्रशासनाने निवेदन स्वीकारण्यास दिरंगाई केल्याने आंदोलकांना अर्धा तास भर उन्हात ताटकळत बसावे लागले. प्रशासनाच्या या उदासीनतेवर आंदोलकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.



१. शासनाने JW Global Group यांच्यासोबत केलेला करार तात्काळ रद्द करावा.

२. उजनी प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर अतिरिक्त संपादित जमिनी मूळ मालकांना परत कराव्यात.

३. उजनी प्रकल्पाच्या ७/१२ उताऱ्यावरील शेरा कमी करून ७/१२ पत्रकी कब्जेदार सदरी मूळ मालक यांचे नाव लावण्यात यावे.

४. मौजे हिंगणगाव व मौजे तरटगाव येथील संपादित क्षेत्राची मोजणी तात्काळ रद्द करावी.

५. सदर जमिनींवरील मूळ मालकांची वहिवाट असल्याने शासनाने ती बंद पाडू नये.

६. उजनी प्रकल्पासाठी बाधित शेतकऱ्यांचे अद्यापपर्यंत पुनर्वसन झालेले नाही, ते तात्काळ करावे.

७. तरटगाव व हिंगणगाव येथील दलित समाजाची शेतजमीन उजनी प्रकल्पासाठी संपादित झाल्यापासून आजतागायत कुठलाही मोबदला किंवा पर्यायी जमीन मिळालेली नाही. त्यामुळे जमीन ताब्यात घेण्यास विरोध आहे.

८. महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसूचना २७/०८/२०१४ नुसार ज्या प्रकल्पासाठी जमीन संपादित केल्या आहेत, आणि प्रकल्प पूर्ण होऊन ५ वर्षे झाली असतील तर त्या जमिनी परत मूळ मालकांना परत करण्याची अधिसूचना असतानाही कार्यवाही झालेली नाही, ती तात्काळ करावी.

९. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दि. ०४/०३/२०२६ रोजी शेतकऱ्यांना भाडेकराने देण्याची सूचना प्रशासनाला दिली होती. मात्र त्यावर कार्यवाही न होता उलट जमिनी मोजून उद्योजकांना देण्याचा घाट घातला जात आहे. तो तात्काळ थांबवावा.

या मागण्यांकरिता इंदापूर नगर परिषदेपासून ते इंदापूर तहसील कार्यालयापर्यंत जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. यावेळी संजय सोनवणे म्हणाले की, शासनाने जर संपादित जमिनी मूळ मालकांपासून हिरावून घेतल्या तर हजारो शेतकरी भूमीहीन होणार आहेत. त्यांच्या उदरनिर्वाहाचा मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. उजनी प्रकल्पासाठी संपादित जमिनी इतर प्रकल्पांसाठी वापरण्यास सर्व शेतकऱ्यांचा व ग्रामपंचायतींचा विरोध आहे.

या मागण्या शासनाने तात्काळ मान्य करून उजनी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अन्यथा यापुढे तीव्र आंदोलन केले जाईल असे महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक अध्यक्ष संजय भैय्या सोनवणे यांनी यावेळी प्रशासनाला ठणकावून सांगितले.

# शिक्रापूरमध्ये सामाजिक बांधिलकी जपत उभारली पाणपोई; डुबल बंधूंच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक

■ जनप्रवास प्रतिनिधी

**शिक्रापूर :** वाढत्या उन्हाच्या तीव्र झळांमुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी गैरसोय होत असताना शिक्रापूर येथे सामाजिक बांधिलकी जपत एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला आहे. कैलासवासी संगीता अशोक डुबल यांच्या स्मरणार्थ त्यांचे चिरंजीव नितीन अशोकराव डुबल व सचिन अशोकराव डुबल यांनी छत्रपती संभाजी महाराज पुल तसेच विद्याधाम प्रशाला, शिक्रापूर गेट समोरील परिसरात नागरिकांसाठी मोफत पाणपोई उभारून समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे.



उन्हाच्या कडाक्यात रस्त्याने प्रवास करणारे प्रवासी, शालेय विद्यार्थी, कामगार, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य ग्रामस्थांना या पाणपोईचा मोठा दिलासा मिळत आहे. दिवसभर या ठिकाणी नागरिकांची वर्दळ असते. त्यामुळे तहानलेल्या नागरिकांना थंड पिण्याचे पाणी सहज उपलब्ध होत असून या उपक्रमामुळे सर्वसामान्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे कोणताही गाजावाजा अथवा राजकीय हेतू न ठेवता केवळ सामाजिक जाणीव आणि सेवाभाव या भावनेतून हा उपक्रम उभारण्यात आला आहे. समाजासाठी काहीतरी देण्याची भावना जपत डुबल बंधूंनी केलेल्या या कार्याचे शिक्रापूर परिसरातून सर्वत्र कौतुक होत आहे. अनेक सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ तसेच नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत डुबल कुटुंबावर अभिनंदनाचा वर्षाव केला. सदर पाणपोईचे उद्घाटन उत्साहात पार पडले. यावेळी शिक्रापूर ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच सुभाष (मामा) खैरे, ग्रा.सद्स्य.कृष्णाशेठ सासवडे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष मंगेश चव्हाण, सोमनाथ भापकर, नितीन मांढरे, संदीप मांढरे,अविनाश बामणे यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर, ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उन्हाळ्याच्या दिवसांत अशा प्रकारचे सामाजिक उपक्रम समाजाला मोठा आधार देणारे ठरत असून शिक्रापूरमध्ये उभारण्यात आलेली ही पाणपोई नागरिकांसाठी दिलासादायक ठरत आहे. डुबल बंधूंनी जपलेली सामाजिक बांधिलकी ही इतरांसाठी प्रेरणादायी असल्याच्या भावना ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात आल्या.

# धरणे व तलावांमधील गाळ काढण्याच्या कामांना गती द्या : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** जिल्ह्यात गाळ मुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियानांतर्गत धरणे व तलावांमधील गाळ काढण्याच्या कामांना गती देण्यासाठी जलसंधारण, जलसंपदा , लघु पाटबंधारे जि.प. विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना समन्वयाने आवश्यक कार्यवाही करावी. याबाबतची अधिकाधिकची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याच्या जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सूचना दिल्या आहेत.

अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांनी त्यांच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या कार्यकारी अभियंत्यांना पाठविलेल्या पत्रानुसार, संबंधित धरणांमधील गाळ काढण्यासाठी अंदाजपत्रके तयार करून सविस्तर प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी जिल्हा जलसंधारण अधिकारी कार्यालयास सादर करावे. तसेच जलसंपदा विभागाच्या नियामक मंडळाची आवश्यक मान्यता घेण्याबाबतही सूचना करण्यात आल्या आहेत.



दरम्यान, जलसंपदा विभागाकडून आवश्यक परवानगी प्रक्रियेस काही कालावधी लागत असल्यास त्या कालावधीत जिल्ह्यातील अति शोषित, संकटग्रस्त,अर्ध संकटग्रस्त तसेच टँकरग्रस्त गावांमध्ये गाळ काढण्याचे, जलसंधारण व दुरुस्तीची अधिकाधिक कामांबाबत नियोजन करून ती प्राधान्याने घ्याव्यात.

यामध्ये विशेषत: भूजल पुनर्भरण क्षमता असलेल्या कामांना प्राधान्य देऊन जलसंधारण संरचनांची दुरुस्ती, गाळ उपसा व पाणी साठवण क्षमता वाढविण्याच्या कामांवर भर देण्यात येणार आहे. या अभियानामुळे पाणीटंचाई कमी होण्यास, भूजल पातळी वाढण्यास तसेच शेतकऱ्यांना सुपीक गाळ उपलब्ध होण्यास मदत होईल, असेही श्री. डुडी म्हणाले.

# सीबीएसई इयत्ता १२ वी निकाल २०२६ : अमनोरा स्कूल, पुणेने टॉपरच्या यशाचा गौरव करत शैक्षणिक उत्कृष्टतेची परंपरा कायम राखली

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** अमनोरा स्कूल, पुणेच्या विद्यार्थ्यांनी २०२६ च्या सीबीएसई बोर्ड परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करत इयत्ता १२ वीच्या सर्व शाखांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले.यंदाच्या निकालात विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले असून सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान शाखेत श्री.अभिनंदन जिनेंद्र पाटील यांनी ९०.६% गुण मिळवत अव्वल स्थान पटकावले. वाणिज्य शाखेत कु.आस्था महाजन यांनी ९६.६% गुण मिळवत उत्कृष्ट यश मिळवले, तर मानविकी (ह्युमॅनिटीज) शाखेत





कु.तेजस्वी खानवॉकर यांनीही ९६.६% गुणांसह उल्लेखनीय कामगिरी नोंदवली.हे उल्लेखनीय परिणाम विद्यार्थी' निष्ठा, शैक्षणिक उत्कृष्टता आणि सर्वांगीण शिक्षण आणि सर्वांगीण विकासासाठी स्कूलची दृढ वचनबद्धता प्रतिबिंबित करतात.उत्कृष्ट कामगिरी ही विद्यार्थ्यांच्या निष्ठा, कठोर परिश्रम आणि शिक्षक व पालकांच्या सातत्यपूर्ण पाठिंब्याचे प्रतिबिंब आहे. स्कूल शैक्षणिक उत्कृष्टतेची परंपरा शैक्षणिक अभ्यासक्रम आणि सर्वांगीण विकास यांवर संतुलित भर देऊन पुढे चालू ठेवते.

अमनोरा स्कूल, पुणे यांच्या संचालिका सुश्री मीरा नायर म्हणाल्या, शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मधील सीबीएसई इयत्ता १२ वी बोर्ड परीक्षेत विद्यार्थ्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीचा आम्हाला अत्यंत अभिमान आहे. आमच्या विद्यार्थ्यांनी समर्पण, शिस्त आणि शैक्षणिक उत्कृष्टतेचे उत्तम उदाहरण सादर केले आहे. विद्यालयाने १००% निकाल प्राप्त केला असून टॉपर विद्यार्थ्यांनी प्रभावी ९६.६% गुण मिळवले आहेत. हे यश विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्या सातत्यपूर्ण संयुक्त प्रयत्नांचे फलित आहे. हे निकाल सर्वांगीण शिक्षण तसेच आत्मविश्वासपूर्ण आणि भविष्याभिमुख विद्यार्थ्यांची जडणघडण करण्याच्या आमच्या बांधिलकीचेही प्रतीक आहेत. सर्व विद्यार्थ्यांचे त्यांच्या कठोर परिश्रमाबद्दल आम्ही मन:पूर्वक अभिनंदन करतो आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देतो. टॉपर आणि सर्व विद्यार्थ्यांचे त्यांच्या प्रशंसनीय कामगिरीबद्दल अभिनंदन.

# केडगावच्या पशुवैद्यकीय दवाखान्याचा 'हायटेक' कायापालट; महिला डॉक्टरने दुचाकीवरून फिरत बदलले ग्रामीण अर्थकारणाचे चित्र

## लोकसहभागातून साकारला राज्यातील पहिला 'बोलका दवाखाना'; एक्स-रे, सोनोग्राफीसह जनावरांसाठी 'कॉर्पोरेट' सेवा

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पाटस :** ग्रामीण भागातील अर्थकारणाचा कणा समजल्या जाणाऱ्या पशुपालन क्षेत्राला आधुनिकतेची जोड दिली, तर काय क्रांती घडू शकते, याचे आदर्श उदाहरण दौंड तालुक्यातील केडगाव पशुवैद्यकीय चिकित्सालयाने (श्रेणी १) घालून दिले आहे. गेल्या काही वर्षांत या दवाखान्याचा झालेला कायापालट आणि पशुधन विकास अधिकारी डॉ. चैत्राली अशोक आव्हाड यांच्या धाडसी कामगिरीमुळे केडगाव आणि परिसरातील ८ ते १० गावांमधील पशुपालकांसाठी हा दवाखाना एक मोठा तारणहार ठरला आहे.

शेतकऱ्यांची जनावरे आजारी पडल्यास किंवा कठीण प्रसूतीची वेळ आल्यास पूर्वी उपचारासाठी शहराकडे धाव घ्यावी लागायची, ज्यामध्ये मोठा आर्थिक भुर्दंड बसायचा. मात्र, डॉ. चैत्राली आव्हाड यांनी केडगाव येथे पदभार स्वीकारल्यापासून या परिस्थितीला पूर्णपणे पूर्णविराम दिला आहे.

केडगावच्या या सरकारी दवाखान्यात आता खाजगी कॉर्पोरेट हॉस्पिटल दर्जाच्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. जिल्हा परिषद आणि लोकसहभागाच्या माध्यमातून येथे अत्याधुनिक एक्स-रे मशीन, सोनोग्राफी मशीन आणि जनावरांच्या रक्ताच्या सर्व प्रकारच्या चाचण्यांची सोय करण्यात आली आहे. कठीण शस्त्रक्रियांसाठी येथे अद्ययावत 'ऑपरेशन थिएटर' सज्ज करण्यात आले असून, शेतकऱ्यांना आता उपचारासाठी कुठेही बाहेर जाण्याची गरज उरलेली नाही.

विशेष म्हणजे, लोकसहभागातून राज्यातील पहिला "बोलका पशुवैद्यकीय दवाखाना" ही संकल्पना येथे राबविण्यात आली असून, यामुळे शासकीय कार्यालयाची संपूर्ण प्रतिमाच बदलून गेली आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातून येऊन पुणे जिल्ह्यात आपली सेवा बजावणाऱ्या डॉ. चैत्राली आव्हाड या केवळ कार्यालयात न बसता स्वत: दुचाकीवरून दररोज ८० ते ९० किलोमीटरचा प्रवास करतात. कार्यक्षेत्रातील केडगाव, बोरीपार्धी, हंडाळवाडी, वाखारी, धुमळीचा मळा, देशमुख मळा, पाटील निंबाळकर वस्ती अशा अनेक वाड्या-वस्त्यांवर जाऊन त्यांनी थेट गोठ्यात जनावरांवर उपचार केले आहेत. गेल्या चार वर्षांत त्यांनी ५०० हून अधिक कठीण शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडल्या आहेत, ज्यात गायींचे अवघड सिझेरियन, डोळ्यांचे आणि हाडांचे कॅन्सर रोगांचे ऑपरेशन समाविष्ट आहे.



दवाखान्याने गेल्या चार वर्षांत नोंदवलेली आकडेवारी ग्रामीण भागातील त्यांच्या प्रभावाची साक्ष देते. १) एकूण औषधोपचार (केसेस) : २५,६५१, २) लसीकरण : १,१८,०८९ जनावरे, ३) कृत्रिम रेतन व गर्भ तपासणी : ९,६०० हून अधिक, ४) शेतकरी व महिलांचे १५० पेक्षा जास्त शिबिरांचे आयोजन. याशिवाय, चौफुला येथील 'श्री बोरमलनाथ गोशाळा ट्रस्ट' मधील शेकडो गरजू गोधनावर त्यांनी पूर्णपणे मोफत उपचार करून सामाजिक बांधिलकी देखील जपली आहे. डॉ. आव्हाड यांच्या या गतिमान आणि पारदर्शक कार्याची दखल राज्य स्तरावरही घेतली गेली आहे. 'भारतीय गुणवत्ता परिषदे'मार्फत राबविण्यात आलेल्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेत केडगावच्या या पशुधन विकास अधिकारी कार्यालयाला पुणे जिल्ह्यात प्रथम क्रमांकाचा बहुमान मिळाला आहे.

ग्रामीण भागात गोठ्यातील बहुतांश कामे महिला करत असतात. हीच बाब ओळखून डॉ. आव्हाड यांनी महिला पशुपालकांसाठी ५० हून अधिक विशेष कार्यशाळा आयोजित केल्या. यामुळे महिलांचा पशुपालनातील 'सक्रिय सहभाग' तर वाढलाच, सोबतीला त्यांच्यात आधुनिक वैद्यकीय ज्ञानाची जनजागृती देखील निर्माण झाली आहे. एका महिला डॉक्टरने पुरुषप्रधान समजल्या जाणाऱ्या या क्षेत्रात आपल्या कौशल्याच्या आणि जिद्दीच्या जोरावर निर्माण केलेला हा आलेख संपूर्ण राज्यासाठी कौतुकास्पद आणि प्रेरणादायी ठरत आहे.

## संक्षीप्त वृत्त

### मानसी जोशी रॉय यांच्या घरी बनवलेला उंधियू आता 'लक्ष्मी निवास'च्या कलाकारांसाठी एक आवडती परंपरा बनली आहे!

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** झी टीव्हीवरील 'लक्ष्मी निवास' ही मालिका मध्यमवर्गीय कुटुंबाचे जीवन, नातेसंबंध आणि माणसांना एकत्र बांधणाऱ्या आपुलकीचे भावपूर्ण चित्रण करून प्रेक्षकांच्या मनाला भिडत आहे. विशेष म्हणजे हीच आपुलकी आणि जिव्हाळा फक्त पडद्यावरच नाही, तर सेटवरही खास करून जेवण आणि एकत्र येण्याच्या क्षणांमध्ये दिसून येतो. या मालिकेत लक्ष्मीची भूमिका साकारत असलेल्या अनुभवी अभिनेत्री मानसी जोशी रॉय यांनी नकळत झी टीव्हीच्या एका सेटवरून दुसऱ्या सेटपर्यंत एक गोडशी परंपरा पुढे चालू ठेवली आहे. 'माँ भी सास बहू थी' या मालिकेदरम्यान त्या नेहमी घरचे बनवलेला उंधियू सेटवर आणायच्या आणि त्याची कलाकार आणि टीममधील सगळेचजण आतुरतेने वाट पाहायचे. अनेक वर्षांनी 'लक्ष्मी निवास'च्या सेटवरही त्यांनी हीच परंपरा कायम ठेवली आहे आणि त्यामुळे जेवणाची वेळ ही आता संपूर्ण टीमसाठी एका छोट्या उत्सवासारखी असते.

### ओतूरला संत निरंकारी सत्संग सोहळ्यात ७५ भाविकांनी केले रक्तदान

■ जनप्रवास प्रतिनिधी

**ओतूर :** ओतूर (ता.जुन्नर) येथे संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने ओतूर येथे भव्य रक्तदान शिबीर आणि आध्यात्मिक सत्संग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात ७५ निरंकारी भक्तांनी आणि नागरिकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन माजी जि.प.सदस्य मोहित ढमाले व प्रवीण भांबुर्डेकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना प्रविण भांबुर्डेकर यांनी संत निरंकारी मिशन नेहमीच संकट काळात समाजाच्या पाठीशी उभे राहिले आहे मिशनच्या सामाजिक कार्याचे कौतुक यावेळी केले. या शिबिरात संकलित झालेले ७५ युनिट रक्त 'संत निरंकारी ब्लड बँक, विलेपार्ले' (मुंबई) यांच्या वैद्यकीय पथकाद्वारे संकलित करण्यात आले.

अध्यात्म ही अंतरीच्या प्रवासाची कसोटी

रक्तदान शिबिरानंतर सायंकाळी संत निरंकारी आध्यात्मिक सत्संग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात मुंबईवरून लाभलेले प्रचारक सोहन इंगवले यांनी उपस्थित भाविकांना संतवाणी अतिशय सोप्या शब्दांत समजावून सांगितली.


"अध्यात्म केवळ वर्षांचे नाही, तर तो अंतरीच्या प्रवासाचा मार्ग आहे," असे प्रतिपादन करत सोहन इंगवले म्हणाले की, "आपण अध्यात्माच्या मार्गावर १०, २०, ३० किंवा ४० वर्षांपासून चालत आहोत यापेक्षा, आपण देवाच्या किती जवळ पोहोचलो आहोत हे पाहणे अधिक महत्त्वाचे आहे. अध्यात्मात घालवलेली वर्षे मोजण्यापेक्षा, आपल्यात झालेला अंतर्गत बदल आणि ईश्वराशी जोडलेले नाते महत्त्वाचे आहे."

संसारात आणि कामात भगवंताचा शोध

सद्गुरू माता सुदीक्षा जी महाराज यांच्या दिव्य शिकवणीचा दाखला देत त्यांनी सांगितले की, "आपण ज्या घरात राहतो,तिथे पत्नी आणि मुलांमध्ये आपल्याला तो विठ्ठल (परमात्मा) दिसतो का ? किंवा आपण जे काम करतो, त्या कामात त्याची जाणीव होते का? हीच खरी अध्यात्माची कसोटी आहे." "सर्व सजीवांमध्ये आणि कर्मामध्ये भगवंताचे रूप पाहण्यासाठी ब्रह्मवेत्त्या सद्गुरूंची नितांत गरज असते. सद्गुरूंच्या माध्यमातून जेव्हा 'आत्मस्वरूप' परमात्म्याचे ज्ञान (ब्रह्मज्ञान) प्राप्त होते, तेव्हाच ही समतेची आणि प्रेमाची जाणीव शक्य होते," कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल डोके यांनी केले तर उपस्थित रक्तदात्यांचे व सत्संग साठी आलेल्या भक्तांचे आभार मनोज तांबे यांनी मानले

### ९६ वर्षांत जे घडले नाही ते यावर्षी घडले!

■ जनप्रवास प्रतिनिधी



**पुणे :** महाराष्ट्रातील सर्वांत विश्वासार्ह नागरी सहकारी बँकांपैकी एक असलेल्या एमबँक, दि मुस्लिम सहकारी बँक लिमिटेड, पुणे ने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये आपल्या ९६ वर्षांच्या इतिहासातील सर्वोत्तम कामगिरी नोंदवली आहे.

०% एनपीए, ९६ वर्षांत प्रथमच ७०० कोटींहून अधिक ठेवी, ९६ वर्षांतील सर्वाधिक नफा, भक्कम बॅलन्स शीट कायम राखली, प्रथमच ११०० कोटींच्या व्यवसायाचा टप्पा ओलांडला आहे. या घवघवीत यशाचे श्रेय तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, सेवांचा विस्तार आणि बँकिंग व्यवहार अधिक सुलभ व जलद करण्याला जाते. श्री. तन्वीर इनामदार, अध्यक्ष, एमबँक म्हणाले, "९६ वर्षांमध्ये आमच्या ग्राहकांनी, शेअरधारकांनी, संचालक मंडळाने आणि प्रत्येक कर्मचाऱ्याने आम्हाला जे दिले ते कोणत्याही आकड्यात मोजता येण्यासारखं नाही. त्यांच्या आमच्यावरील विश्वासाच्या आणि सहकार्याच्या जोरावर आम्ही आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये सर्वोत्तम कामगिरी करू शकलो. मी सर्वांचा मनापासून ऋणी आहे!"

आज एमबँक एकाच कुटुंबातील अनेक पिढ्यांना सेवा देत आहे. हे व्यवहाराच्या पलीकडे जाणारे विश्वासाचे नाते आहे. आधुनिक डिजिटल सुविधा आणि ग्राहककेंद्रित दृष्टिकोन यांच्या जोरावर एमबँक ने परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील दरी यशस्वीरित्या साधली आहे.

एमबँक बद्दल : एमबँक, द मुस्लिम को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी, ही पुणे मुख्यालय असलेली सहकारी बँक आहे. १९३१ मध्ये स्थापन झालेली ही बँक डिजिटल बँकिंग, कर्ज, ठेवी आणि विविध आर्थिक सेवा पुरवते. व्यक्ती आणि व्यवसायांसाठी सुलभ, तंत्रज्ञानाधारित आणि ग्राहक-केंद्रित बँकिंग सेवा देण्यावर एमबँक चा भर आहे.

### नेत्रदूत जालिंदर बोरुडे पुणे येथे राष्ट्रीय गौरव पुरस्काराने सन्मानित

■ जनप्रवास प्रतिनिधी



**अहिल्यानगर :** सामाजिक कार्यकर्ते तथा 'नेत्रदूत' म्हणून ओळख असलेले जालिंदर बोरुडे यांना पुणे येथील आनंदी युनिव्हर्सल फाउंडेशनच्या वतीने राष्ट्रीय गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

बालगंधर्व सभागृह येथे झालेल्या सन्मान सोहळ्यात पुणे रोटरी क्लबचे अध्यक्ष अशोक सिंघानिया व अभिनेत्री नेहा घोणसे यांच्या हस्ते बोरुडे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश विटकर, सचिव तेजस्विनी दिवटे, उद्योजक कांतीलाल कटारिया आदी उपस्थित होते. अशोक सिंघानिया म्हणाले की, जालिंदर बोरुडे यांचे कार्य हे समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून निस्वार्थ भावनेने नेत्रसेवा करत हजारो लोकांना नवजीवन दिले आहे. फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी केलेले कार्य हे खऱ्या अर्थाने गरजूंना नवसंजीवनी ठरत आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यात शेअर मार्केटच्या नावाखाली मोठा घोटाळा उघड; मुख्य आरोपीला ५ दिवसांची पोलीस कोठडी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** शेअर मार्केटमध्ये दरमहा १२ ते १५ टक्के परताव्याचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याप्रकरणी भिंगार येथील ऋषिकेश दत्तात्रय तोरडमल याच्यासह ११ जणांविरोधात कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. न्यायालयाने मुख्य आरोपी ऋषिकेश तोरडमल याला ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या घोटाळ्याची रक्कम ७ ते ८ कोटी रुपयांपर्यंत असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

प्रकरण काय आहे?

१. तक्रारदार: तानसेन सुरेश बिवाल (वय ३७, रा. राहुरी), मनीष दीपक सोलंकी (वय ३५) आणि कविता दीपक सोलंकी (वय ५२, दोघे रा. कॅन्टोमेंट चाळ, भिंगार) यांनी फिर्याद दिली आहे.

२. आरोपी: ऋषिकेश दत्तात्रय तोरडमल, दत्तात्रय नरहरी तोरडमल, मनिषा दत्तात्रय तोरडमल, प्रतीक्षा दत्तात्रय तोरडमल (सर्व रा. माधवबाग, भिंगार), कोमल गणेश क्षीरसागर, गणेश क्षीरसागर (बालमटाकळी, शेवगाव), वृषाली सचिन भालेराव, सचिन भालेराव (आलमगीर, भिंगार), प्रतिक गुरव (पाथर्डी), किरण तोरडमल (बारादरी) आणि सागर तोरडमल (विमाननगर, पुणे) यांच्याविरोधात गुन्हा नोंद आहे.

३. कंपन्यांची नावे : 'गोल्डन गेट फिन्सर्व' तसेच 'आर.एस.ग्रुप ऑफ बिझनेस' या नावाने गट काम करत होता.

फसवणुकीची पद्धत : आरोपींनी शेअर मार्केट गुंतवणुकीसाठी दरमहा १२ ते १५ टक्के परतावा मिळेल, असे आमिष दाखवले. त्यांच्या आश्वासनांवर विश्वास ठेवून फिर्यादींनी २६ मार्च २०२५ नंतर वेगवेगळ्या टप्प्यांत मिळून तब्बल २० लाख ४० हजार रुपये जमा केले. सुरुवातीला काही प्रमाणात परतावा दिल्यानंतर देणे बंद करण्यात आले. परतावा व मूळ रकमेबाबत विचारणा केली असता आरोपींनी टाळाटाळ सुरू केली आणि काही आरोपी पसार झाले.

गुन्हा कसा दाखल झाला?

फसवणुकीची खात्री झाल्यावर तिघांनी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. मात्र, तक्रार असूनही गुन्हा नोंदवला न गेल्याने गुंतवणूकदारांनी विशेष जिल्हा सत्र न्यायालयात खासगी फिर्याद दाखल केली. न्यायाधीश महेश लोणे यांनी कोतवाली पोलिसांना तातडीने गुन्हा दाखल करून तपास करण्याचे आदेश दिले.

गुंतवणूकदारांच्या वतीने ॲड. शुभम साके यांनी न्यायालयात बाजू मांडली. पोलिस तपास व पुढील कारवाई

कोतवाली पोलीस सध्या अधिक तपास करीत आहेत. मुख्य आरोपी ऋषिकेश तोरडमल याला अटक करून न्यायालयात हजर केले असता ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. स्थानिक सूत्रांनुसार या टोळीने अहिल्यानगर, राहुरी, शेवगाव परिसरातील अनेक गुंतवणूकदारांना गंडा घातला असून एकूण घोटाळ्याची रक्कम ७ ते ८ कोटी रुपयांच्या घरात जाण्याची शक्यता आहे.

पार्श्वभूमी : शेवगाव तालुक्यात शेअर मार्केटच्या नावाखाली जून २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत एकूण ३८ गुन्हे दाखल झाले असून २८ आरोपींना अटक झाली आहे. या घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर एसआयटी चौकशीची मागणी होत आहे.

शेतकरी व गुंतवणूकदारांसाठी सूचना: शेअर मार्केट किंवा कोणत्याही योजनेत गुंतवणूक करण्यापूर्वी संबंधित कंपनी डएइख नोंदणीकृत आहे का, याची खात्री करा. अवास्तव परताव्याच्या आमिषाला बळी पडू नका. फसवणूक झाल्यास तातडीने जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवा.

## कोतवाली परिसरात तरुणावर लाकडी दांडक्याने हल्ला; पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल. दोन आरोपी अटक

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत जाधवनगर परिसरात जुन्या वादातून एका तरुणासह त्याच्या मित्राला मारहाण झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादीस कोतवाली दिवसापासून भेटलो नाही, आज भेटायला ये असा फोन करून बोलाविण्यात आले होते. त्यानुसार फिर्यादी व त्यांचा मित्र निखील चव्हाण हे मोटारसायकलवरून जाधव पेट्रोल पंपाजवळ आले होते. त्यावेळी संबंधित ठिकाणी घरगुती वाद सुरू असल्याने दोघेही साई हॉस्पिटलसमोर, जाधवनगर कल्याण रोड येथे थांबले होते.

दरम्यान, आरोपी सनी जाधव याने फिर्यादीला तु इथे काय करत आहेस? असे म्हणत हुज्जत घालून शिवीगाळ सुरू केली. त्यानंतर सनी जाधव याने फिर्यादीची गचांडी पकडून मारहाण केली. यावेळी त्याचे मित्र समीर जहागीरदार, प्रमोद दाणे तसेच भाऊ अक्षय जाधव यांनीही मारहाणीत सहभाग घेतला. अ

ारोपी राजेंद्र जाधव यांनी लाकडी दांडक्याने फिर्यादीच्या डोक्यावर वार केल्याने तो जखमी झाला.

फ ि य ा र् द ी ल ा वाचविण्यासाठी मध्ये पडलेल्या निखील चव्हाण यालाही आरोपींनी मारहाण करून डोक्याला दुखापत केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. जखमींनी उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात धाव घेत उपचार घेतले.

या प्रकरणी सनी जाधव, राजेंद्र जाधव, समीर जहागीरदार, प्रमोद दाणे व अक्षय जाधव, सर्व रा. जाधवनगर कल्याण रोड, अहिल्यानगर यांच्याविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण पाटील.पो. हे. कॉन्स्टेबल याकुप सय्यद तपास करीत आहेत.

## अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सफाई कामगार महिलेला मारहाण; गुन्हा दाखल

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** महानगरपालिकेच्या सफाई कामगार महिलेला घरात बोलावून घेऊन त्यांच्यावर हल्ला करत गैरवर्तन केल्याची घटना समोर आली आहे. या हल्ल्यात पीडित ३१ वर्षीय महिला जखमी झाल्या असून त्यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांनी दिलेल्या जबाबावरून तोफखाना पोलीस ठाण्यात चार महिलांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

येथील वारूळाचा मारूती परिसरात राहणार्या चार महिलांविरूध्द शनिवारी (१६ मे) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची घटना १३ मे रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला महानगरपालिकेत सफाई कामगार म्हणून काम करतात. त्या आपले काम संपवून घरी परतल्या असता, संशयित आरोपी महिला तेथे आली व माझ्या बहिणीच्या घरात चल असे म्हणून फिर्यादीला घरामध्ये नेले. फिर्यादी महिला तिथे गेल्या असता, तुझे आधारकार्ड माझ्या पतीच्या मोबाईलमध्ये कसे आले या कारणावरून वाद उकरून काढण्यात आला. आधारकार्डचा जाब विचारत तिथे उपस्थित असलेल्या चार संशयित महिलांनी फिर्यादीला मारहाण केली.

## महाराष्ट्र राज्य एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना पुणे जिल्हा यांच्या वतीने विद्यार्थ्यांचा गुणगौरव

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

**इंदापूर :** महाराष्ट्र राज्य एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना पुणे जिल्हा यांच्यावतीने काल इंदापूर येथे गुरुकृपा सांस्कृतिक भवन येथे भव्य दिव्य असा इयत्ता दहावी व बारावी परीक्षेमध्ये प्रथम तीन आलेले क्रमांक यांचा ट्राफि, पुस्तक,प्रमाणपत्र, देऊन त्यांचा उपस्थिती मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाची सुरुवात अध्यक्षांची निवड करून अध्यक्ष व मान्यवरांच्या हस्ते दीप प्रजनन करून तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ज्योतिबा फुले आनंद दिघे बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

यावेळी या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून एकनाथ स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष बापूसाहेब अडसूळ सर तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मंगेश चिवटे यांचे बंधू महेश चिवटे उपस्थित होते तसेच यावेळी प्रमुख उपस्थित पाहुणे म्हणून पुणे विभागीय मुख्याध्यापक संघ अध्यक्ष महाराष्ट्र राज्य रामभाऊ पाडोळे सर तसेच इंदापूर तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष जगन्नाथ पाटील सर पश्चिम महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे विभागीय अध्यक्ष रमेश राऊत राष्ट्रवादी पार्टी मा.विरोधी पक्षनेता पोपट शिंदे एकनाथ शिंदे गट इंदापूर शहराध्यक्ष एडवोकेट आनंद केकान, भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा इंदापूर शहर अध्यक्ष लखन भैय्या जगताप, सागर घरत, मोहन शिंदे गणेश



गवळी विठ्ठल शिंदे सचिन लोंढे दीपक वडापुरे, भारत हरणावळ सर प्रा. नेताजी कॉलेज मोहोळ काशीद सर, मुख्याध्यापक प्रवीण लोंढे, शिक्षक सोसायटी चेअरमन अवसरी नाना घळके, महिला पोलीस मित्र संघटना अध्यक्ष रेश्मा शेख तसेच महादेवी सोननिस, अनिता मखरे, एकनाथ स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष वैभव शेटे, इंदापूर हिंदी अध्यापक संघाचे मा. अध्यक्ष राज रणमोडे सर,अरुणा कवडे मॅडम तसेच इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना वैभव शेटे सर यांनी केली तर प्रमुख पाहुणे यांनी उपस्थित विद्यार्थी विद्यार्थिनी व पालक यांचे कौतुक करून त्यांना

> या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय गवळी सर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

प्रेरणा दिली तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी पुणे जिल्हा एकनाथ स्वाभिमान शिक्षक संघटनेची कार्यकारणी निवड करण्यात आली. यावेळी इंदापूर तालुक्यातील साठ शाळेतील दोनशे विद्यार्थ्यांना ट्रॉफी शैक्षणिक पुस्तक व प्रमाणपत्र व गुलाब पुष्प देऊन विद्यार्थी पालक मुख्याध्यापक यांना गौरवण्यात आले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी पालक व शिक्षक मुख्याध्यापक हजारोच्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्वांना नाष्ट्याची सोय करण्यात आली होती. हा कार्यक्रम जवळजवळ चार तास सुरू होता यावेळी उपस्थित सर्व विद्यार्थी पालक यांच्या मध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते उपस्थित पालक व मान्यवरांनी या कार्यक्रमाचे कौतुक करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना पुणे जिल्हा अध्यक्ष दत्तात्रय गवळी सर यांनी केले तर आभार प्रदर्शन दीपक वडापुरी सर यांनी केले या कार्यक्रमासाठी एकनाथ स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## निमगाव वाघा येथे सहावे राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलन उत्साहात

### छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना अभिवादन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेले सहावे राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलन उत्साहात आणि वैचारिक वातावरणात पार पडले. ग्रामीण भागातील साहित्य, संस्कृती, लोकपरंपरा आणि समाजप्रबोधनाचा जागर घडविणाऱ्या या संमेलनात राज्यभरातील साहित्यिक, कवी, शाहिर, समाजप्रबोधक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

हे साहित्य संमेलन स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय आणि श्री नवनाथ युवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. ग्रामीण भागातील ज्येष्ठ आणि नवोदित साहित्यिक, कवी, शाहिर, कथाकथनकार यांच्या विचारांची समृद्ध मैफल या संमेलनात रंगली. साहित्याच्या माध्यमातून समाजप्रबोधन, संस्कार, सामाजिक ऐक्य आणि सकारात्मकतेचा संदेश देत या संमेलनाने ग्रामीण भागात



वैचारिक चळवळीचा जागर घडविला.

शाहिरी पोवाडे, काव्यवाचन, सामाजिक आशयाची गीते आणि विविध सादरीकरणांमधून मुलगी वाचवा, मुलगी शिकवा, सार्वजनिक स्वच्छता, सामाजिक जबाबदारी, इतिहास जागर आणि समाजातील विविध प्रश्न प्रभावीपणे मांडण्यात आले. ग्रामीण संस्कृती आणि साहित्य परंपरेचा सुरेख संगम या संमेलनात अनुभवायला मिळाला.

संमेलनाचे उद्घाटन अहमदनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे आणि वालचंदनगर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक तथा राष्ट्रपती पोलीस पदक विजेते रतीलाल चौधर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. प्रारंभी छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कवी संमेलन चंद्रकांत चाबुकस्वार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. मुख्याध्यापक चाँद हुसेन शेख यांच्या गीत सादरीकरणाने सभागृह मंत्रमुग्ध झाले. मेरी प्यारी माँ... या गीतापासून सुरुवात करत त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्यावरील पोवाड्यांनी संपूर्ण सभागृह दणाणून सोडले. ग्रामीण कवी गीताराम नरवडे, देवीदास बुधवंत, उमेश गोरे, रमेश चव्हाण, दत्तात्रय फलके तसेच कथाकथनकार बाळासाहेब देशमुख यांनी विविध सामाजिक आणि प्रेरणादायी विषयांवर काव्य व कथांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदिप रासकर यांनी केले, तर आभार संदीप डोंगरे यांनी मानले.

# मोबाईलवर फिरणाऱ्या अंगठ्यात आलेला मेंदू वाचनातून डोक्यात नेऊन ठेवण्याचे आव्हान : लेखक शरद तांदळे

### अहिल्यानगर जिल्हा वाचनालय व्याख्यानमालेत "व्यक्तिमत्वाची जडणघडण" व्याख्यानास प्रचंड प्रतिसाद

■ जनप्रवास प्रतिनिधी

**आहिल्यानगर :** मानवी संवेदना कुंठीत होत असताना मोबाईलवर दीड मिनिटाच्या रिल फिरणाऱ्या अंगठ्यात "मेंदू" आला आहे. वाचन, संवाद ,पुस्तके यांच्या माध्यमातून मेंदूला पुन्हा "डोक्यात" नेऊन ठेवण्याचे आव्हान आज समोर ठाकले असून त्यासाठी प्रत्येकाने "डेली रीडर" बना असे कळकळीचे आवाहन जागतिक कीर्तीचे लेखक, वक्ते शरद तांदळे यांनी व्यक्त केले. अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात आयोजित वसंत व्याख्यानमालेत "व्यक्तिमत्त्वाची जडणघडण" या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते .यावेळी वाचनालयाचे उपाध्यक्ष दिलीप पांढरे, डॉ. राजा ठाकूर, प्रा.ज्योती कुलकर्णी, शिल्पा रसाळ, राहुल तांबोळी, किरण आगरवाल,ग्रंथपाल अमोल इथापे ,नितीन भारताल,पल्लवी कुकडवाल आदी उपस्थित होते.

लेखक शरद तांदळे यांनी जीवनातल्या वेगवेगळ्या टप्प्याचा वाचन प्रवास त्यातील प्रेरणा प्रेरणादायी पद्धतीने सांगताना उपस्थितांना आत्मपरीक्षण करावयास भाग पाडले. "आपण आपल्या जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर वेगवेगळे साहित्य वाचन करतो परंतु ते अत्यंत



सुमार तर कधी केवळ दाखविण्यासाठी असते. अशातून अनेक अनेक जण नको त्या वयात "बोलायला" लागतात. त्यामध्ये सोशल मीडियावर फिरणारी खोटे मेसेज यातून होणारे "मनभेद" घातक आहेत. दूषित वातावरणात दुर्दैवाने महापुरुषांचे साहित्यही आता जाती जातीत वाटले जाऊ लागले आहे. यातून मेंदू खराब होण्यास सुरुवात झाली आहे. यामधून मुलांनी नेमके काय वाचायचे? हा प्रश्न अनुत्तरित आहे.

सोशल मीडियामुळे अनेक गोष्टी समोर येऊ लागल्या आहेत. अगदी बालवयातील मुले "चंपक'ल' न वाचता "हॅरीपॉटरची'ब मागणी जेव्हा करतात तेव्हा बालसाहित्यिकांसमोर नव्या पिढीला आंतरराष्ट्रीय दर्जाच्या साहित्याची निर्मिती करणे हे मोठे आव्हान असल्याचे तांदळे म्हणाले .

# राष्ट्रवादीच्या रेट्यामुळे अखेर प्रभाग क्र.११ मधील रस्त्याच्या कामांना प्रारंभ : नगरसेविका सौ.सोनम त्रिभुवन

■ जनप्रवास वार्ताहार

**कोळपेवाडी :** कोपरगाव शहरातील प्रभाग क्र. ११ मधील रस्त्यांच्या कामांचे भूमिपूजन होवून नागरीकांना हि कामे लवकरात लवकर पूर्ण होणे अपेक्षित होती. परंतु कोपरगाव नगरपरिषदेच्या अडचणीमुळे हि कामे सुरु होत नव्हती. त्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांनी अनेकवेळा मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देवून पाठपुरावा सुरु होता. त्या पाठपुराव्यातून अखेर या रस्त्याच्या कामांना सोमवार (दि.१८) पासून प्रारंभ झाला असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेविका सौ.सोनम त्रिभुवन यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.



प्रसिद्धी पत्रकात नगरसेविका सौ.सोनम त्रिभुवन यांनी पुढे असे म्हटले आहे की, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरी सेवा सुविधा पुरविणे अंतर्गत प्र.क्र.११ मधील वाघ घर ते कन्या शाळा रस्ता अंतर्गत रस्ता करणे (६० लाख), व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत बालाजी अंगण ते किरण मवाळ घर रस्ता डांबरीकरण करणे (८.४५ लाख) अशा एकूण ६८.४५ लाखाच्या रस्त्यांच्या कामांसाठी आमदार आशुतोष काळे यांनी निधी उपलब्ध करून दिला होता व आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते मागील चार ते पाच महिन्यापूर्वी या कामाचे भूमिपूजन देखील झाले होते.परंतु कोपरगाव नगरपरिषदेच्या अडचणीमुळे हि कामे सुरु होत नसल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने अनेकवेळा कोपरगाव नगरपरिषदेला निवेदने दिली.

विकासकामांना वेळेवर निधी उपलब्ध होत नाही येथे तर आमदार आशुतोष काळे यांनी निधी देवूनही विकासकामे सुरु होत नसल्यामुळे नागरीकांच्या अडचणी वाढल्या होत्या.पावसाळा काही दिवसांवर येवून ठेपला असतांना तत्पूर्वी रस्त्यांची कामे होणे गरजेचे आहे. अन्यथा पावसाळा सुरु झाल्यानंतर रस्त्याची कामे होणार नव्हती आणि पावसाळ्यात रस्ता डांबरीकरण कामे करणे शक्य देखील नव्हते. त्यामुळे या रस्त्याच्या कामांना लवकरात लवकर सुरुवात व्हावी यासाठी सुरु असलेल्या पाठपुराव्यातून अखेर या रस्त्याच्या कामांना सोमवार (दि.१८) पासून प्रारंभ झाला आहे. त्यामुळे प्र.क्र.११ मधील नागरीकांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले असून नागरीकांनी आमदार आशुतोष काळे व रस्त्याचे काम सुरु व्हावे यासाठी पाठपुरावा करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांचे आभार मानले आहे.

# जामा मस्जिदचे मौलाना रफिक शाह हज यात्रेसाठी रवाना

■ जनप्रवास प्रतिनिधी

**कर्जत :** राहाता प्रतिनिधी

इस्लाम धर्मात अत्यंत पवित्र मानल्या जाणाऱ्या हज या धार्मिक यात्रेसाठी राहाता शहरातून जाणारे जामा मस्जिदचे मौलाना रफिक शाह यांचा राहाता शहरातील हिंदू व मुस्लिम बांधवांसह सर्व शहरवासीयांचे वतीने नगराध्यक्ष डॉ.स्वाधीन गाडेकर व इतर मान्यवरांनी सत्कार करून त्यांना हज यात्रेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत



याप्रसंगी नगराध्यक्ष डॉ स्वाधीन गाडेकर म्हणाले की आपली हज यात्रा व्हावी हे प्रत्येक मुस्लिम बांधवांचे स्वप्न असते कारण इस्लाम धर्मात या यात्रेला अत्यंत पवित्र मानले जाते राहाता शहरातील जामा मस्जिद चे मौलाना रफिक शाह हे बुधवार दि २० रोजी हज यात्रेसाठी जात आहे त्यांना हे मोठे भाग्य लाभले आहे त्यांचे परिवाराचे दृष्टीने हा मोठा अविस्मरणीय व आनंदी क्षण आहे या पवित्र यात्रेसाठी आपणा सर्वांच्या वतीने त्यांना शुभेच्छा राज्याचे जलसंपदा मंत्री आपणा सर्वांचे आधारस्तंभ ना. राधाकृष्ण विखे पाटील व भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष डॉ सुजयदादा विखे पाटील यांनी कार्यकर्ता म्हणून आपणा सर्वांना नेहमीच मानवता एकात्मता व जातीय सलोखा हा संस्कार दिला आहे त्यामुळे शिर्डी मतदारसंघ हिंदू मुस्लिम ऐक्याचे दर्शन घडविणारा दिशादर्शक आहे हिंदू मुस्लिम बांधव एकमेकांचे सण-उत्सव अगदी आनंदात व उत्साहात साजरे करतात हे त्याचे प्रतीक आहे मौलाना रऊफ शाह हज यात्रेसाठी जात आहे व आपण सर्व त्यांना शुभेच्छा देतो हा एक अनोखा क्षण आहे त्यांची हजयात्रा मनोकामना पूर्ण करणारी व आरोग्यदायी संपन्न होवोत अशा सदिच्छा यावेळी त्यांनी दिल्या. राहाता नगरपरिषदेचे नगरसेवक तथा गटनेते हाजी मुन्नाभाई शहा याप्रसंगी आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले की राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष डॉ.सुजय दादा विखे पाटील यांचे नेतृत्व मार्गदर्शन व संकल्पनेतून या मतदारसंघात मानवता व जातीय सलोखा अत्यंत प्रामाणिकपणे जपला जातो याचा मुस्लिम समाजाला विशेष अभिमान आहे शिर्डी मतदारसंघात सर्व जाती धर्माचे लोक अत्यंत गुण्यागोविंदाने राहतात येथील जातीय सलोखा व हिंदू मुस्लिम बांधवांचे ऐक्य राज्यात दिशादर्शक व आदर्श दर्शविणारे आहे येथील मुस्लिम समाज बांधवांची पिढ्यान पिढ्या विखे पाटील परिवारावर नितांत श्रद्धा व अतूट विश्वास आहे मुस्लिम समाजासाठी विविध योजनांचा लाभ तर दिला आहे तसेच कब्रस्तानसाठी जागेची गरज होती मंत्री विखे पाटील यांनी कोट्यावधी रुपयांची जमीन मुस्लिम बांधवांना कब्रस्तानसाठी दिली आहे हे राज्यातील एकमेव उदाहरण आहे असे नेतृत्व राज्यात दुसरे कुठेही आढळणार नाही त्यामुळे विखे पाटील जिथे असतात तिथे मुस्लिम समाज नेहमीच त्यांच्या सोबत राहतो व त्यांचे नेतृत्वाखाली वाटचाल करीत असतो हा पायंडा कधीच मोडू शकणार नाही असे राहाता नगरपरिषदेचे गटनेते हाजी मुन्नाभाई शाह यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

# शिर्डीत खासगी क्षेत्रातील देशातील सर्वात मोठ्या संरक्षण कारखान्याचे २३ मे रोजी संरक्षणमंत्र्यांच्या हस्ते उद्‌घाटन !

## जिल्ह्यात संरक्षण उत्पादन क्षेत्राला मोठी चालना !

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथमच मोठ्या प्रमाणावर संरक्षण साहित्य उत्पादन उद्योग उभा राहत असून, शिर्डी येथील सावळीविहिर औद्योगिक वसाहतीत उभारण्यात आलेल्या तोफगोळा उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन येत्या २३ मे रोजी संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांच्या हस्ते होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित राहणार असून, या प्रकल्पामुळे जिल्हा देशातील महत्त्वाचे संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून विकसित होणार असल्याची माहिती जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील व ग्लोब फोर्ज लिमिटेडचे संचालक तथा चेअरमन रविकांत यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली.

येथे प्रतिवर्षी ५ लाख तोफ गोळे तयार होणार असून खाजगी क्षेत्रात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणात क्षमता असलेला हा प्रकल्प आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी येथे राज्य शासनाने उपलब्ध करून दिलेल्या सुमारे सहाशे एकर जागेवर भव्य दारूगोळा निर्मिती संकुल उभारण्यात येत आहे. या संकुलात टीएनटी, आरडीएक्स, एचएमएक्ससारखी विविध स्फोटके व प्रणोदक तयार करणारे कारखाने उभारले जात असून, त्यासाठी सुमारे दोन हजार कोटी रुपयांची अतिरिक्त गुंतवणूक प्रस्तावित आहे. दरवर्षी वीस हजार



टन टीएनटी उत्पादनाची क्षमता येथे निर्माण होणार असून, सरकारी व खासगी क्षेत्रातील ही देशातील सर्वात मोठी क्षमता ठरणार आहे. टीएनटी व आरडीएक्स निर्मितीचे कारखाने पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित असून, त्यांचे उद्घाटन व सादरीकरण लवकरच होणार आहे.

या उद्घाटनाच्या निमित्ताने २३ व २४ मे रोजी विशेष संरक्षण प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. देशातील प्रमुख संरक्षण उत्पादन कंपन्या व शंभरहून अधिक सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग या प्रदर्शनात सहभागी होणार आहेत. जिल्हाभरातून नागरिक या प्रदर्शनाला भेट देतील व तरुणांसाठी संरक्षण क्षेत्रातील संधी जाणून घेण्याची ही मोठी संधी ठरणार असल्याचे पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

शिर्डी औद्योगिक वसाहतीतील सुमारे दोनशे एकर क्षेत्रावर विविध संरक्षण प्रकल्प विकसित करण्यात येत आहेत. यामध्ये रॉकेट लॉंचर, लांब पल्ल्याच्या रॉकेटचे सुटे भाग, स्वयंचलित ड्रोन व विविध इलेक्ट्रॉनिक यंत्रणांच्या चाचणी सुविधा विकसित केल्या जात आहेत. या प्रकल्पांसाठी सुमारे एक हजार कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित असून, त्यापैकी सहाशे कोटी रुपयांची गुंतवणूक पूर्ण झाली आहे. या माध्यमातून सुमारे दोन हजार नागरिकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होणार आहे. याच दिवशी प्रतिदिन पंधरा टन क्षमतेच्या बायो-सीएनजी प्रकल्पाचेही उद्घाटन करण्यात येणार आहे, असे जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले.

# कष्ट, जिद्द व चिकाटी असल्यास यश निश्चित : शिवाजीराव कपाळे



■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी फॅक्टरी :** दहावी, बारावी आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव करत साई आदर्श मल्टीस्टेटच्या वतीने गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना यशासाठी कष्ट, शिस्त आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचे महत्त्व पटवून देत त्यांचा सन्मान करण्यात आला.

दहावी, बारावी तसेच विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक साई आदर्श मल्टीस्टेटचे संस्थापक शिवाजीराव कपाळे यांनी केले.

यावेळी बोलताना शिवाजीराव कपाळे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी कष्ट, जिद्द आणि चिकाटी या त्रिसूत्रीचा अवलंब करणे आवश्यक आहे. सातत्यपूर्ण प्रयत्न आणि मेहनतीमुळे कोणतेही ध्येय साध्य करता येते, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले मंत्रालयातील माजी अधिकारी दत्ता कडू यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना गुणवत्ता, शिस्त आणि मेहनतीच्या बळावर विद्यार्थी निश्चितच यशाच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचू शकतात, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी व्यासपीठावर साई आदर्श पतसंस्थेच्या चेअरमन सौ. संगीता कपाळे, माजी नगराध्यक्षा ज्योतीताई त्रिभुवन,संचालक अविनाश साबरे, योग प्रशिक्षक किशोर थोरात, श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य बाबासाहेब शिरसाठ सर तसेच योगेश आंबेडकर, अजित येवले, रामेश्वर तोडमल, हॉलीबॉल चे प्रशिक्षक राजेंद्र पुजारी, सुनील संचेती आणि अन्सार शेख, दत्तात्रय गोपाळे,मॅनेजर सचिन खडके आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात दहावी-बारावी परीक्षेत उत्कृष्ट यश मिळविलेल्या विद्यार्थी तसेच हॉलीबॉल स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे नेतृत्व करणाऱ्या कर्णधार सानिका कोबरने व शिवनेरी क्लबच्या खेळाडूंचाही सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

# पत्रकार संघाची मागणी : संजयजी भोकरे यांना तातडीने ‘Z+’ दर्जाची पोलीस सुरक्षा द्या

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या श्रीगोंदा शाखेच्या वतीने राज्य संघटक, अंबाबाई तालीम संस्थेचे अध्यक्ष तथा दैनिक जनप्रवासचे समूह संपादक संजयजी भोकरे यांना तातडीने ‘झेड+’ दर्जाची पोलीस सुरक्षा प्रदान करण्यात यावी, अशी मागणी श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

पत्रकार संघाने दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संजयजी भोकरे यांच्या हत्येचा कट रचल्याप्रकरणी पोलिसांनी काही आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून देशी बनावटीची पिस्तुले, जिवंत काडतुसे तसेच धारदार शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. या घटनेमुळे पत्रकार संघटनांमध्ये तसेच परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, यापूर्वीही भोकरे यांचे पुत्र व डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला होता. त्यामुळे भोकरे कुटुंबाच्या सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर बनला असून, या प्रकरणामागील सूत्रधारांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



तसेच अंबाबाई तालीम संस्थेच्या जमिनीवर डोळा ठेवून काही समाजकंटकांकडून जीवे मारण्याचा कट रचला जात असल्याचा संशयही व्यक्त करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर संजयजी भोकरे यांना तातडीने ‘झेड+’ दर्जाची सुरक्षा देण्यात यावी, तसेच संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली.

यावेळी जिल्हाध्यक्ष दत्ता पाचपुते, तालुकाध्यक्ष राजू शेख, अंकुश तुपे, शिवाजी साळुंखे, पीटर रणसिंग, राम सोनवणे, राम कोळपे, माधव बनसोडे, आप्पा चव्हाण, सुभाष शिंदे, उपाध्यक्ष विजय मांडे, अंकुश शिंदे, दादा सोनवणे आदी उपस्थित होते.

# कोणतेही पिंपळाचं झाड तोडू नये त्याऐवजी त्याची पुनर्स्थापना करावी, हा उपक्रम आता हजारो सांगलीकरांचा सहभाग असलेल्या ट्री आर्मीपर्यंत येऊन ठेपला आहे : आमदार सुहास बाबर

■ जनप्रवास प्रतिनिधी

**सांगली :** जिल्ह्यातील खानापूर तालुक्यात एका आगळ्यावेगळ्या प्रकारच्या लष्करी शिस्तीचा हरित उठाव सुरु आहे अवघ्या सांगली जिल्ह्यात या अनोख्या उपक्रमाचा गवगवा पाहायला मिळतोय. जिल्ह्यातील तरुण आमदार सुहास बाबर यांच्या पुढाकारातून या हरित क्रांतीचं नेतृत्त्व पाहायला मिळत आहे. आडनिड्या ठिकाणी वाढलेलं पिंपळाचं झाड, तोडू नये त्याऐवजी त्याची पुनर्स्थापना करावी म्हणून सुरु झालेला प्रवास आता हजारो सांगलीकरांचा सहभाग असलेल्या ट्री आर्मीपर्यंत येऊन ठेपला आहे असं आमदार सुहास बाबर यांनी सांगितलं.

समाज माध्यमांवर पिंपळाची गोष्ट प्रसारित केल्यानंतर त्याला मिळालेल्या तुफान प्रतिसादातून हजारो लोकं जोडली गेली आणि दररोज जोडली जात आहेत. लोकं स्वयंप्रेरणेने जागा, पाणी, झाडं, श्रमदान करण्यासाठी पुढे येत आहेत. ट्री आर्मी असं नामकरण लोकांनीच केलं असल्याचं आमदार बाबर म्हणाले. आपल्या मातोश्रींच्या श्राद्ध दिवशी ५३०० आंब्याची कलमे रुजवल्याची माहिती त्यांनी दिली. तर विटा नागरपालिकेच्या नगरसेवकाने या उपक्रमाला प्रतिसाद म्हणून चार वर्षांची वाढलेली ५२ झाडं भेट दिली तसेच आळसंद ग्रामपंचायतीने ५०० झाडांचे रोपण केले आहे असे ते म्हणाले.

सांगलीचे जिल्हा प्रशासन, वन विभाग यांच्या माध्यमातून एक एकर जागेत जपानी पद्धतीचा मियावकी जंगल विकसित करण्याचे निश्चित केल्याची माहिती त्यांनी दिली. गायरान जमिनीवर, रस्त्यालगत महाराष्ट्राच्या मातीत नैसर्गिकपणे उगवणारी झाडे रुजवण्याचा उपक्रम मतदारसंघात आता सुरु आहे. पूर्वी जिल्ह्यात अनेक ठिकाणी रस्त्यांवर ‘‘ग्रीन टनेल‘‘ वाहनचालकांना विशेषतः दुचाकीस्वारांना सावली आणि थंडावा देत पण महामार्ग आणि रस्ता रुंदीकरणामुळे हे ग्रीन टनेल नाहीसे झाले, त्याला पूर्ववत करण्याचे ध्येय ठेवल्याचे आमदार बाबर यांनी सांगितले.



येत्या ५ जून रोजी होणाऱ्या वसुंधरा दिनानिमित्त अधिक प्रमाणात वड, पिंपळ, बहावा, करंज, चिंच अशा डेरेदार वृक्षांची लागवड सुरु आहे, त्यांच्या संगोपन आणि संवर्धनासाठी ट्री आर्मी कटिबद्ध असून जिल्ह्यातील विविध व्यक्ती, व्यापारी संघटना, संस्था उत्स्फूर्तपणे सहभागी होत आहेत. नोकरी धंद्यानिमित्त खानापूर आटपाडीपासून दूर राहणाऱ्या लोकांना पुन्हा एकदा आपल्या गावाशी नाळ जुळवायची असेल तर सहभागी व्हावे असे आवाहनही आमदार सुहास बाबर यांनी केले.

# नीट पेपरफुटी प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाईची मागणी; श्रीगोंदा विद्यार्थी-पालक कृती समिती आक्रमक

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** नीट २०२६ परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणामुळे देशभरातील लाखो विद्यार्थ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या मुख्य सूत्रधारांवर कठोर कलमांखाली कारवाई करण्यात यावी, अशी मागणी श्रीगोंदा तालुका विद्यार्थी-पालक कृती समितीचे समन्वयक नवनाथ दरेकर यांनी केली आहे.

प्रसारमाध्यमांशी बोलताना दरेकर म्हणाले की, वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी विद्यार्थी दिवस-रात्र मेहनत घेत असतात. मात्र, पेपरफुटीसारख्या घटनांमुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांचे नुकसान होत असून संपूर्ण परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास हादरला आहे. या घटनेमुळे विद्यार्थ्यांवर मानसिक ताण वाढल्याचे चित्रही दिसून येत असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रकरणात सीबीआयने प्रा. मनीषा मांढरे, प्रा. पी. व्ही. कुलकर्णी, संदीप मोटे गावकर, दिनेश बिवाल, मंगीलाल बिवाल, विकास बिवाल, यश यादव, शुभम खैरनार, धनंजय लोखंडे आणि मनीषा वाघमारे यांना अटक केल्याची माहिती देत दरेकर यांनी तपास अधिक व्यापक करण्याची मागणी केली.

पुण्यात सापडलेल्या धागेदोऱ्यांवरून या गैरप्रकारामागे मोठे रॅकेट कार्यरत असण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

### शासनाला उशिरा आलेली जाग

सन २०२२ पासून नीट परीक्षांमध्ये सातत्याने गोंधळ आणि गैरव्यवहाराच्या तक्रारी समोर येत असल्याचा आरोप नवनाथ दरेकर यांनी केला. पेपरफुटीच्या माध्यमातून काही शिक्षक, एजंट आणि कोचिंग क्लास चालकांनी मोठ्या प्रमाणावर आर्थिक फायदा मिळवल्याचेही त्यांनी म्हटले. नीट परीक्षा यापूर्वीच ऑनलाइन पद्धतीने घेणे आवश्यक होते. मात्र, आता पुढील वर्षापासून ऑनलाइन परीक्षा घेण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, हा निर्णय उशिरा घेतलेले शहाणपण असल्याची टीकाही दरेकर यांनी केली.

विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी संबंधित अशा गंभीर प्रकरणांमध्ये केवळ नियमित गुन्हे दाखल करून न थांबता दोषींना कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी भूमिका कृती समितीने मांडली आहे. तसेच, संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेतून निलंबित करावे आणि निवृत्त अधिकाऱ्यांचे निवृत्तीवेतन बंद करण्याची कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

दरेकर यांनी पुढे सांगितले की, वारंवार होणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता आणि नैराश्य वाढत आहे. त्यामुळे या प्रकाराकडे केवळ परीक्षा गैरव्यवहार म्हणून न पाहता समाजविघातक कृत्य म्हणून पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### दोषींना कठोर शिक्षा द्या

नीट पेपरफुटी प्रकरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड संताप आणि अस्वस्थता निर्माण झाली असल्याचे नवनाथ दरेकर यांनी सांगितले. या गैरप्रकारामुळे काही विद्यार्थ्यांवर गंभीर मानसिक परिणाम झाल्याचा दावा करत त्यांनी दोषींवर कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी केली. या प्रकरणातील आरोपींना सहज जामीन मिळू नये आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांना कायद्याने कठोर शिक्षा व्हावी, अशी भूमिका त्यांनी मांडली. अशा प्रकारच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांचा शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास कमी होत असल्याने शासनाने याकडे अत्यंत गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# सकारात्मक विचारांचे महत्व...

एका संशोधनानुसार, महिलांना नेहमी पती, मुलं, मित्र-मैत्रिणी, शेजारी आणि त्यांचं खासगी जीवन महत्त्वाचं वाटतं; पण स्वतःला मात्र त्या जमेत धरत नाहीत. कदाचित हा त्यांच्या उपजतच गुण असावा. दुसऱ्यांना सतत प्रसन्न ठेवणे. एवढेच त्यांना ठाऊक असते.स्त्रिया आपल्या आवडीच्या माणसांना खूष ठेवण्याचा जास्त प्रयत्न करतात. एक पत्नी आणि आईची भूमिका निभावताना आपल्याही काही प्राथमिक गरजा आहेत, हे त्या विसरूनच जातात. त्याचाच परिणाम म्हणून बऱ्याचशा स्त्रियांना आपल्याला जीवनातून काय मिळवायचंय हेच समजत नाह. स्वतःला महत्त्व देणे हे आरोग्य आणि मानसिक संतुलनासाठी आवश्यक आहे. आपल्या गरजा काय आहेत, हे समजून घेऊन आनंदी राहण्यासाठी त्या पूर्ण केल्या पाहिजेत. आपल्या गरजांना कुणीतरी दुसरे समजून घेतील या भरवशावर राहिल्यास पदरी केवळ निराशाच पडेल.

**नकारात्मक विचारांची साथ सोडा**

आशावादी राहूनच आपण सर्व अडचणींना तोंड देऊ शकतो. त्यांवर विजय मिळवू शकतो. पॉझिटिव्ह विचारांमुळे आपली इम्यून सिस्टिम चांगली राहाते. या पॉझिटिव्ह विचारांचे महत्त्व पाहाता आज कित्येक लहान-मोठ्या शहरांमध्ये लाफटर क्लब उघडण्यात आले आहेत.

**माइंड सेट बदला**

दुसऱ्यांच्या भरवशावर जगणं सोडून द्या. स्वतःवर विश्वास ठेवा. सर्वांत चांगले बनण्याच्या नादात स्वतःलाच



संपवू नका. आपल्या उणिवांसह स्वतःला स्वीकार करायला शिका. कधी-कधी तडजोड करायला काहीच हरकत नाही आणि हे तेव्हाच घडू शकते जेव्हा आपण स्वतःला त्या योग्यतेचे बनवू शकू. जीवनात व्यवस्थित राहून आपल्या प्राथमिकता ठरवा.

**आपल्या गरजा ओळखा**

तुम्ही जर तुमच्या गरजा ओळखू शकत नसाल, तर हीच गोष्ट तुम्हाला आतल्या आत सतावत राहील. याने, राग निर्माण होऊन तो तुमच्या व्यक्तिमत्त्व विकासास बाधक ठरू शकतो. विवेक आणि कर्तव्याचा जोरावरच आपल्याला आपला आनंद मिळवायचाय.

**जे मिळालंय, त्याचा आदर राखा**

आपल्याजवळ बरंच काही असतं; पण आपलं त्याकडे कधी लक्षच जात नाही. आपण जे काही मिळवलंय किंवा जे काही मिळालंय त्याचा आदर करायला शिका. इतरांवर एकसारखा आरोप करणे, ईर्ष्या करणे या गोष्टी सोडून द्या.

**पुढे चालता राहा**

कुणी जर आपल्याशी वाईट वागले असेल किंवा कुणी आपले वाईट केले असेल, तर एकसारखा तोच विषय डोक्यात घेऊन कुढत बसण्यापेक्षा त्यातून बाहेर पडावे. अन्यथा, त्यातून होणारे नुकसान आपल्यालाच भोगावे लागेल. हे जीवन एकसारखं मिळत नसतं; ते एकदाच मिळतं. त्यामुळे त्याला अशाप्रकारे वाया घालवू नका. 'क्षमा करा आणि विसरू जा' या नीतीचा अवलंब करून पुढे पुढे चालत राहा. असे केल्यास, जीवन तुमचे स्वागत करायला तुम्हाला आनंद द्यायला सदैव तयार असल्याचे दिसून येईल. वर्तमानात जगा आणि भरपूर एन्जॉय करा. अशा रीतीने जगा की, तुमच्या जीवनाकडे आणि जगण्याच्या ढंगाकडे पाहन लोकांनीच म्हणावे, ''व्वा ! लाइफ हो तो ऐसी.''

# एकाच छताखाली कसे राहाल...

पिढ्यांमधील अंतरामुळे विचारांत फरक होणे स्वाभाविक असते. म्हणूनच छोट्या क्षुल्लक बाबींबाबत एवढा तणाव पाळू नये की एका छताखाली राहाणे कठीण वाटू लागेल. एकमेकांच्या भावना समजून घ्या आणि जनरेशन गॅप मोकळ्या मनाने स्वीकारा.

■ सून आपल्या मैत्रिणीशी बराच वेळ बोलत होती. सासू फोनजवळच होती. त्यांचे काय बोलणे चालले आहे ते ती समजू इच्छित होती. सून जेवढे सांगायचे आहे तेवढेच सांगते व नंतर दुसऱ्या एखाद्या ठिकाणाहून फोन करावा असा विचार करते.

■ पूर्वीच्या व आताच्या परिस्थिती खूप वेगळ्या आहेत. पूर्वी दैनंदिन खर्च कमी असल्यामुळे कमी कमाईत भागात असे. हल्ली कामासाठी



जास्त वेळ द्यावा लागतो त्यामुळे शारीरिक, मानसिक ताण जास्त पडतो जो कमी करण्यासाठी मनोरंजनासाठी पैसा व वेळ खर्चावा लागतो.

■ आपल्याच सख्ख्या मुलाची व सुनेच्या दोषाला वा चुकीला इथे तिथे नावे ठेवत बसण्याऐवजी उत्तम गुणांची प्रशंसा कराल तर ते त्या सर्वांना आवडेल. आपण मुलांकडून सेवा आदराची अपेक्षा ठेवावी; पण थोडा पैसा सुरक्षिततेच्या दृष्टीने आपल्या नावावर ठेवावा. भावनेच्या भरात सारेच मुलांच्या नावावर करू नये.

मुलगा-सून

घरातील वडीलधाऱ्यांनी आपल्यासाठी खूप काही केले आहे. आता त्यांच्यासाठी करण्याची आपली पाळी आहे. कारण हाच घटनाक्रम आपली मुलेही पाहात व शिकत असतात.

■ जे विषय वादाचे असतील त्याबाबत गप्प राहाण्याचा प्रयत्न करावा. बहुतेक समस्या आपोआप सुटतात. आवेशाने बऱ्याच गोष्टी बिघडतात. वडीलधाऱ्यांना परकेपणाची, उपेक्षित असल्याची जाणीव होऊ देऊ नका. कारण वाढत्या वयातील कमजोरी व आजारी असल्याने बऱ्याचदा त्यांच्या मनात असुरक्षिततेची भावना येऊ लागते. त्यांच्या छोट्या छोट्या इच्छा व शौक पूर्ण करण्याचा प्रयत्न करा.

■■■

# मंगळसूत्र हे विवाह बंधनाचे प्रतिक...



मंगळसुत्राच्या धाग्यात काळे मणी व एक सोन्याचे लॉकेट ओवले जाते. तसे निरनिराळ्या प्रांतांत मंगळसूत्राच्या रचनेत बराच फरक असतो. विवाहाच्या दिवशी वधूच्या गळ्यात मंगळसूत्र बांधण्याचा रिवाज ६०० वर्षे जुना आहे. त्यापूर्वी पिवळ्या रंगाचा धागा ज्याला कनकबंधन संबोधले जात असे, वर-वधूंच्या मनगटावर बांधला जात असे हे विवाहाच्या प्रतिज्ञाबाबत नवदांपत्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक मानले जात असे. पवित्र विवाह बंधनाचे प्रतीक असलेल्या मंगळसुत्राचेही तेच महत्त्व आहे. यामध्ये असा विश्वास आहे की, वधूच्या गळ्यातील मंगळसुत्राचे काळे मणी दृष्ट शक्तींपासून कुटुंबाचे रक्षण करतात. तसेच जसे हे मणी एका धाग्यात बंद असतात तसेच नववधूने कुटुंबातील सर्वांना परपरांशी जोडून राहावे, अशी तिच्याकडून अपेक्षा केली जाते. दक्षिण भारतात तर मंगळसूत्र बांधण्याच्या विधीला खूपच महत्त्व आहे. त्वाविना विवाह अपूर्ण मानला जातो. तिथे मंगळसुत्राला ताली म्हणतात. हळदीने पिवळ्या केलेल्या धाग्यात सोन्याची दोन छोटी लॉकेट ओवली जातात. त्यात शिव, श्री, तुळस वा विष्णूच्या प्रतिमा असतात. लग्नविधीत वधूला हे मंगळसूत्र वराद्वारे घातले जाते. विशेष म्हणजे या मंगळसुत्रात १०८ धागे असतात जे मजबूत विवाह बंधनाचे द्योतक असते. तसेच सोन्याची दोन पदके असलेला एक धागा वधूचे आई-वडील तिला उपहारात देतात. लग्नानंतर १६ व्या दिवशी ही सोन्याची पदके काही काळ्या मण्यांसोबत सोन्याच्या साखळीत घातले जातात वधूकडून ती आयुष्यभर घालण्याची अपेक्षा केली जाते. महाराष्ट्रात वधूच्या मंगळसुत्रात दोन वाट्या असतात. परंपरेनुसार हे वधूवरांची कुटुंबे जवळ येणे दर्शवते. हल्ली मंगळसूत्र घालणे एका फॅशन झाली आहे. बऱ्याचजणी मंगळसुत्रात हिऱ्याचे वा इतर मौल्यवान रत्नांचे लॉकेट घालणे पसंत करतात. तसेच सुंदर विणकाम केलेली लॉकेटही आवडीने घातली जातात जे मंगळ-सुत्रातून काढलेल्या सोन्याच्या साखळीत घालूनही घालता येते. हल्ली तर लोक आपल्या आवडीनुसार डिझाइन बनवून घेतात.

■■■

# मुले तणावाखाली का वावरतात

मुलांवरील अभ्यासाचा हा ताण कमी करणे गरजेचे आहे. तसे झाले तर शालेय जीवनात, क्रीडा मैदानावर आणि कुटुंबातही चांगले वातावरण राहिले तर, मुलांची प्रगती होईल. पालकांनीही अन्य ताणतणाव मुलांच्या माथी मारु नयेत. मुला-मुलींनी परीक्षेत अधिक गुणवत्ता संपादन करावी अशी पालकांची अपेक्षा असते. मात्र घरचे वातावरण तसे नसते. अलिकडे दूरवाहिन्यांच्या प्रभावामुळे शाळेतून घरी आल्यानंतर दूरवाहिन्यांवरील कार्यक्रम पाहण्यात मुले रस घेतात. सध्याच्या स्पर्धेच्या काळात मुलांना काही करावे असे वाटले तरी परिस्थिती तशी नसते. शिक्षक आणि पालकांनी याबाबतीत अधिक लक्ष देण्याची गरज आहे. हल्लीच्या युगात आई-वडील आर्थिक जबाबदाऱ्या व कामाच्या बोज्यामुळे तणावग्रस्त असतातच पण हल्लीची छोटी छोटी मुलेही सतत तणावाखाली वावरत असतात. मानसिक ताणाचा परिणाम त्यांच्या शारीरिक विकासावर होत असतो.

**तणाव निर्मितीची कारणे –**

● प्रत्येक आई-वडिलांना आपल्या मुलांना चांगल्या शाळेत प्रवेश मिळावा असे वाटत असते. त्यामुळे ते मुलांवर तिसऱ्या – चौथ्या वर्षापासूनच प्रेशर टाकायला सुरुवात करतात व या सर्व प्रेशरमुळे मुलांच्या मनात अनामिक भीती निर्माण होऊन ते तणावाची शिकार होतात.

● विद्यार्थ्यांची आवड, आकलन शक्ती वेगवेगळी असते. त्यामुळे परीक्षेत गुण मिळविण्याची क्षमताही वेगवेगळी असते. आई-वडिलांना मुलांनी उत्तम गुण मिळवावेत असे वाटत असते. त्यांच्या या अपेक्षा मुलाने पूर्ण न केल्यास ते त्याची तुलना इतर मुलांशी करतात. त्यांच्यावर रागावतात, चिडतात. यामुळे मुलांमध्ये हीनभावना निर्माण होते व ती तणावग्रस्त होतात.



● आई-वडील मुलांना ऑलराऊंडर बनवू इच्छित असतात त्यामुळे ते मुलांना नृत्य, संगीत, कॉम्प्यूटर इ. शिकण्यासाठी पाठवतात. दिवसभर दमलेली मुले आई – वडिलांच्या दबावाखाली शिकायला जातात; पण यशस्वी होत नाहीत त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास ढासळून ते निराश होतात.

● बऱ्याचदा शाळेत मुलांची संख्या जास्त असणेही मुलांचा ताण वाढवू शकते. शिक्षक सर्व मुलांवर पूर्ण लक्ष देऊ शकत नाही आणि एखादा मुलगा मागे पडला तरी ते त्याच्याकडे वेगळे लक्ष देऊ शकत नाहीत. त्यामुळे मुलांना शाळेत जावेसे वाटत नाही.

**समस्या सोडविण्यासाठी सल्ला–**

मुले शाळेत जाणे टाळू लागली, तर त्यांना रागावू नका. प्रेमाने कारण जाणून घेण्याचा प्रयत्न करा. शाळेत जाऊन त्यांच्या भीतीमागील कारण शोधा.

मुलांच्या तक्रारीकडे लक्ष द्या. भले ती शाळेसंबंधी असो वा आरोग्यासंबंधी. डॉक्टरांना दाखवा व शाळेतही संपर्क साधा.

मुलांमधील गुण जाणून घेऊन त्यांना त्यांच्या आवडीनुसार काम करु द्या. आपल्या इच्छा त्यांच्यावर लादू नका. त्यापेक्षा त्यांना स्वत:च्या इच्छेनुसार काम करु द्या व यशस्वी होऊ द्या.

कसलीही चूक झाल्यास त्याला त्या चुकीची जाणीव प्रेमाने करुन द्या व अशी चूक पुन्हा करु नकोस असा सल्ला द्या.

# यशापयशापर्यंत पोहोचण्याचा मार्ग

योग्य कर्म केल्यास माणसाला भले वेळेने मिळो पण यश हे मिळतेच. हा सृष्टीचाच नियम आहे. पण काही काही लोक एकदा-दोनदा अपयश आले म्हणून खचून जातात. आणि प्रयत्न थांबवितात. तिथेच ते मोठी चूक करतात. ही चूक न करता यशस्वी होण्यासाठी पुन्हा पुन्हा प्रयत्न करणे हेच यशापर्यंत पोहचण्याचे साधन असते. संपूर्ण आयुष्यात आपण यश प्राप्तीसाठी धडपडतच असतो. कोणी कमी जास्त प्रमाणात धडपडतो इतकेच. मात्र, जो ज्या पद्धतीने धडपडतो त्याला त्या पद्धतीने यश देखील प्राप्त होते. यशाला मुठीत घ्यायचे असेल तर, नेहमी कर्तृत्वान पुरुषांप्रमाणे-कर्तृत्वान स्त्रियांप्रमाणे आचरण केले पाहिजे. जर त्या प्रमाणे आपण आचरण केले तर यश सहजासहजी आपल्या चिमटीतूनसुद्धा निसटू शकत नाही. हे प्रत्येकाने लक्षातच ठेवावे. यशापर्यंत पोहचण्याचा मार्ग ज्याने त्याने निवडावा. आणि हा निवडलेला मार्ग एकदा स्वीकारला की पुन्हा त्यावरुन दुसरा मार्गावर जाण्याचा अजिबात प्रयत्न करु नये. नाहीतर अपयशाला आपण कवटाळू हे मात्र सत्य.



यश प्राप्तीसाठी प्रत्येकाने धडपडावे पण अपयशाला वळसा घालून यशापर्यंत पोहचणारेच यशाची किंमत जाणू शकतात. सहजासहजी मिळालेले यश माणसाला मोठे बनविते. पण त्या यशात दम नसतो. म्हणून स्वकष्टाने मिळविलेले यश हे सदैव चिरकाल टिकणारे असते. आणि अशाच यशाच्या पाठी प्रत्येकाने धावावे आणि यशाला आपल्या सोबत सदैव ठेवावे. मात्र अपयशाला लाथाडून यशालाच सोबत करणारे या जगात काहीच करु शकत नाहीत. असे म्हणणाऱ्यांची संख्या भरपूर आहे.

आपल्या आयुष्यात, अशा घटना नेहमीच घडत असतात, ज्या आपल्याला ध्येयापासून दूर नेतात, भरकटतात, असे होण्यापासून वाचायचे असल्यास सर्वांत पहिल्यादा आपण प्रामाणिक बनणे अत्यंत आवश्यक ठरते. आपल्या क्षमतांचा आवाका तपासून, ध्येय गाठण्यासाठी त्यामध्ये नेमक्या कोणत्या बदलांची आवश्यकता आहे, याची ओळख घेतली पाहिजे. एकदा का हे निश्चित झाले की, व्यक्तीमत्व विकासाची प्रक्रिया पुढे वाढवायला हरकत नाही. भीती मनुष्याला पुढे जाण्यापासून रोखत असते. नकारात्मक विचारांना मनातून काढून टाकण्या सोबतच त्या रिकाम्या जागी सकारात्मक विचारांना भरायचे आहे, हे ही आपण लक्षात घ्यायला हवे. हे काम म्हणावे तितके सोपे नसून, ते एका सवयीच्या रुपाने विकसित करावे लागेल. एकदा का ही सवय लागली की मग सकारात्मकता आपल्या व्यक्तीमत्वाचा एक स्थायी भाग बनून जाईल. आपला मेंदू एखाद्या जमिनीसारखा असून, त्यावर येणारे पीक हे आपण जमिनीत कोणतं बीज पेरतो, त्यावर अवलंबून असतं. कोणतीही सवय उगाचच लागत नाही. आपला मेंदू एखाद्या कॉम्प्युटरप्रमाणे असतो. त्याला जी कमांड दिली जाते, त्याचप्रमाणे तो वागतो. स्पष्ट आणि सकारात्मक विचारसुद्धा एखाद्या कमांडप्रमाणे आहे, मेंदू सकारात्मक परिणाम देण्याकरिता आणि त्या दिशेने कार्य करण्याकरिता प्रेरित करते.

## दाल माखनी

### पाक्कृतीचे साहित्य –

- आख्खे उडीद १०० ग्रॅम
- राजमा २५ ग्रॅम
- कांदा १ मध्यम आकाराचा
- तिखट १ टी स्पून
- गरम मसाला १/४ टी स्पून
- आलं २ इंच
- लसूण ६ ते ७ पाकळ्या
- बटर ५० ग्रॅम
- क्रिम ५० ग्रॅम
- कोथिंबीर शोभेपुरती.
- मीठ चवीपुरते
- तेल २ टेबल स्पून
- जिरे १ टी स्पून

### मार्गदर्शन –

आदल्या रात्री, भरपूर पाण्यात, आख्खे उडीद आणि राजमा एकत्र भिजत घाला. दुसऱ्या दिवशी सकाळी आले आणि लसूण वेगवेगळे, अगदी बारीक चॉप करून घ्या. कांदा, कोथिंबीर बारीक चिरून ठेवा. भिजवलेले उडीद आणि राजम्यातले पाणी टाकून द्या. दोन्ही कडधान्ये हलक्या हाताने धूऊन, चॉप केलेल्या आल्यातील अर्धे आले घालून, ताज्या पाण्यात शिजवायला ठेवा. सोडा वगैरे टाकण्याची गरज नाही. कडधान्ये पूर्ण शिजली की जास्तीचे पाणी टाकून द्या.

एका पातेल्यात तेल आणि बटर मंद गॅस वर गरम करा. (बटर जळता कामा नये.) तेल-बटर नीट तापले की त्यात जिरे टाका. जिरे तडतडले की उरलेले, चॉप केलेले, अर्धे आले आणि लसूण टाकून परतून घ्या. लसणाचा छान सुगंध आला की कांदा टाकून परतून घ्या. कांदा गुलाबी रंगावर परतला की उडीद, राजमा, तिखट, गरम मसाला आणि मीठ टाकून नीट मिसळून घ्या. गरजे पुरते पाणी टाका. (अंतिम पदार्थ जरा दाटसरच असावा). दाल-माखनी उकळली की क्रिम फेटून त्यात मिसळा. रस दाटसर झाला की खाली उतरवा. (गॅस बंद करा).

दाल-माखनी काचेच्या वाडग्यात काढून त्यावर कोथिंबीर भुरभुरून जेवणाच्या टेबलावर घ्या.




## मेथीचे पोळे

### पाक्कृतीचे साहित्य –

- तांदुळ २ वाट्या
- अर्धी वाटी ताज्या नारळाची (कीसुन)
- चीमुट भर मेथी दाणे
- आवडी नुसार गुळ
- मीठ
- साजुक तुप

### मार्गदर्शन –

सकाळी दोन वाट्या तांदुळ व चीमुट भर मेथी एकत्र भीजत घालणे. ( इडीचे तांदुळ भीजत घालतो तसे) रात्री वाटताना(इडी प्रमाणे) त्यात अर्धा वाटी कीसलेला नारळ घालुन (डोसाप्रमाणे) बारीक वाटावे. पाणि जास्त घालु नये.

हे वाटण तसेच रात्र भर फ़्रीज मधे ठेवले तरी चालते. सकाळी त्यात आपल्या आवडी नुसार गुळ व मीठ घालुन चांगले फेटावे. गोव्यात जाड बिडाचा तवा म्हणुन मीळतो त्या वर हे पोळे काढतात.( हा तवा लोखंडाचा आसतो) पण आपण नॉन स्टीकच्या तव्यावर काढला तरी चालतील. पॅन तापला की त्यावर साजुक तुप एक चमचा घालावे व पॅन वर पसरुन घ्यावे. मग पोळ्याच्या पीठाचे दोन मोठे चमचे ह्या पॅन वर घालुन जरा पोळा जाड काढावा. ह्या पोळ्याला जाळी पडु लागेल वरतुन परत एक चमचा तुप सोडावे व लगेच झाकण ठेवावे. (मंद आचेवर हे पोळे काढ णे) काही वेळने झाकण काढावे. पोळ बाजुने तपकीरी रंगाचा व स्पंजा सारखा झालेला दीसेल तसा तो परतवावा. बस २ ते ३ सेकंदतच तो ताटलीत काढावा. साजुक तुप व मेथीचा वास छान वास येतो. हवे असल्यास लोणच्या बरोबर खावा किंवा तसा सुद्धा चालेल.

## मासे आणि वेदना

वेदनेनं तडफडणाऱ्या माणसाला पाण्याबाहेर काढलेल्या माशाची उपमा कथा-कादंबऱ्यांमधून हजारो वेळा दिली गेली असेल. मात्र, प्रत्यक्ष माशाला वेदना जाणवतात का, हा संशोधनाचा विषय ठरला. वैशिष्ट्यपूर्ण शरीररचनेमुळे माशांना वेदना जाणवत नसाव्यात, असा ग्रह होता. मात्र, नुकत्याच झालेल्या संशोधनाने हे स्पष्ट झालंय, की माशांना वेदना जाणवतात. लीन स्नेडन यांच्या नेतृत्वाखाली स्कॉटलंडमध्ये फिशटँकमधील माशांवर काही प्रयोग करण्यात आले. रॉसलिन इन्स्टिट्यूट आणि एडिन्बर्ग विद्यापीठाच्या पथकाने हे प्रयोग केले. गांधीलमाशीच्या विषाचे गुणधर्म विद्यापीठाच्या पथकाने हे प्रयोग केले. गांधीलमाशीच्या विषाचे गुणधर्म असलेला रासायनिक पदार्थ तयार करून तो माशांच्या तोंडातून घशात सोडण्यात आला. गांधीलमाशी या माशांना डसली आहे, अशी परिस्थिती याद्वारे निर्माण करण्यात आली आणि माशांच्या बदललेल्या वर्तनाच्या नोंदी ठेवण्यात आल्या.


# पृथ्वीच्या बाह्य कक्षेतही जीवसृष्टी?

पृथ्वीच्या बाह्य कक्षेत सूक्ष्मजीवांचे अस्तित्व शोधण्याच्या मोहिमेत काही अंशी यश आले असून त्यात तीन नव्या सूक्ष्मजीवांचा शोध लागला असल्याची माहिती प्रसिद्ध शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. जयंत नारळीकर यांनी दिली.

मुळात ब्रम्हांडात अनेक ग्रह व तारे आहेत. जीवाणूंचे आस्तित्व तपासण्याचे काम संपूर्ण जगात विविध स्तरावर सुरू आहे. पण पृथ्वीच्या कक्षेच्या बाह्य आवरणात जीवाणू असतात का, ते मृत आढळतात काय या विषयावर संशोधन करण्यात आले. विश्वेश्वरैया राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थेच्या सभागृहात त्यांनी पृथ्वीच्या वातावरणातील सूक्ष्मजीवांचा शोध या विषयावर अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व्याख्यानाच्या प्रारंभी त्यांनी अवकाशातील आकाशगंगांचा इतिहास व त्या क्षेत्रात आजवर झालेल्या संशोधनाची माहिती दिली. आवश्यक ते परिणाम साध्य न झाल्याने शास्त्रज्ञांनी टाटा मूलभूत संशोधन संस्था व भारतीय अंतराळ संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने २००५ साली ही मोहीम सुरू केली व बलूनच्या सहाय्याने पृथ्वीच्या वातावरणाचा विविध स्तरावर अभ्यास करण्यात आला. यात भव्य बलूनच्या खाली निर्वात पोकळी असलेल्या स्टीलच्या ट्यूब व त्यावर एअर फिल्टर लावून हवेतील घटकांचा अभ्यास करण्यात आला. त्यात अत्युच्च अंतरावर पाठविलेल्या बलून फिल्टरमध्ये एकूण १२ सूक्ष्मजीव अडकल्याचे आढळले पण त्यातील ९ सूक्ष्मजीव सामान्य तर तीन सूक्ष्मजीव नवे असल्याचे लक्षात आले, असे ते म्हणाले.

# चोच म्हणजे पक्ष्यांना वरदान

पक्ष्याला देवाने चोच नावाचा जो अवयव दिला आहे तो भरभक्कम, उपयुक्त, टणक आणि हरकामी आहे. पक्ष्यांच्या जातीनुसार त्यांच्या चोची वेगवेगळ्या आकाराच्या असल्या, तरी या चोचीने हे पक्षी घरटी



बांधतात, घरट्यांचे संरक्षण करतात. चोची उगारून भांडतात, इतरांना चोच उघडून भीती घालतात. आवाज काढतात, पंखांची साफसफाई करतात. अन्न गिळतात, शिकार करतात, शिकारीचे बारीक तुकडे करतात, चोचीने संपर्क साधतात, चोचीने अंड्यांची जागा बदलतात व उबवणीला बसतात. पक्ष्यांची चोच त्यांच्याकरिता वरदान ठरते. चोच टणक असली, तरी वजनाला हलकी आणि पक्ष्यांच्या कवटीला जोडलेली असते. चोच काळी, लाल, पांढरी असो, चोचीवरचे आवरण केरोटिनचे बनलेले असते. वापराप्रमाणे ते झिजत असले, तरी नखाप्रमाणे वाढत असते.

अन्न मिळविणाऱ्या पक्ष्यांच्या चोची सरळ असतात, तर कठीण पदार्थ फोडणाऱ्या व शिकार करणाऱ्या पक्ष्यांच्या चोची वक्राकार असतात. फुलांतील मधु गोळा करणाऱ्या पक्ष्यांच्या चोची सरळ; पण थोड्या वक्राकार असतात. मासेमारी करणाऱ्या पक्ष्यांच्या चोची लांब चाकूसारख्या, तर हवेतल्या हवेत किटक-पतंग पकडणाऱ्या पक्ष्यांच्या चोची चमच्यासारख्या असतात. सुतार पक्ष्याची चोच छिन्नीसारखी असते. ऑस्ट्रेलियन पेलिकन पक्ष्याची चोच सर्वांत लांब म्हणजे ३४ ते ४७ सें. मी. असते.

# हार्ट अटॅक येण्याच्या काही महिन्यांपूर्वी शरीर ओरडून सांगते ही ७ लक्षणे

## सावध व्हा नाहीतर मृत्यू अटळ

हार्ट अटॅकमुळे दरवर्षी अंदाजे १.७९ कोटी लोक मृत्युमुखी पडतात, ज्यामध्ये हार्ट अटॅकची आणि स्ट्रोक हे प्रमुख कारण आहेत. प्रोड्रोमल लक्षणे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सुरुवातीच्या धोक्याच्या लक्षणांना ओळखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. छातीत अस्वस्थता, श्वास लागणे, असामान्य थकवा, थंड घाम येणे, मळमळ आणि चक्कर येणे यासारखी लक्षणे हार्ट अटॅकच्या काही आठवडे किंवा महिने आधी दिसून येतात.

दरवर्षी सुमारे १.७९ कोटी लोक हार्ट अटॅकमुळे मरतात. जागतिक स्तरावर हृदयरोग हे मृत्यूचे प्रमुख कारण आहे आणि पाचपैकी चार हार्ट अटॅकमुळे होणारे मृत्यू हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकमुळे होतात.पण या गोष्टी काही एका दिवसामध्ये होत नाहीत. बरेच लोक हृदयविकाराच्या काही महिन्यांपूर्वी दिसणाऱ्या कमकुवत हृदयाच्या सुरुवातीच्या लक्षणांकडे दुर्लक्ष करतात.

संशोधनातून असे दिसून आले आहे की लोकांना हृदयविकाराच्या काही दिवस किंवा महिन्यांपूर्वी लक्षणे जाणवतात. या सुरुवातीच्या लक्षणांना प्रोड्रोमल लक्षणे म्हणून ओळखले जाते.ही लक्षणे ओळखल्याने वेळेवर वैद्यकीय मदत होऊ शकतो आणि जीव वाचू शकतो. हार्ट अटॅकच्या एक महिना आधी एखाद्या व्यक्तीला जाणवू शकतात. जाणून घेऊयात कोणत्या आहेत त्या गोष्टी.

**हृदयविकाराचा झटका म्हणजे काय?**

हृदयविकाराचा झटका, ज्याला वैद्यकीय भाषेत मायोकार्डियल इन्फार्क्शन म्हणतात, तो तेव्हा होतो जेव्हा हृदयाच्या स्नायूच्या एखाद्या भागात रक्त प्रवाह रोखला जातो, सामान्यतः रक्ताच्या गुठळ्यामुळे. हा अडथळा बहुतेकदा कोरोनरी धमन्यांमध्ये प्लेक (चरबी, कोलेस्टेरॉल



आणि इतर पदार्थ) जमा झाल्यामुळे होतो. पुरेसा रक्तपुरवठा नसल्यास, प्रभावित हृदय स्नायू ऑक्सिजनपासून वंचित राहतात आणि काही मिनिटांतच मरण्यास सुरुवात करू शकतात.

**हृदयविकाराचा झटका आणि हृदयक्रिया बंद पडणे मधील फरक**

जरी हार्ट अटॅकच्या झटक्याला हृदयविकाराचा झटका समजतात, परंतु ते सारखे नसतात. जेव्हा तुमचे हृदय अचानक आणि अनपेक्षितपणे धडधडणे बंद करते तेव्हा हृदयविकाराचा झटका येतो. हृदयविकाराच्या झटक्याने अचानक हृदयविकाराचा झटका येऊ शकतो.

**चक्कर येणे**

कमकुवत हृदय मेंदूला पुरेसे रक्त पोहोचवू शकत नाही, ज्यामुळे चक्कर येणे, डोके हलके होणे किंवा अगदी बेशुद्ध होणे देखील होऊ शकते. हे प्रसंग क्रियाकलाप दरम्यान किंवा विश्रांती दरम्यान येऊ शकतात आणि मळमळ सोबत असू शकतात.

**असामान्य थकवा**

अस्पष्ट, सततचा थकवा हे कमकुवत हृदयाचे वारंवार होणारे प्रारंभिक लक्षण आहे. रुग्ण अनेकदा या थकव्याचे वर्णन पुरेशी विश्रांती असूनही थकवा जाणवणे असे करतात. जर थकवा आठवडे कायम राहिला तर डॉक्टरांचा सल्ला घ्या.

**हृदयविकाराच्या झटक्याची सुरुवातीची लक्षणे**

हृदयविकाराची लक्षणे महिने आधीच दिसू शकतात. काही हृदयविकाराचे झटके अचानक आणि तीव्र असतात. परंतु बहुतेक हळूहळू सुरू होतात, सौम्य वेदना किंवा अस्वस्थतेसह. म्हणून लक्षणे लवकर ओळखणे आणि मदत घेणे महत्वाचे आहे.

**श्वास घेण्यास त्रास होणे**

श्वास घेण्यास त्रास होणे, विशेषतः पायऱ्या चढणे किंवा कमी अंतर चालणे यासारख्या नियमित कामांमध्ये, हृदयविकाराचे लक्षण असू शकते. कमकुवत हृदयामुळे पुरेसे ऑक्सिजनयुक्त रक्त परिसंचरण होत नाही, ज्यामुळे श्वास घेण्यास त्रास होतो. हे लक्षण कालांतराने अनेकदा बिघडते आणि ते वृद्धत्व किंवा तंदुरुस्तीचा अभाव असे समजले जाऊ शकते. अमेरिकन हार्ट असोसिएशन यावर भर देते की श्वास घेण्यास त्रास होणे, विशेषतः झोपताना, त्वरित वैद्यकीय तपासणीची आवश्यकता असते. हे जाणून घेणे महत्वाचे आहे की हे छातीत दुखणे किंवा त्याशिवाय होऊ शकते.

**छातीत दुखणे**

छातीत दुखणे हे हृदयविकाराच्या झटक्याचे एक सामान्य लक्षण असले तरी, कमकुवत हृदयामुळे काही महिन्यांपूर्वीच थोडीशी अस्वस्थता येऊ शकते. हे दाब, घट्टपणा, पोट भरणे, वेदना किंवा छातीच्या मध्यभागी जळजळ असे वाटू शकते. काही लोकांमध्ये, अस्वस्थता येते आणि जाते, ज्यामुळे ती सहज दूर होते.

शरीराच्या वरच्या भागाच्या इतर भागात अस्वस्थता: यामध्ये हात (एक किंवा दोन्ही), पाठ, मान, जबडा आणि पोटात वेदना किंवा अस्वस्थता समाविष्ट आहे.

■■■

## स्त्री-पुरूषांना विवाह लाभदायक

तुम्ही पारंपारिक विचारांचे असा अथवा आधुनिक विचारांचे, विवाहसंस्थेवर तुमचा विश्वास असो वा नसो; विवाह मनुष्याच्या मानसिक आरोग्यासाठी निश्चितपणे लाभदायक ठरतो आणि तो पुरुष व महिला या दोघांनाही सारखेच लाभ मिळवून देतो, असा दावा न्यूझीलंडच्या ओटागी युनिव्हर्सिटीतील मानसशास्त्रज्ञ केट स्कॉट यांनी केला आहे. जगभरातील विवाहित, अविवाहित ३४, ४९३ पुरुष व महिलांचे मानसिक आरोग्य अभ्यासून हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. विवाह मनुष्याला प्रबळ व प्रदीर्घ काळ मानसिक आधार मिळवून देतो. मतभेद, घटस्फोट किंवा मृत्युमुळे वैवाहिक जोडीदार दुरावल्यामुळे मानसिक आरोग्यावर दुष्परिणाम होतात. वैवाहिक जोडीदाराशिवाय एकट्या राहणाऱ्या महिलांचे विचार टोकाचे नकारात्मक बनतात. त्यामुळे पुरुषांवर तीव्र मानसिक तणाव येतो. केवळ मानसिक तणावच वाढतो असे नव्हे तर नकारात्मक, निराशावादी विचारांतच सर्व ऊर्जा खर्ची पडते.

जीवनातील उमेद, इच्छाशक्ती, आशा-आकांक्षा, उत्साह, आत्मविश्वास गोठून शून्यवत होतो. विवाह महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीनेच जास्त लाभदायक ठरतो, असा निष्कर्ष यापूर्वीच्या संशोधनातून निघाला होता; परंतु विवाह पुरुष व महिला या दोहोंसाठी लाभदायक ठरतो, असे या संशोधनातून निष्पन्न झाले आहे.

## किचनच्या कानाकोपऱ्यात लपलेले झुरळ, मुंग्या, कीटक काही क्षणात होतील गायब

स्वयंपाकघर एक अशी जागा आहे जिथे स्वच्छतेची खूप काळजी घ्यावी लागते, अन्यथा अस्वच्छतेमुळे विविध आजारांचा धोका वाढतो. स्वयंपाकघरात अस्वच्छता वाढली की झुरळं, मुंग्या आणि लहान मोठ्या कीटकांची संख्याही वाढत जाते. ट्रॉलीतील भांड्यांवर तर कधी स्वयंपाकघरातील ओट्यावर ही झुरळं फिरताना दिसतात. अनेकदा अन्नपदार्थांमध्येही झुरळांचा शिरकाव दिसून येतो, जे आरोग्यासाठी अजिबात चांगलं नाही. काही दिवसांनी किचनच्या कानाकोपऱ्यात ही झुरळं फिरताना दिसतात, ज्यांना घालवण्यासाठी अनेक उपाय करून पाहिले जातात, पण ते तात्पुरते मरतात आणि पुन्हा काही दिवसांनी फिरताना दिसतात. त्यामुळे आम्ही किचनमधील कानाकोपऱ्यात लपलेल्या झुरळ, कीटक आणि मुंग्यांना घालवण्यासाठी दोन सोप्पे आणि प्रभावी उपाय घेऊन आलो आहेत, ज्याच्या मदतीने तुम्ही झुरळ, कीटक अन् मुंग्यांपासून सुटका करून



घेऊ शकता.

**साखर, बोरिक पावडर**

किचनमधून झुरळ, मुंग्यांना पळवण्यासाठी सर्वात प्रभावी उपाय म्हणजे बोरिक पावडर वापरणे. यासाठी एका लहान भांड्यात बोरिक पावडर आणि साखर पावडर समान प्रमाणात घ्या. हे मिश्रण एकत्र करून किचनमध्ये ज्या कोपऱ्यांमध्ये झुरळांचा प्रादुर्भाव आहे त्या कोपऱ्यात शिंपडा, साखरेने झुरळ आणि मुंग्या आकर्षित होतील आणि बोरिक ॲसिडने ते मरून जातील.

**बेकिंग सोडा आणि साखर**

एका भांड्यात बेकिंग सोडा आणि साखर पावडर घ्या, आता त्यात दोन चमचे व्हाइट व्हिनेगर मिक्स करा, आता मिश्रणाचे छोटे गोळे करून ते झुरळांचा अधिक वावर असलेल्या ठिकाणी चिकटवून ठेवा. अशाने किचनमधील झुरळ, मुंग्या आणि किटक तर नाहीसे होतीलच, शिवाय किचनमधील कुबट वासही कमी होईल.

**झुरळांना पळवण्यासाठी करून पाहा 'हा' हॅक**

इंडिया पेस्ट कंट्रोल कंपनीचे दीपक शर्मा यांनी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सांगितले की, जेल आणि पावडरच्या स्वरूपात येणारे बोरिक ॲसिड हे कीटक नियंत्रणासाठी वापरले जाते. बोरिक ॲसिडमध्ये इलेक्ट्रोस्टॅटिक चार्ज असल्याने झुरळ, मुंग्या किंवा कीटक त्याच्या संपर्कात आल्यास ते मरतात.

पण तुम्ही झुरळ, मुंग्या मारण्यासाठी बोरिक पावडरचे योग्य प्रमाण घेणं आवश्यक आहे. तसेच घरात नेमकं कोणत्या ठिकाणी झुरळ, मुंग्यांचा वावर असतो त्या जागा शोधून तिथे त्याची फरवाणी केली पाहिजे, अशाने काही दिवसांत तुमच्या घरातील सर्व झुरळ, मुंग्या नाहीश्या होतील.

पण लक्षात ठेवा, बोरिक ॲसिडचा झुरळांच्या अंड्यांवर काहीच परिणाम होत नाही, त्यामुळे ते पूर्णतः झुरळांचा नायनाट करू शकते असे म्हणता येणार नाही; त्यामुळे घरात झुरळ, मुंग्यांना येण्यापासून रोखण्यासाठी आधी किचन स्वच्छ ठेवा.

यावर सेलिब्रिटी शेफ अनन्या बॅनर्जी यांनी सांगितले की, झुरळांमुळे अन्न दूषित होते. अशाने पोटाच्या समस्या, पचनक्रियेत त्रास आणि संसर्गदेखील होऊ शकतो. त्यामुळे स्वच्छता, आणि प्रतिबंधात्मक उपाय करणे गरजेचे आहे

## उन्हाळ्यात ताक की दही? पोट थंड ठेवण्यास कोणता पदार्थ उत्तम? दही खाल्ल्याने उष्णता जास्त वाढते?

उन्हाळ्यात उष्णता इतकी वाढते की लोक आहारात विविध पद्धतीचे थंड पदार्थ समाविष्ट करतात. त्यात दही हा पदार्थ अनेकांचा आवडता असल्यामुळे नुसतं दही किंवा मग सॅलेडमध्ये घालून अनेक लोक याचा आस्वाद घेतात. पण खरंच दही शरीराला थंडावा देतं का? की अजूनच उष्णता वाढवतं? जाणून घ्या पूर्ण सत्य.

उन्हाळ्याच्या कडक उन्हात शरीराला थंडावा आणि पोषण देणारे पदार्थ घेणे अत्यावश्यक ठरते. यामध्ये दही आणि ताक या दोन्ही गोष्टी आपल्याला लगेच आठवतात. दोन्हीच पचायला हलके, थंड आणि आरोग्यास लाभदायक मानले जातात. मात्र प्रश्न असा उभा राहतो की, उन्हाळ्यात यापैकी कोणता पर्याय निवडावा? दही अधिक फायदेशीर आहे की ताक? दोन्ही दूधापासून तयार होतात पण त्यांचा पोषणमूल्ये, शरीरावर होणारा परिणाम आणि उपयोग वेगळा असतो.

काही लोकांना वाटते की दही प्रोटीनसाठी चांगले असते तर काहीजण ताकालाच उन्हाळ्याचे टॉनिक मानतात. पण प्रत्येकाच्या शरीराच्या गरजेनुसार आणि हवामानानुसार यापैकी योग्य पर्याय निवडणे आवश्यक आहे. या लेखात आपण पाहणार आहोत उन्हाळ्यात दही आणि ताक यापैकी कोणते अधिक फायदेशीर ठरते, त्यांचे वेगळेपण काय आहे आणि कोणत्या वेळेला काय खाल्ल्यास आरोग्यावर चांगला परिणाम होतो.

**पचनासाठी कोण चांगले – ताक अधिक उपयुक्त :** उन्हाळ्यात जड अन्न पचवणे कठीण जाते, अशावेळी ताक हा सर्वोत्तम पर्याय ठरतो. ताक हे दह्याच्या तुलनेत अधिक पातळ असल्यामुळे ते पचायला हलके असते. त्यात हायड्रेशन आणि इलेक्ट्रोलाइट्स भरपूर असतात, जे पचनासाठी फायदेशीर ठरतात. ताक पचनशक्ती सुधारते, अपचन, गॅस यावरही गुणकारी असते.

**उष्णतेपासून आराम :** ताकामध्ये शरीराला थंड ठेवण्याची नैसर्गिक क्षमता असते. दह्याच्या तुलनेत ताक



शरीरातील उष्णता कमी करण्यास अधिक परिणामकारक ठरते. विशेषतः उन्हाळ्यात ताकाचे सेवन केल्याने शरीरात थंडी आणि सतेजता टिकून राहते. शरीरातील उष्णतेमुळे होणारी झोपेची कमी, अंगाची जळजळ यावर ताक अत्यंत उपयुक्त असते.

**पोषणमूल्यांची तुलना – दही अधिक पोषक :** ताक पचायला हलके असले तरी पोषणाच्या दृष्टीने दह्याचे स्थान अधिक आहे. दह्यामध्ये प्रोटीन, कॅल्शियम, व्हिटॅमिन बी १२ अधिक प्रमाणात असते. हाडांसाठी आणि इम्युनिटीसाठी दही उपयुक्त ठरते. त्यामुळे ज्यांना अधिक पोषण मिळवायचे आहे त्यांनी दह्याचे प्रमाण थोडे जास्त ठेवावे.

**वजन कमी करायचे असल्यास :** ताकामध्ये फॅट आणि कॅलरीचे प्रमाण दह्याच्या तुलनेत खूपच कमी असते. त्यामुळे वजन कमी करायचे असल्यास ताक सेवन करणे योग्य ठरते. हे शरीर डिटॉक्स करते, फुगलेले कमी करते आणि पचन सुधारते. वजन कमी करताना थंडावा आणि पोषण दोन्ही देणारा हा सर्वोत्तम पर्याय आहे.

**कोणत्या वेळेस काय घ्यावे :** जर तुम्ही सकाळी पौष्टिक नाश्ता करत असाल तर दही घेणे उत्तम ठरेल. दुपारच्या जेवणासोबत ताक घेतल्यास ते पचन सुधारते आणि उन्हाच्या तडाख्यात शरीराला आराम देते. रात्री दही टाळावे कारण ते थंड असल्यामुळे कफ निर्माण करू शकते. ताक मात्र दुपारनंतर घेणे अधिक फायदेशीर ठरते. उन्हाळ्यात दही आणि ताक यामध्ये निवड करताना शरीराच्या गरजा, वेळ आणि आरोग्यस्थिती लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. थोडक्यात, ताक हे उन्हाळ्याच्या दृष्टीने अधिक उपयुक्त ठरते कारण ते थंडावा, पचन आणि हायड्रेशनसाठी सर्वोत्तम आहे. मात्र पोषणाच्या दृष्टीने दहीही दुर्लक्षित करता येणार नाही. संतुलित प्रमाणात आणि योग्य वेळेस दोघांचाही उपयोग घेतल्यास उन्हाळ्याचे त्रास दूर ठेवता येतात.

**टिप :** हा लेख केवळ सामान्य माहितीच्या उद्देशाने आहे. हा वैद्यकीय सल्ला, निदान किंवा उपचारांचा पर्याय नाही. अधिक तपशीलांसाठी नेहमी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## पन्नाशी ओलांडलेल्या लोकांना पोटाशी संबंधित 'या' तीन समस्यांपासून वाचण्यासाठी तज्ज्ञांनी सांगितला उपाय

वाढत्या वयासह पचनसंस्थेतही अनेक बदल होतात ज्याचा शरीर अन्न कसे प्रक्रिया करते आणि पोषक तत्वे कसे शोषते यावर परिणाम करू होतो. ५० वर्षांनंतरच्या अनेक व्यक्तींना बद्धकोष्ठता, अतिसार व ॲसिड यांसारख्या आतड्यांसंबंधीच्या सामान्य समस्यांचा त्रास होऊ लागतो.

योग्य आहार आणि जीवनशैलीत योग्य ते बदल करून, ही लक्षणे अनेकदा प्रभावीपणे व्यवस्थापित केली जाऊ शकतात, ज्यामुळे एकूण आरोग्य सुधारते. फायबरचे सेवन समायोजित करण्यापासून ते खाण्याच्या सवयी लक्षात ठेवून सल्लागार, आहारतज्ज्ञ व मधुमेह शिक्षक कनिक्का मल्होत्रा

यांच्या सल्ल्याने तुम्ही आतड्यांसंबंधीच्या समस्यांचे व्यवस्थापन कसे करू शकता, ते जाणून घ्या.

**बद्धकोष्ठता :** आतड्यांच्या हालचाली मंदावणे आणि पचनसंस्थेतील स्नायूंची ताकद कमी होणे यांमुळे अनेकांना बद्धकोष्ठता या समस्येचा वारंवार त्रास होत असतो.

**उच्च फायबरयुक्त पदार्थ :** भरपूर फळे, भाज्या, संपूर्ण धान्य आणि शेंगा यांचा समावेश करा. हे सर्व पदार्थ आतड्यांच्या नियमित हालचालींना चालना देतात.

**हायड्रेशन :** दिवसभर पुरेसे पाणी प्यायल्याने बद्धकोष्ठता टाळण्यास मदत होते.

**प्रो-बायोटिक्स :** दही व केफिर यांसारखे प्रो-बायोटिक्सने समृद्ध असलेले अन्न आतड्यांतील जीवाणू संतुलित करते आणि त्यायोगे आतड्यांना आरोग्य सुधारण्यास हातभार लागतो.

**व्यवस्थित शिजवलेले जेवण :** व्यवस्थित शिजवलेले अन्न पचायला सोपे असते, ज्यामुळे जठरांत्रांच्या अस्वस्थतेचा धोका कमी होतो.

**अतिसार :** अतिसाराचा त्रास असलेल्यांना खालील आहारविषयक धोरणे त्यांच्या त्रासाची लक्षणे व्यवस्थापित करण्यास मदत करू शकतात :

**हे पदार्थ टाळा :** मसालेदार पदार्थ, कॅफिन व अल्कोहोल कमी करा. कारण- ते पचनसंस्थेला त्रास देऊ शकतात.

**हलके अन्न :** केळी आणि भात यांसारखे सहज पचणारे पदार्थ निवडा. असे पदार्थ पचायला हलके असतात आणि मल घट्ट करण्यास मदत करतात.

**पाण्याचे प्रमाण चांगले ठेवा :** अतिसारामुळे डिहायड्रेशन होऊ शकते. म्हणून शरीरातून बाहेर पडलेल्या पाण्याची कमतरता भरून काढण्यासाठी भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे.

**छातीत जळजळ :** छातीत जळजळ किंवा ॲसिड रिफ्लक्स ही आणखी एक समस्या आहे जी सामान्यतः ५० वर्षांनंतर अन्ननलिकेतील स्नायू कमकुवत झाल्यामुळे होते. ॲसिड रिफ्लक्स (Acid Reflux) म्हणजे पोटात तयार होणारे आम्ल (ॲसिड) अन्ननलिकेमध्ये (ओसोफेगस) परत जाणे. हे अन्ननलिकेच्या स्नायूंच्या चुकीच्या हालचालीमुळे होते, ज्यामुळे पोटातून ॲसिड घशाकडे येऊ शकते.


**ट्रिगरयुक्त अन्न ओळखा :** आम्लयुक्त पदार्थ (जसे की लिंबूवर्गीय फळे आणि टोमॅटो), मसालेदार पदार्थ व जास्त चरबीयुक्त पदार्थ यांचा समावेश अस्वास्थ्यकर पदार्थांमध्ये होतो. कारण- ते आपले स्वास्थ्य म्हणजेच आपले आरोग्य बिघडवणारी सर्व लक्षणे वाढवण्यास कारणीभूत ठरू शकतात.

**आहाराचे प्रमाण नियंत्रित करा :** जास्त खाल्ल्याने पोटाचा दाब वाढतो आणि त्यामुळे ॲसिडिटी होऊ शकते. कमी प्रमाणात आणि वारंवार थोडे थोडे खात राहिल्याने मदत होऊ शकते.

**अन्न नीट चावा :** अन्न हळूहळू आणि पुरेसे चावल्याने पचन होण्यास मदत होते आणि छातीत जळजळ होण्याचा धोका कमी होतो. या पौष्टिक धोरणांचा अवलंब करून, ज्येष्ठ नागरिक आतड्यांसंबंधीच्या समस्या कमी करू शकतात आणि त्यांचे एकूण आरोग्य सुधारू शकतात.

## छान छान गोष्टी...

## सॉक्रेटिस



प्रसिद्ध तत्ववेत्ता सॉक्रेटिस दिसावयास अत्यंत कुरुप होता. तो रोज आपला चेहरा आरशात पाहत असे. एक दिवस तो आरशासमोर असताना त्याचा शिष्य तेथे आला. आपला गुरु स्वत:चा चेहरा आरशात न्याहाळत आहे, हे पाहून त्याला जोरात हसू आले. तत्वज्ञ सॉक्रेटिसला त्याच्या हसण्याचे कारण लगेच लक्षात आले. तो शिष्याला म्हणाला, मी इतका कुरुप असूनही आरशात मोठ्या रुबाबात का पाहत आहे, याचे तुला हसू येत आहे हे मला समजले आहे. मी रोज स्वत:ची छबी अशी ऐटीत पाहतो. आरशात पाहिल्यावर मला माझ्या कुरुपतेचे दर्शन होते. ती कुरुपता माझे प्रबोधन करते.

मला जाणीव करुन देत, मी माझ्याकडून सतत सत्कृत्ये घडली पाहिजेत. समाजाचे भले झाले पाहिजे. चांगल्या कार्यामुळेच कुरुपता झाकली जाते याचे भान मला येते. म्हणून मी रोज असा आरशापुढे उभा राहता. एवढे बोलून सॉक्रेटिस गप्प बसला. शिष्याने त्यावर शंका विचारली, 'याचा अर्थ असा, की सुंदर व रुपवान लोकांनी आरशात कधी पाहूच नये. बरोबर आहे ना गुरुवर्य ? सॉक्रेटिस उद्गारला, 'नाही तसा अर्थ त्यातून निघत नाही. आरशाचा उपयोग त्यांनीसुद्धा अवश्य केला पाहिजे. तसे केल्याने त्यांच्या ध्यानात येईल, की ते जितके सुंदर आहेत, तितकीच सुंदर व परोपकाराची कामे त्यांना केली पाहिजेत. त्यामुळे त्यांच्या सौदर्याला कुरुपतेचे ग्रहण न लागता ते तसेच अबाधित राहील. व्यक्ती चांगली आहे का वाईट याचा संबंध तिच्या रुपाशी नसून गुणावगुणांशी, सदाचाराशी आहे. सदाचाराने मनुष्य सुखस्वरुप बनतो. तर दुराचाराने तो कुरुप ठरतो.

## बदाम, अक्रोड किंवा काजू? स्नॅक्स म्हणून कोणता सुकामेवा खाणे चांगले आहे? तो कधी खावा? तज्ज्ञांनी दिला सल्ला

आपण स्नॅक्स खातो म्हणजे आपण खराब आहाराचे सेवन करतो असे अनेकांना वाटते. पण, जर स्नॅक्स म्हणून योग्य पदार्थ तुम्ही निवडले तर ते तुम्हाला ऊर्जादेखील देते आणि तुमचे आरोग्य निरोगी ठेवू शकते. नाश्ता करण्याचा एक चांगला मार्ग म्हणजे सुकामेवा निवडणे. ते पोषक तत्वांनी परिपूर्ण आहेत आणि धावपळीच्या जीवनशैलीत तो बरोबर ठेवणेदेखील सहज शक्य होते. पण, मुख्य म्हणजे त्यांचा योग्य प्रमाणात आणि योग्य वेळी आनंद घेणे.

स्नॅक्स म्हणून सुक्यामेव्याची निवड का करावी?

सुकामेवा म्हणजे फक्त पाणी काढून टाकलेले फळ असा होतो. हे फळ एकतर उन्हात वाळवून किंवा इतर पद्धतीने सुकवले जातात. हे त्यांचे पोषक तत्त्व कायम ठेवते. ते फायबर, जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध असतात. फॅट्स आणि साखरेचे प्रमाण जास्त असलेल्या चिप्स किंवा कुकीजच्या अगदी विरुद्ध सुकामेवा असतो. तो पचनास मदत करतो, ऊर्जा वाढवतो आणि तुमचे हृदय आणि मेंदू निरोगी ठेवण्यास मदत करतो.


जाहिर नोटीस
दौंड येथील मे. उपविभागीय अधिकारी, दौंड यांचे कोर्टात
पिठासन अधिकारी श्री रेवन्नाथ लबडे सो..

जावक क्रं. फौज/कावि /२०२६
दि. / / २०२६

निखिल चंद्रकांत सोनवळकर – अर्जदार
दौंड,ता.दौंड,जि.पुणे
वि.
मुख्याधिकारी सो – जाबदेणार
दौंड नगरपरिषद दौंड
ता.दौंड,जि.पुणे

या जाहीर नोटीशीव्दारे तमाम लोकांस कळविण्यात येते की, अर्जदार निखिल चंद्रकांत सोनवळकर यांचे आजोबा कै.गोविंद एकनाथ सोनवळकर यांच्या मुत्यू दौंड येथे राहत्या घरी दि. १५/१२/१९७७ रोजी झालेला आहे. त्यांच्या मृत्यूची नोंद दौंड नगरपरिषद दौंड,ता.दौंड दप्तरी नसल्याने सदर मृत्यू नोंद होणेबाबत परवानगी मिळणेकामी व तसा मुत्यूचा दाखला मिळणेबाबत अर्जदार यांनी किरकोळ अर्ज मे. प्रांत कार्यालय दौंड येथे दाखल केलेला आहे. तसेच अर्जदार यांचा सदर दाखला मिळणेचा आदेश होणेबाबत मागणी केलेली आहे.

तरी या जाहिर नोटीशी व्दारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, ज्या कोणास सदर अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यांनी पुढील १५ दिवसांत जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून स्वतः अगर वकिलां मार्फत लेखी हरकत उपविभागीय अधिकारी, दौंड यांचेकडे किंवा मा.मंडळ अधिकारी, दौंड यांच्या कार्यालयात नोंदवावी. मुदतीत हरकत न आल्यास सदर अर्जदार निखिल चंद्रकांत सोनवळकर यांचे आजोबांचा मृत्यूचा दाखला देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस असे.

उपविभागीय दंडाधिकारी दौंड
उपविभाग दौंड



**उपविभागीय अधिकारी दौंड तथा उपविभागीय दंडाधिकारी दौंड यांचे कार्यालय**

अर्ज क्र. जन्म/मृत्यु/एस.आर/२९५/२०२४
दिनांक ११/०५/२०२६

**जाहिर प्रसिध्दीकरण**

१) अर्जदार श्री.अनिल कल्याण चव्हाण
रा.पाटस ता.दौंड – अर्जदार
विरुध्द
१) ग्रामसेवक ग्रामपंचायत पाटस –सामनेवाला

विषय :- जन्म – मृत्यु नोंदणी ( दुरुस्ती) अधिनियम २०२३ कलम १३ (२) (३) प्रमाणे अर्ज

ज्याअर्थी, यातील अर्जदार यांची आई प्रमिला कल्याण चव्हाण हे वर नमुद पत्त्यावरील कायम रहिवासी आहे. अर्जदार यांचा मृत्यू दि.१०/०४/१९९२ रोजी गांव पाटस ता.दौंड,जि.पुणे येथील राहत्या घरी झालेला आहे. अर्जदार यांच्या आईची जन्म/मृत्युचे रजिस्टरला नोंद नसलेमुळे त्यांनी जन्म – मृत्यु नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ कलम १३ (२) (३) प्रमाणे नोंद होवुन मिळणेबाबत या कार्यालयात दिनांक २८/०६/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांच्या आईचा मृत्यूचा दाखला मिळणेकामी कोणाची कांही हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाच्या आत किंवा उपविभागीय अधिकारी दौंड तथा उपविभागीय दंडाधिकारी दौंड यांचे कार्यालयात स्वत: अथवा आपल्या वकिला मार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. कोणाचाही कांही हरकत अथवा म्हणणे मुदतीत न आल्यास कोणाचाही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधित दाखला देण्यात येईल.

सदरचे जाहिर प्रसिध्दीकरण आज दि.११/०५/२०२६ रोजी आमचे सहीने व शिक्क्याने प्रसिध्द केले असे .

ठिकाण – दौंड
दिनांक ११/०५/२०२६

शिक्का

सही/–
(रेवणनाथ लबडे )
उपविभागीय अधिकारी दौंड तथा
उपविभागीय दंडाधिकारी दौंड



**उपविभागीय अधिकारी दौंड तथा उपविभागीय दंडाधिकारी दौंड यांचे कार्यालय**

अर्ज क्र. जन्म/मृत्यु/एस.आर/१५/२०२५
दिनांक ११/०५/२०२६

**जाहिर प्रसिध्दीकरण**

१) अर्जदार श्रीमती आरती विनोद बगाडे – अर्जदार
रा.दौंड ता.दौंड जि.पुणे
१) उपनिबंधक दौंड नगरपालिका/महानगर पालिका – सामनेवाला
विरुध्द

विषय :- जन्म – मृत्यु नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ कलम १३ (२) (३) प्रमाणे अर्ज

ज्याअर्थी, यातील अर्जदार यांचे पती विनोद मोहन बगाडे हे वर नमुद पत्यावरील कायम रहिवासी आहे. अर्जदार यांचा जन्म दि.१०/०३/१९९१ रोजी गांव दौंड,ता.दौंड जि.पुणेयेथील राहत्या घरी झालेला आहे . अर्जदार यांच्या पतीची जन्म /मृत्युचे रजिस्टरला नोंद नसलेमुळे त्यांनी जन्म– मृत्यु नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ कलम १३ (२) (३) प्रमाणे नोंद होवुन मिळणेबाबत या कार्यालयात दि.२१/०१/२०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी सदर अर्जाकामी अर्जदार जन्म / मृत्यु दाखला मिळणेकामी कोणाची कांही हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाच्या आत किंवा उपविभागीय अधिकारी दौंड तथा उपविभागीय दंडाधिकारी दौंड यांचे कार्यालयात स्वत: अथवा आपल्या वकिला मार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. कोणाचाही कांही हरकत अथवा म्हणणे मुदतीत न आल्यास कोणाचाही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधित दाखला देण्यात येईल.

सदरचे जाहिर प्रसिध्दीकरण आज दि.११/०५/२०२६ रोजी आमचे सहीने व शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

ठिकाण – दौंड
दिनांक –११/०५/२०२६

शिक्का

सही/–
(रेवणनाथ लबडे)
उपविभागीय अधिकारी दौंड तथा
उपविभागीय दंडाधिकारी दौंड

# तीर्थक्षेत्र विकासकामे दर्जेदार सुविधांसह कालमर्यादेत पूर्ण करावीत : मुख्यमंत्री फडणवीस

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : राज्यातील ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांच्या जतन व संवर्धनास शासनाचे प्राधान्य असून तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. तसेच भाविक-पर्यटकांसाठी अत्याधुनिक सोयी सुविधासह आरोग्यसुविधाची उपलब्धता करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. यावेळी शिखर समितीच्या बैठकीत सहा तीर्थक्षेत्र विकासासाठी एकूण ९९३.७२ कोटी रुपयांच्या विकास आराखड्यांना आणि निधीला मंजुरी देण्यात आली.

सह्याद्री अतिथीगृह येथे विविध तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार,वनमंत्री गणेश नाईक, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले,आमदार दिलीप वळसे पाटील, आमदार धनंजय मुंडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह सर्व संबंधित अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग क्षेत्राच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी कामे करावीत.या विकास आराखड्याअंतर्गत अत्याधुनिक बस स्थानक आणि पार्किंग सुविधा करण्यात यावी. या कामांसाठी जागांचे भूसंपादन वेळेत करावे. या प्रकल्पासाठी सुमारे १७२.२२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे मे २०२७ पर्यंत काम पूर्ण करावे. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी विविध वळण रस्ते आणि रस्ते रुंदीकरणाची कामे हाती घेण्यात यावीत. सध्या २.७ मीटर रुंदी असलेले रस्ते ७ मीटरपर्यंत रुंद करावा. भक्त आणि पर्यटकांच्या सुविधांसाठी मंदिर परिसरात पादचारी मार्ग, कव्हर्ड कॉरिडॉर, फ्लोअरिंग आणि एम्फीथिएटर, २५७ केएलडी क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, नवीन पोलीस स्टेशन आणि विश्रामगृह, भविष्यातील विकास आराखड्यांतर्गत डिंभे धरण परिसरात सबस्टेशन उभारणे, केबल कार (रोपवे)




सुविधा सुरू करणे, एमटीडीसीच्या भीमाशंकर रिसॉर्टचा विकास करणे, राजापूर येथे नव्या पर्यटन सुविधांची निर्मिती करण्याचे नियोजन काटेकोरपणे करावे. आमदार बाबाजी काळे यांनी श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकास आराखड्यात सूचना केलेल्या कामांचा आराखड्यात समावेश करण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी केल्या.

संत तुकाराम महाराज यांचे देहू येथील जन्मस्थान, वैकुंठगमन मंदिर परिसर तसेच भंडारा डोंगर परिसराच्या संवर्धन आणि विकासासाठी सर्वंकष आराखडा ४१.७१ कोटींचा आहे. या आराखड्यात संत तुकाराम महाराज जन्मस्थान मंदिर, वैकुंठगमन स्थळ, भंडारा डोंगर आणि परिसरातील इतर धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन करावे. यामध्ये रस्त्यांचे सुशोभीकरण, स्वच्छता व्यवस्था, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, पार्किंग व्यवस्था, भाविकांसाठी निवास सुविधा तसेच माहिती केंद्र उभारणे, भंडारा डोंगर परिसरात हरित क्षेत्र संवर्धन, वृक्षारोपण आणि नैसर्गिक सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात. आमदार सुनिल शेळके यांनी संत तुकाराम महाराज जन्मस्थानाच्या संवर्धन आराखड्यात सूचविलेल्या कामांचा आराखड्यात समावेश करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सातारा जिल्ह्यातील ऐतिहासिक किल्ले अजिंक्यताराचे जतन, संवर्धन आणि परिसर सुशोभीकरणासाठी १३४.८० कोटी रूपयांचा विकास आराखडा आहे. यामध्ये नियोजित असलेल्या पायाभूत सुविधांचा विकास, नियोजित प्रेक्षक गॅलरी, नवे पादचारी मार्ग व लँडस्केपिंग,राज सदरेचे पुनरुज्जीवन, बुरूजांचे संवर्धन, पर्यटन आकर्षणे,अत्याधुनिक लटकता पूल,स्वच्छता व विश्रांती गृहांची कामे, तज्ज्ञांचे मार्गदर्शनाखाली नियोजित कामे वेळेत पार पाडावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

संगम माहुली समाधीस्थळ संवर्धनासाठी १३३ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. याअंतर्गत महाराणी ताराबाई, महाराणी येसूबाई आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधी स्थळांचा जीर्णोद्धार आणि लँडस्केप विकास केला जाणार आहे. याशिवाय, ऐतिहासिक संगमेश्वर मंदिर व घाटाचे संवर्धन, नवीन हँगिंग ब्रिज (झुलता पूल), व्ह्यूइंग गॅलरी आणि सुसज्ज पाथवेची निर्मिती करून या परिसराला जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ बनविण्यात येईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

## रोहयो विभागामार्फत भरतीच्या बोगस जाहिरातींपासून सावध राहण्याचे मंत्री भरत गोगावले यांचे आवाहन

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत महाराष्ट्रात विविध पदांसाठी तात्काळ भरती सुरू असल्याची बोगस जाहिरात सोशल मीडियाद्वारे प्रसारित करण्यात येत आहे. अशा जाहिरातींना बळी पडून सर्वसामान्य नागरिक व बेरोजगार युवकांचे आर्थिक नुकसान होऊ नये, यासाठी दक्षता घेण्याचे आवाहन रोजगार हमी योजना विभागाचे मंत्री भरत गोगावले यांनी केले आहे. या प्रकरणी संबंधित अज्ञात व्यक्तींविरोधात मरीन लाईन्स पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

'रोजगार हमी योजना विभागांतर्गत महाराष्ट्रात तात्काळ भरती! स्थिर नोकरीची आकर्षक संधी!' अशा आशयाची जाहिरात व्हॉट्सपद्वारे राज्यभर व्हायरल करण्यात आली आहे. या जाहिरातीत कार्यक्रम तांत्रिक अधिकारी (झढज), सहायक कार्यक्रम अधिकारी आणि क्लार्क कम डेस्क ऑफिसर पदांसाठी भरती सुरू असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सदर जाहिरातीत नोंदणीसाठी १ हजार ५०० रुपये शुल्क भरण्याची अट घालण्यात आली असून, ५८ वर्षांच्या कराराधारित नियुक्तीचे आमिष दाखविण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती देताना मंत्री भरत गोगावले यांनी म्हटले आहे की, अशी कोणतीही भरती प्रक्रिया शासनामार्फत सुरू नसून संबंधित जाहिरात पूर्णपणे खोटी व दिशाभूल करणारी आहे. शासनाकडून थेट भरतीसाठी कोणतीही जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली नाही. यामुळे विशेषतः ग्रामीण भागातील बेरोजगार युवकांची आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता असून या बोगस जाहिरातीमुळे शासनाची प्रतिमा मलीन होत असल्याने संबंधित अज्ञात व्यक्तींविरोधात कठोर कारवाई करण्याबाबत विभागामार्फत तक्रार दाखल करण्यात आली आहे.

## बोरीवली पूर्व येथे पार पडले सकल हिंदू संमेलन; संघ शताब्दी निमित्त कार्यक्रमाचे आयोजन

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने सकल हिंदू संमेलनाचे बोरीवली पूर्व येथे आयोजन करण्यात आले होते. हनुमान नगर, भारतीय खाद्य निगम वस्ती, ओंकारेश्वर नगर बोरीवली भाग वस्तीचे हिंदू संमेलन, राजेंद्र नगर, गोल्डन मैदान, बोरीवली (पूर्व) येथे पार पडले. भारतमाता पूजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. चिन्मय मिशन बालविहारच्या माध्यमातून लहान मुलांनी श्रीमद्भगवद्गीतेतील श्लोक व स्तोत्रांचे पठण केले.

कार्यक्रमाला मुख्य वक्ते म्हणून तरूण भारत नागपूर आवृत्तीचे पत्रकार श्री जयेश मेस्त्री यांनी उपस्थित राहून उपस्थितांसमोर 'हिंदूत्व' या विषयावर व्याख्यान दिले. स्वसुरक्षा कशी करावी यासाठी विविध वयोगटातील विद्यार्थ्यांनी कराटे प्रात्यक्षिक करून दाखवीत उपस्थितांची मने जिंकली. केतकीपाडा महिला भजन मंडळीद्वारे भजनाचा कार्यक्रम पार पडला. भक्ती पासून सुरुवात होऊन शक्तीने समापन झाले. यात विशेषकरून पंच परिवर्तन समरसता, पर्यावरण, कुटुंब परिवर्तन होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन उपस्थित वक्त्यांनी केले. कोंकण प्रांत कार्यकारिणी सदस्य दिलीप पै यांनी कार्यक्रमाचा समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर उन्हेलकर यांनी केले. याप्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मुंबई महानगर संयोजक सुरेश देवळे, देवराय नायक, नगरसेविका ड सिमा शिंदे, रवी कांचन, श्याम नांदोस्कर, सुधीर परांजपे, अंजली जोशी, सुनंदा महाबळ व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## छत्रपती संभाजी महाराजांचे शिल्प स्वराष्ट्राचा अभिमान जागृत करण्याची प्रेरणा देईल : उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, शासन आणि खासगी क्षेत्र एकत्र आल्यानंतर जागतिक दर्जाच्या आरोग्य सुविधा मिळतात हे कर्करोग रुग्णालय हे उदाहरण आहे. आरोग्य सुविधा बळकट करण्यासाठी राज्यशासन प्रयत्न करत आहे. छत्रपती संभाजी महाराज यांचे बुधभूषण ग्रंथ लिहितानाचे शिल्प केवळ पाहण्यासाठी नाही त्यांच्यासारखा कणखर बाणा आणि स्वराष्ट्राचा अभिमान सर्वांमध्ये जागृत करण्यासाठी प्रेरणा देईल, असेही श्रीमती पवार म्हणाल्या.

वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर या नऊ टाक्यामुळे येथील जनतेला पुरेशा दाबाने पाणी मिळेल. पाणी हे जीवन असून पाण्याची बचत करणे महत्वाचे आहे असेही त्या म्हणाल्या. मेट्रोच्या पुलामुळे प्रवासाचा वेळ वाचणार असून इंधनाची बचत होणार आहे. कामांच्या गुणवत्तेबरोबरच, भविष्यातील विचार करून नियोजन करण्यावर स्व.अजित पवार यांचा भर होता. त्यांच्या भूमिकेनुसार विकास कामे करण्यावर भर दिला जाईल.

प्रास्ताविकात महापौर श्रीमती नागपुरे म्हणाल्या, 'विकसित भारत, विकसित महाराष्ट्र' या धर्तीवर 'विकसित पुणे' या संकल्पनेनुसार पुणे शहराला सर्व सोयी सुविधांनी सुसज्ज करण्यासाठी काम सुरू आहे. समान पाणीपुरवठा योजनेतील पाण्याच्या पाण्याच्या टाक्या कार्यान्वित झाल्यामुळे ३ लाख लोकसंख्येला पाणीपुरवठा होणार आहे. पुणेकरांच्या वाहतुकीला गती आणि वाहतुकीला



अत्याधुनिक रूप देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. खराडी ते महात्मा फुले चौकदरम्यान मेट्रोसह दुमजली पुलामुळे खराडीकरांना मोठा दिलासा मिळणार आहे, असेही त्या म्हणाल्या.

आमदार योगेश टिळेकर म्हणाले, मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी २०१५ मध्ये २ हजार ८०० कोटी रुपयांची समान पाणीपुरवठा योजना जाहीर करून आता कार्यान्वित केली. म्युनिसिपल बाँड च्या माध्यमातून निधी उभा केला. पुणे आणि हडपसरच्या रस्ते, पाणीपुरवठा, विकासासाठी मुख्यमंत्र्यांनी निधीची उपलब्ध करून दिला. यावेळी 'पुणे प्रथम' या पुस्तिकेचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

तत्पूर्वी सकाळी प्रभाग क्र. ९ मधील सर्वे क्र. ४७ पी, मारुती चौक, बाणेर येथील पुणे महानगरपालिका व आपुलकी हेल्थकेअर यांच्या संयुक्त उपक्रमाद्वारे सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावरील कर्करोग रुग्णालयाचे लोकार्पण, पुणे महानगरपालिकेच्यावतीने उभारलेल्या छत्रपती संभाजी महाराज उद्यान, जंगली महाराज रोड येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले होते.

## कोल्हापुरात सोनू निगम लाईव्ह कॉन्सर्टची जादू; हजारो रसिकांच्या उपस्थितीत रंगला अविस्मरणीय संगीत सोहळा

### उद्योगपती संजय घोडावत यांनीही रंगमंचावर गाणे सादर करत जिंकली उपस्थितांची मने

जनप्रवास : प्रतिनिधी

कोल्हापूर : संगीतप्रेमींसाठी पर्वणी ठरलेला सुप्रसिद्ध गायक सोनू निगम यांचा बहुचर्चित लाईव्ह कॉन्सर्ट कोल्हापुरात मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. संजय घोडावत ग्रुपच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या भव्य कार्यक्रमाला हजारो रसिकांनी उपस्थिती लावत मैदान अक्षरशः फुलून गेले होते. संजय घोडावत युनिव्हर्सिटीच्या क्रिकेट मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाने पश्चिम महाराष्ट्रातील संगीतप्रेमींना अविस्मरणीय अनुभव दिला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीपासूनच प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळत होता. आकर्षक लाईटिंग, अत्याधुनिक साउंड सिस्टीम आणि भव्य स्टेजमुळे संपूर्ण परिसर संगीताच्या रंगात रंगून गेला होता. सोनू निगम यांनी आपल्या मधुर आवाजात एकापाठोपाठ एक सुपरहिट गाणी सादर करत उपस्थितांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. अनेक गाण्यांवर प्रेक्षकांनीही सोनू निगम यांच्यासोबत सूर जुळवत संपूर्ण मैदान दणाणून सोडले.

या कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे उद्योगपती संजय घोडावत यांनी रंगमंचावर येत गाणे सादर केलेला क्षण. संगीताची आवड जपत त्यांनीही गायनाचा आनंद घेतला. त्यांचे गाणे ऐकून उपस्थितांनी जोरदार टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले. या अनपेक्षित क्षणामुळे कार्यक्रमाला आणखी रंगत आली.

या कार्यक्रमासाठी परिसरातील अनेक जिल्ह्यांतून मोठ्या संख्येने रसिक उपस्थित होते. पार्किंग, सुरक्षा, बसण्याची व्यवस्था आणि खाद्यपदार्थांची सुविधा यामुळे कार्यक्रमाचे व्यवस्थापनही कौतुकास्पद ठरले. संपूर्ण कार्यक्रमात संगीत, उत्साह आणि आनंदाचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. पश्चिम महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात हा कॉन्सर्ट एक ऐतिहासिक आणि संस्मरणीय सोहळा म्हणून नोंदला गेला आहे.



## बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांचा कांचन सावंत यांनी सादर केला सुरेल नजराणा; अवघी डोंबिवली सूरसंगीतांनी न्हाऊन निघाली

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : खानदेश रत्न कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या अनमोल कवितांचा ठेवा कुमारी कांचन संतोष सावंत हिच्या सुरेल व कसदार आवाजात उलगडत गेला माझी माय सरसोती या गाण्याने सुरुवात झाली नंतर कशाला काय म्हणू नये हे अध्यात्मिक शिकवण सांगणारी गीत झाले. बिना कपाशीने उले त्यानंतर जीवनाची वाटचाल करण्यासाठी तत्त्वज्ञान सांगणारे वाटच्या वाटसरा आले. तसेच कर्मयोगी याचे जीवन सांगणारे अरे घरोटे घरोटे! आईच्या ममतेने व्याकुळलेले उचलला हारा. जन्ममृत्यूतील संघर्ष जीव देवाने धाडला संगीत उदय चितळे सर मुलतानी निसर्गात रमणाऱ्या बहिणाबाई यांनी निसर्ग कवियत्रीच होतं. अरे खोप्यामध्ये खोपा पाठोपाठ येतं मन वढाय वढाय पाण्यागत असणाऱ्या मनाला शब्दात पकडणारे आखजीचा आखाजीचा हे अक्षय तृतीयेच्या सणाचं वर्णन करणार गीत येतं. परशुराम बेलदार या भक्तीमय गीत गायनाने समारोप झाला. रसिक प्रेक्षकांनी अतिशय मन:पूर्वक दाद देऊन कार्यक्रमाला रंगत आणली अधिक मासातील या अधिकाधिक आनंद देणाऱ्या कार्यक्रमात पाहुणे अशोक कुलकर्णी स्वामी सिरीयल चे प्रमुख भूमिका, जीवनविद्या मिशनचे कीर्तनकार भारुड मधुकर पांचाळ, जीवनविद्या मिशन चे संगीतकार भजन सम्राट ठीक सेन बानकर, प्रबोधनकार दशरथ शिरसाट, प्रसारक कीर्तनकार आबू परब, हरिश्चंद्र सरदार पत्रकार अनिकेत घमंडे यांच्या समवेत अनेक मान्यवर उपस्थित होते. या नितांत सुंदर कार्यक्रमाचे प्रयोजक होते कुलकर्णी ब्रदर्सचे श्रीरंग कुलकर्णी. कार्यक्रमाला चार चांद लावणारे निवेदन होते श्रीयुत दिनेश आडावदकर यांचे. अप्रतिम साथ संगत करून कुमारी कांचन संतोष सावंत हिच्या गाण्याला रसिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणारे वादक व संगीत संयोजक उदय चितळे तबला श्री मकरंद विष्णुपुरीकर शिंदे डॉक्टर प्रमोद धोरे. तबलावादक श्री व्यंकटेश कुलकर्णी धनी व्यवस्थापक श्री आनंद गोरे यांनी या सदाबहार कार्यक्रमाला परमोच्च बिंदू गाठला. अवघी डोंबिवली सूरसंगीतांनी न्हाऊन निघाली.

# कला विश्व

## मी एकाच किसिंग सीनसाठी होकार दिला होता, पण, प्रिया बापटला हिंदी चित्रपटाच्या सेटवर आलेला वाईट अनुभव



प्रिया बापट मराठी व हिंदी इंडस्ट्रीतील लोकप्रिय अभिनेत्री आहे. तिने आतापर्यंत अनेक चित्रपट, नाटक आणि मालिकेतही काम केलं आहे. अभिनेत्री गेल्या काही वर्षापासून ओटीटीवरही सक्रिय आहे. प्रिया अनेकदा तिच्या या प्रवासाबद्दल मनमोकळेपणाने बोलताना दिसते. विविध भाषा आणि कलाकारांबरोबर काम करत असताना प्रियाने तिला आलेल्या एका वाईट अनुभवाबद्दल सांगितलं आहे. प्रिया बापट, सई ताम्हणकर, अमृता खानविलकर आणि सोनाली कुलकर्णी यांनी नुकतीच मुलाखत दिली आहे. यामध्ये त्यांनी त्यांचे अनेक चांगले आणि वाईट अनुभव सांगितले आहेत. याचदरम्यान प्रियानेही तिला तिच्या पहिल्या हिंदी चित्रपटाच्या सेटवर आलेल्या वाईट अनुभवाबद्दल सांगितलं आहे. यावेळी तिने तिच्या सहकलाकाराकडून तिला चुकीची वागणूक मिळाली होती आणि तिच्या सहअभिनेत्याने तिला शूटिंगदरम्यान चुकिच्या पद्धतीने स्पर्श केल्याचं म्हटलं आहे. प्रिया नेमकं काय म्हणाली याबद्दल जाणून घेऊयात मुलाखतीत प्रिया याबद्दल म्हणाली, मराठीत असं घडलं नाही, पण मी माझ्या पहिल्या हिंदी चित्रपटासाठी शूटिंग करत असताना घडलं. मी त्या अभिनेत्याचं नाव घेणार नाही. यावेळी तिथे असलेल्या सई ताम्हणकरने मला कदाचित माहीत आहे ती व्यक्ती असं म्हटलं. प्रिया यावर मी तुला सांगितलं होतं तुला माहीत आहे. असं म्हणाली. प्रिया याबद्दल पुढे म्हणाली, तो माझा पहिला हिंदी चित्रपट होतो. त्या चित्रपटात फक्त एकच किसिंग सीन होता आणि दिग्दर्शकाला सातत्याने विचारत होते की का तुम्हाला हा सीन हवा आहे कारण मला त्या सीनची तिथे गरज वाटत नव्हती. पण, ते खूप आग्रह करत होते म्हणून मी म्हटलं ठिक आहे. प्रिया पुढे म्हणाली, मी एकाच किसिंग सीनसाठी होकार दिला होता. पण त्यानंतर असे काही क्षण होते जिथे तो सहअभिनेता मला किस करतच राहिला आणि मला माहीत नाही का पण मी स्वत:साठी त्यावेळी ठाम भूमिका घेतली नाही. कारण मला माहीतच नव्हतं की मी काय करायला हवं. आम्ही एकाच हॉटेलमध्ये पण, वेगळ्या रूममध्ये राहत होतो पण, तो मला मॅसेज करत होत की आपण बाहेर जाऊयात, एकत्र डिनर करूयात, तू इकडे ये मी तुला स्वीम करायला शिकवतो, आपण भेटू शकतो का? मी म्हटलं मला यातलं काहीही नको आहे. असं पूर्वी कधीच माझ्याबरोबर घडलं नव्हतं आणि घडूही नये. प्रिया हा अनुभव सांगत पुढे म्हणाली, त्यावेळी या परिस्थितीत कसं वागावं मला कळलं नाही. भोपाळमध्ये शूटिंग करत होतो. मी उमेशला दररोज रात्री फोन करायचे. आम्ही आधीच हा नियम बनवला होता की दोघे कधीही एकमेकांच्या सेटवर जाणार नाही.

## सोशल मीडिया द्वेषाने भरलेले; Cannesमध्ये आलिया भट्ट ट्रोल होताच आईचे सडेतोड उत्तर

कान्स फिल्म फेस्टिवलमध्ये बॉलीवूड अभिनेत्री आलिया भट्टने लक्ष वेधून घेतले होते. पहिल्या दिवशी कान्समध्ये सहभागी होत आलियाने पाच ग्लॅमरस लूक केले. जागतिक स्तरावर कौतुक होत असताना भारतातून मात्र तिच्यावर जोरदार टीका करण्यात आली. सोशल मीडियावर आलिया भट्ट कान्स फेस्टिवलमुळे ट्रोल झाली आहे. रेड कार्पेटवर कॅमेरामनने तिचे फोटो न घेतल्याचे व्हिडीओ व्हायरल झाले आहेत. सोशल मीडियावर आलियाला ट्रोल केल्यावर तिची आई सोनी राजदान यांनी ट्रोलर्सला सडेतोड उत्तर दिले. लेखिका शुनाली खुल्लर श्रॉफने इन्स्टाग्रामवर अभिनेत्री आलिया भट्टच्या समर्थनार्थ पोस्ट लिहिली. त्यामध्ये आलिया भट्ट ही कान्स फेस्टिवलमध्ये दुर्लक्षित झाली नाही; तर चुकीच्या कॅमेरा अँगलनं तिचा अपमान झाल्याचं दाखवण्यात आलं. कान्समध्ये आलिया पोज देताना फोटोग्राफर्स विचलित झाल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला अन् अवघ्या काही वेळेत आलियाला डावलण्यात आल्याचं सोशल मीडियानं ठरवून टाकलं. आपल्याच देशातील लोकांनी तिला कमी लेखण्यास सुरुवात केली. लोक त्यावर फक्त चर्चा करत नव्हते; तर मनमुराद आनंद घेत होते. आपल्याला आपल्याच कलाकारांना कमी लेखण्याचे वेड आहे आणि आपल्याला त्यात आनंद वाटतो, अशी नाराजी शुनालीने व्यक्त केली. कान्स रेड कार्पेट म्हणजे नुसता गोंधळ असतो. एकाच वेळी अनेक फोटोग्राफर ओरडतात, लक्ष विचलित करतात आणि फोटो घेत असतात. मोठ्या सेलिब्रिटींच्या मागे धावतात आणि सतत कॅमेरा अँगल बदलतात. कान्स महोत्सव हा काही जागतिक सेलिब्रिटींची योग्यता ठरवण्याचं माध्यम नाही. तरीही फोटोग्राफर क्षणभर वळताना दिसले तरी त्याला आपण वेगळा अर्थ लावतो, असे शुनालीने ट्रोलर्सला उत्तर दिले. आलिया भट्ट आताच्या घडीला भारतातील स्टार अभिनेत्री आहे. तिला राष्ट्रीय पुरस्कार मिळालाय, याशिवाय ती ग्लोबल ब्रँड म्बेसेडर आहे. मनोरंजन विषयक असंख्य आंतरराष्ट्रीय योजनांमध्ये तिचा सहभाग असतो. त्यामुळे आलियाचं महत्त्व ठरवणारे हे ट्रोलर्स कोणीही नाहीयेत. मला याठिकाणी कोणत्याही प्रकारचा स्त्री-पुरुष भेदभाव करायचा नाहीये. पण, एक गोष्ट आवर्जून नमूद करेन यशस्वी महिलांवर टीका टिप्पणी



करणं ही अलीकडे फार सामान्य गोष्ट झालीये. तुम्हाला कदाचित सेलिब्रिटी कल्चर आवडत नसेल, कदाचित तुम्ही नेपोटिझमच्या विरोधात असाल किंवा कान्समधील इन्फ्लुएन्सर्सचा अतिरेक तुम्हाला आवडत नसेल. पण जिथे काहीच अपमान झाला नव्हता तिथे तो मुद्दाम निर्माण करणं, हे चुकीचे आहे, असे शुनाली खुल्लर श्रॉफने लिहिले आहे. शुनालीच्या या पोस्टवर आलिया भट्टची आई सोनी राजदान यांनी कमेंट करून सोशल मीडिया किती भयंकर झाला असल्याचे सांगितले. सोनी राजदान यांनी आलिया भट्टवरील पोस्टला कमेंट करीत कान्स महोत्सवावर प्रतिक्रिया दिली. सोनी यांनी लिहिले की, सोशल मीडिया हे प्रेम, माहिती आणि मनोरंजनाचे माध्यम आहे; पण ते खूप साऱ्या द्वेषाच्या भावनेनेसुद्धा भरलेले आहे.

* मुख्य संपादक – संजय प्रल्हाद भोकरे * संपादक –सिद्धार्थ संजय भोकरे * सरव्यवस्थापक – सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन – ०२०-२५४२४२३२ E-mail : dainikjanpravas@gmail.com